**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८</u>**

**<u>विशेष मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक –५७</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक –३०.४.२०२१</u> <u>वेळ –दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक ३०/४/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील काही सन्मा.सदस्य प्रत्यक्ष सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.राहुल गुलाब जाधव

५) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

६) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

७) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

८) मा.गायकवाड निर्मला मनोज

९) मा.गोफणे अनुराधा देविदास

१०) मा.अजित दामोदर गव्हाणे

११) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१४) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१५) मा.सावळे सिमा रविंद्र

१६) मा.लोंढे नम्रता योगेश

१७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१८) मा.लांडे विक्रांत विलास

१९) मा.गीता सुशिल मंचरकर

२०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२१) मा.अनुराधा गणपत गोरखे

२२) मा.केशव हनुमंत घोळवे

२३) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२४) मा.अश्विनी भिमा बोबडे

२५) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२६) मा.संजय बबन नेवाळे

२७) मा.एकनाथ रावसाहेब पवार

२८) मा.भालेकर प्रविण महादेव

२९) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३०) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३१) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३२) मा.घोलप कमल अनिल

३३) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३४) मा.चिखले सचिन तुकाराम

३५) मा.यादव मीनल विशाल

३६) मा.वैशाली जालींदर काळभोर

३७) मा.प्रमोद कुटे

३८) मा.राजू मिसाळ

३९) मा.शैलजा अविनाश मोरे

४०) मा.बाबर शर्मिला राजू

४१) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४२) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४३) मा.ढाके नामदेव जनार्दन

४४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४५) मा.करुणा शेखर चिंचवडे

४६) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

४७) मा.भोईर सुरेश शिवाजी

४८) मा.अपर्णा निलेश डोके

४९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५०) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५१) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५२) मा.जयश्री वसंत गावडे

५३) मा.कोमल दिपक मेवानी

५४) मा.सुलक्षणा राजू धर

५५) मा.शाम गणपतराव लांडे

५६) मा.सुजाता सुनिल पालांडे

५७) मा.योगेश मंगलसेन बहल

५८) मा.कदम निकीता अर्जून

५९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१) मा.डब्बू आसवाणी (हिरानंद)

६२) मा.पाडाळे निता विलास

६३) मा.काळे उषा दिलीप

६४) मा.पवार मनिषा प्रमोद

६५) मा.बारणे अर्चना तानाजी

६६) मा.अभिषेक गोविंद बारणे

६७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६८) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६९) मा.बारणे माया संतोष

७०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७१) मा.दर्शले रेखा राजेश

७२) मा.कलाटे राहुल तानाजी

७३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७४) मा.ममता विनायक गायकवाड

७५) मा.कामठे तुषार गजानन

७६) मा.चोंधे आरती सुरेश

७७) मा.कस्पटे संदिप अरुण

७८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८०) मा.सुनिता हेमंत तापकीर

८१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८३) मा.कुटे निर्मला संजय

८४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८६) मा.आंगोळकर सागर सुनिल

८७) मा.मुंढे उषा अंकुश

८८) मा.कदम शशिकांत गणपत

८९) मा.लोखंडे चंदा राजू

९०) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

९४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९७) मा.नवनाथ दत्तू जगताप

९८) मा.संतोष बबन कांबळे

९९) मा.सोनवणे शारदा हिरेन

१००) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०१) मा. संजय मल्हारराव वाबळे

१०२) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१०३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०४) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील-शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत-उपआयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे-प्र.सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.गायकवाड-प्र.मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.चव्हाण, कुलकर्णी, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.पाटील, मा.पवार, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी, मा.नरोना, मा.धुमाळ, मा.राऊत- कार्यकारी अभियंता, मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी, मा.पानसरे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.विकास डोळस – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. छत्तीसगड येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २२ जवान शहीद तसेच दिलीप गांधी – भाजपाचे जेष्ठ नेते तथा माजी केंद्रीय मंत्री यांचे निधन, एकनाथ गायकवाड – काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मा.खासदार यांचे निधन, डॉ.वृषाली कांबळे - पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैदयकीय अधिकारी यांचे निधन, लक्ष्मण पै – प्रसिध्द चित्रकार आणि पद्मभुषण पुरस्कार सन्मानित यांचे निधन, शकुंतला बेंद्रे – भाजपा पिंपरी चिंचवड शहर सहकार आघाडीचे अध्यक्ष प्रदिपकुमार बेंद्रे यांच्या मातोश्री यांचे निधन, शशिकला – जेष्ठ अभिनेत्री यांचे निधन, फातिमा झकेरिया – पद्मश्री विजेत्या प्रख्यात पत्रकार-लेखिका यांचे निधन, दत्ता इस्वलकर – गिरणी कामगार संघर्ष समितीचे नेते यांचे निधन, बजरंग राजीवडे – पत्रकार यांचे निधन, हेमंत पुणतांबेकर, प्रभाकर कलाटे,सुरेश फुगे – पिंपरी चिंचवड महापालिकेचे कर्मचारी यांचे निधन, ज्योती कलाणी – राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी आमदार यांचे निधन, सुमित्रा भावे – जेष्ठ दिग्दर्शिका यांचे निधन, किशोर नांदलस्कर – जेष्ठ अभिनेते यांचे निधन, तुकाराम पडवळे – भाजपा मा.उपाध्यक्ष, शर्मिला पांडुरंग चितळे – मंगेश चितळे, उपायुक्त पिं.चिं.मनपा यांच्या मातोश्री यांचे निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा.सागर आंगोळकर - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ६३३ विषय क्रमांक - १

दिनांक- ३०/४/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१५/कावि/६८/२०२१, दि.३०/०३/२०२१

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९१७१, दि.१५/०४/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भुखंड, घरदुरुस्ती, घरविस्तार अग्रिम दिले जात आहे. सद्यस्थितीत शासन निर्णय क्रमांक घबांअ-2012/प्र.क्र.30/२०१२/विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२० फेब्रुवारी २०१५ अन्वये तसेच मनपा धोरणानुसार घरबांधणी अग्रिमासंदर्भात खालील प्रमाणे धोरण निश्चित केले आहे व त्यानुसार घरबांधणी व इतर अग्रिम मंजूर केले जाते.

| **अ.क्र.** | **अग्रिमाचा तपशिल** | **घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा** |
|---|---|---|
| | | **“एक्स” वर्गीकरण** |
| अ) | १) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे किंवा २) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे, किंवा ३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे,किंवा ४) बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे.(घरबांधणी अग्रिम) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ब) | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे.<br><br>(भुखंड खरेदी अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा जमिनीची किंमत किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) | स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. (घर विस्तार अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ड) | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी घरदुरुस्ती अग्रिम (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅड मधील वेतन + ग्रेड वेतन) १०० पट किंवा रु.७.५० लक्ष किंवा घरदुरुस्तीचा खर्च किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| इ) | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (H.D.F.C.) , राष्ट्रीयकृत बॅका / सहकारी बॅका,महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी | कर्मचा-याने वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम वजा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेपर्यंत कर्मचा-याने संस्थेला परतफेड केलेली रक्कम किंवा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला वित्तीय संस्थेला परतफेड करण्यासाठी बाकी राहिलेली रक्कम किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बॅड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| फ | जुने घर विकत घेण्यासाठी अग्रिम | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी ( Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/ २०१९/विनियम मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक.०२ फेब्रुवारी २०२१ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीतील मुळ वेतनानुसार घरबांधणी

अग्रिम मंजुरीच्या मर्यादेत सुधारणा करणेत आलेल्या आहेत व त्यास अनुसरुन पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ यांनी दि.08/02/2021 च्या पत्रान्वये वरील शासन निर्णयान्वये मनपा कर्मचा-यांना देखील घरकर्जात वाढ करण्याची मागणी केलेली आहे. दि.02/02/2021 च्या शासन निर्णयातील केलेल्या सुधारणा खालील प्रमाणे –

**<u>शासन निर्णय</u>**.-

1. **घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा**.-

घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी मनपा कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतन विचारात घेण्यात यावे.अशा वेतनावर आधारीत घरबांधणी अग्रिम मंजूरीकरीता महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या (तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणानुसार) “एक्स”, “वाय” व त्याव्यतिरिक्त उर्वरीत वर्गीकरणातील शहरामध्ये घर/सदनिका/जमीन खरेदीसाठी सुधारीत कमाल मर्यादा पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अग्रिमाचा तपशिल | घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| | | “**एक्स**” वर्गीकरण |
| अ) | १) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे किंवा २) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे,किंवा ३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे,किंवा ४) बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे.(घरबांधणी अग्रिम) | मूळ वेतनाच्या 1०० पट किंवा रु.7०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ब) | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. (भुखंड खरेदी अग्रिम ) | मूळ वेतनाच्या 1०० पट किंवा रु.21.०० लक्ष किंवा जमिनीची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) | स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार | मूळ वेतनाच्या १०० पट किंवा रु.२१.०० लक्ष किंवा |

| | | |
|---|---|---|
| | करणे. (घरविस्तार अग्रिम ) | बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ड) | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी घरदुरुस्ती अग्रिम (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही ) | मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु.१०.५० लक्ष किंवा घरदुरुस्तीचा खर्च किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| इ) | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (H.D.F.C.) , राष्ट्रीयकृत बॅका/सहकारी बॅका,महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेची कर्जाची रक्कम किंवा मूळ वेतनाच्या १०० पट किंवा रु.७०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| फ) | जुने घर विकत घेण्यासाठी अग्रिम | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या १०० पट किंवा रु.७०.०० लक्ष किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

उक्त शासन निर्णयातील सुत्रानुसार सातव्या वेतन आयोगानुसार महापालिका कर्मचा-यांना खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार घरकर्ज मंजूर करावे लागेल.

२) **घरबांधणी अग्रिमाची वसुली**.-

अ) अग्रीमाची व्याजासह वसूली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशा पध्दतीने वरील अ, इ आणि फ येथील प्रयोजनाकरीता कमाल २० वर्षात प्रथम १९२ मासिक हप्त्यात मूळ अग्रिम व नंतर ४८ मासिक हप्त्यात व्याज वसूल करण्यात यावे ब ,क आणि ड येथील प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रिमाची वसूली व्याजासह कमाल ९६ मासिक हप्त्यात प्रथम ७२ मासिक हप्त्यात मूळ अग्रिम व नंतर २४ मासिक हप्त्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक

हप्त्याची रक्कम वाढवू शकेल. अग्रीमधारकाचा सेवा कालावधी उपरोक्त नमूद कालमर्यादेपेक्षा कमी शिल्लक आहे अशा प्रकरणी,उर्वरीत सेवा कालावधी विचारात घेऊन मुद्दल व व्याज वसुली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल या दृष्टीने मुद्दल व व्याजाचा वसुली कालावधी निश्चित करण्यात यावा.

ब) घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकरकमी मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल. घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाचा प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल.

३) अग्रिम मंजूरीसाठी मनपाचे यापुर्वीच्या दि. 05/08/2016 च्या परिपत्रकातील अट क्र.१ ते १८ आहे तशा लागू राहतील

**४) अग्रिम परतफेडीच्या क्षमतेची परिगणना पुढील प्रमाणे करण्यात यावी.**

| अ.क्र. | राहिलेल्या शासन सेवेची मर्यादा | परतफेडीची क्षमता |
|---|---|---|
| १. | २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक वेतनाच्या 100 टक्के X मासिक सेवा कालावधी |
| २. | १० वर्षानंतर परंतू २० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत. | मूळ मासिक वेतनाच्या 90 टक्के X मासिक सेवा कालावधी |
| ३. | १० वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणा-या तथापि सेवानिवृत्तीसाठी किमान ५ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक वेतनाच्या 80 टक्के X मासिक सेवा कालावधी |

५) व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये र.रु.25.00 लक्ष पर्यंतच्या घर बांधणी प्रकरणी व्याजाची परिगणना 7.9% दराने करावी व र.रु.25.00 लक्ष वरील मंजूर अग्रीमाच्या बाबतीत मात्र संपुर्ण मंजूर अग्रिम रकमेवर व्याजाची परिगणना 9.9% या एकरुप दराने करण्यात यावी. ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम मंजूर केले असेल त्या आर्थिक वर्षासाठी जो व्याजदर लागू करण्यात आला असेल त्या दराने व्याजाची परिगणना करण्यात यावी. व्याजाची परिगणना वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४९/९९/विनियम, दि.५ मे, २००० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने करण्यात यावी.

६) शासन निर्णयातील सुधारीत मर्यादा आदेश निर्गत केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि ज्या अधिकारी/कर्मचा-यांना दि.05/08/2016 च्या मनपा आदेशान्वये घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असेल व अग्रीमधारकास या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत अग्रीमाचे सर्व हप्ते वितरीत केले नसतील अशा प्रकरणी संबंधित अग्रीम धारकास सदर शासन निर्णयानुसार विहीत सर्व अटी/शर्तींच्या अधीन वाढीव अग्रीम अनुज्ञेय करता येईल. या व्यतिरिक्त यापूर्वी मंजूर करण्यात आलेली घरबांधणी अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येणार नसल्याने वाढीव घरबांधणी अग्रिम मंजूर केले जाणार नाही. सबब शासन निर्णय व मनपा धोरणात नमुद केल्यानुसार उपरोक्त घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेत येत आहे.

मा.हर्षल ढोरे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.
मा.महापौर – विषय क्रमांक १ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.कुंदन गायकवाड - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज आपण सत्ताधारी असून, सर्व नगरसेवक असतील, सर्व अधिकारी वर्ग असतील हे सगळेजण कोरोनामध्ये चांगल काम करतात पण अशी काही लाजीरवाणी गोष्ट होते की आम्ही नगरसेवक असताना आम्हांला आमची लाज वाटते. कारण की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आणि चिखली शाळेतील शिक्षीका आहेत आणि त्या आता मुख्याध्यापिका होत्या आज त्यांचा विषय ऍटोक्लस्टर बद्दलचा आहे. मा.महापौर साहेब, एवढी लाजीरवाणी गोष्ट झाली आज २३ तारखेला डॉ.अमोल सरांना मी कॉल केला होता त्यांना मी त्या पेशंटसाठी बेड उपलब्ध करुन घ्या म्हणालो तर त्यांनी मला बेड उपलब्ध नाही सहा लोक वेटींगला आहेत असं सांगीतल आणि एक तासानी मला फोन येतो की त्याच पेशंटला ऍटोक्लस्टरला जागा झाली आणि बेड देण्यात आला असं नातेवाईकांकडून कळल. तो बेड कसा दिला एक लाख रुपये घेवून त्यांना ऍटोक्लस्टरला बेड भेटलेला आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मला इतक वाइट वाटल की आज त्या शिक्षीकांनी मला शिक्षण काय आहे ते शिकवल मी त्यांचा विदयार्थी आहे आणि त्यांच्या साठी मी बेड उपलब्ध करु शकलो नाही हे मला अक्षरश: वाईट वाटल.

त्याच्यामध्ये कुठले कुठले डॉक्टर आहे मी तुम्हांला एक रेकॉर्डींग ऐकवतो. कोणी कोणी पैसे घेतले ते त्यामध्ये पण आहे. अक्षरश: सहा डॉक्टर आहेत आणि प्रायव्हेटचा एक डॉक्टर आहे. आज आपण १३२ नगरसेवक आहेत पण एकाच्याही फोनने बेड उपलब्ध झाला नसता पण बाहेरच्या प्रायव्हेट डॉक्टरनी त्यांना बेड उपलब्ध करुन दिला तो कसा दिला. काल उल्हास जगताप साहेब आणि आम्ही सहा तास ऍटोक्लस्टरला बसून होतो. मी म्हणालो त्यांना मला २३ तारखेचा व्हिडीओ बघायचा आहे त्यांना तुम्ही आतमध्ये कसं घेतल मला तो व्हिडीओ दाखवण्यात आला नाही. विकासभाउ डोळस आणि मी तीथे सहा ते आठ तास बसून राहीलो. फक्त आम्हांला बघायच होत की यांनी आतमध्ये कसं घेतल. त्या डॉक्टरांना खंत सुध्दा नाही की चुका केल्यात म्हणून. मी सगळयांना नाव ठेवत नाही परंतु स्पर्शमध्ये काही डॉक्टर असतील त्या डॉक्टरांनी काळा बाजार केलेला आहे. आता एकाकडून पैसे घेतले असे किती लोकांकडून यांनी पैसे घेतले असतील. सामान्य नागरीकांसाठी आपण दवाखाना उघडलेला आहे. महापालिका त्यांना पैसे देते. मी ती ऑडीओक्लिप ऐकवतो, ऑडीओक्लिप ऐकवली. मा.महापौर साहेब, आम्ही तीथ काल गेल्यानंतर तीथ ज्योत्स्ना मॅडम होत्या त्यांना विचारल तर त्यांनी सांगीतल की डॉ.प्रविण जाधवनी सांगीतल मला त्यांना घ्यायला मग प्रविण जाधवला बोलवा म्हणलो त्यांना बोलवल्यानंतर त्यांनी डॉ.शशांक राळे यांच नाव घेतल, मग त्यांनाही बोलवल त्यांनी सांगीतल डॉ.सचिन कसबे यांच आम्हांला पहील सगळयांची नाव माहीती होती पण आम्हांला त्यांच्या तोंडावाट काढायच होतं. डॉ.कसबे यांना बोलवल्यानंतर ते म्हणाले मी ऍटोक्लस्टरच्या बाहेर येतो कारण मला तीथली लोक सोडणार नाहीत. मग ऍटोक्लस्टरच्या बाहेर जावून त्यांची व्हिडीओ घेतली की त्यांनी कबुली केली की डॉ.प्रविण जाधव त्या डॉक्टरांनी एक लाख रुपये घेवून बेड देण्यात आलेला आहे. आता याच्यावर काय कारवाई करायची ते मा.महापौर तुम्हीच सांगा. याच्यामध्ये स्पर्शवाल्याचा सगळयात मोठा हात आहे. डॉ.अमोल होळकुंडे यांना मी लोकप्रतिनिधी असून मला बेड नाही करता आला मग त्या प्रायव्हेट डॉक्टरांनी फोन केल्यानंतर प्रविण जाधव यांनी बेड करुन दिला. मग कसा काय करुन दिला काळाबाजार केल्या शिवाय केला का. त्यांच्यावर गुन्हा दाखल करा, एफआयआर दाखल करा, काय करायच ते करा ऍक्शन घ्यावी. मा.महापौर तुम्ही आदेश दयावेत, आणि काही केल नाहीतर मी महापालिकेवर कारवाई करायला लावणार मी कम्प्लेन्ट देणार, धन्यवाद.

मा.विकास डोळस - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज कोरोनाच्या या

महामारीमध्ये पिंपरी चिंचवड शहर, पुणे किंबहुना देशावरती मोठ संकट आहे. परिस्थिती अतीशय भयानक आहे म्हणजे याच्यामध्ये आपण जर बघीतलतर कोरोनाच्या टेस्ट पासून मग बेड, आयसीयू बेड, व्हेन्टीलेटर, रेमडेसिवीर यातून जर पेशंट वाचलातर ठिक नाही वाचलातर स्मशानमध्ये लाईन. तीथ पण लवकर करायच असेलतर प्रायव्हेट ॲम्ब्यूलन्स पाठवतो पाच हजार रुपये दया आणि तीथ पण लवकर करायच असेलतर आठ हजार रुपये दया अशा परिस्थितीमधुन नागरीकांना जाव लागत, परिस्थिती अतीशय भयंकर आहे म्हणजे आम्ही वायसीएमला दिवसातून चार पाच वेळेला जातो, जम्बो कोवीडला जातो, ॲटोक्लस्टरला जातो. ॲटोक्लस्टर चालू झाल्यापासून आतापर्यंत शंभरवेळा कॉल केला असेल पण एकदा पण आमच्या पेशंटसाठी जागा नाही झाली. कितीतरी वेळा त्या डॉ.अमोल होळकुंडेला फोन केला असेल की आमच्या एखादया पेशंटला तीथ जागा दया. आम्हाला पण समजत की आयसीयूमध्ये जागा जर शिल्लक नसेलतर ते तरी कुठून अव्हेलेबल करुन देणार आणि आपणही म्हणू शकत नाहीत की त्या पेशंटला काढा आणि आमच्या पेशंटला टाका म्हणून. आपले नगरसेवक चांगले काम करतात, वायसीएमचे डॉक्टर चांगले काम करतात. डॉ.वाबळे आहेत, डॉ. विनायक पाटील आहेत, डॉ.अनिकेत लाठी आहेत आपल्या पालिकेचे अधिकारी चांगले काम करतात. आम्ही नगरसेवक याच्यामध्ये जीवाच रान करतो. रात्री केव्हाही मला बघा वायसीएमला आहेच, जम्बो कोविड सेंटरला आहे पण याच्यामध्ये पण याच्यात पण मयताच्या टाळूवरच लोणी खायच काम चालू आहे. म्हणजे मला आता अक्षरश: गहीवरुन येत ज्या शिक्षकांनी आमच्या कुंदनभाऊला शिकवल त्या शिक्षकाला कुंदनभाऊ बेड अव्हेलेबल करुन देवू शकला नाही. एक लाख रुपये दया आणि आयसीयूमध्ये बेड मिळवा अशी घटना आपल्या ॲटोक्लस्टरमध्ये घडली. काल वायसीएमला आमच्या दोघांची भेट झाली, भेट झाल्यानंतर कुंदननी मला हा प्रकार सांगीतला की माझ्या शिक्षकाला एक लाख रुपये दिल्यानंतर आयसीयूचा बेड अव्हेलेबल झाला, मी म्हणल थेट ॲटोक्लस्टर गाठायच जाताना पालीकेचे को-ऑर्डीनेटर आहेत गायकवाड साहेब त्यांना म्हणल एक लाख रुपये आणलेत एक आयसीयूचा बेड पाहीजेत ते म्हणाले सर, काय बोलता, म्हणल नाही तुम्ही या ॲटो क्लस्टरला मग अमोल होळकुंडेना कॉल लावला, म्हणल साहेब, कुंदननी आणि मी दोघांनीही एक-एक लाख रुपये आणलेले आहेत ॲटोक्लस्टरला या दोन आयसीयूचे बेड पाहीजेत. आम्हांला या गोष्टीची कुणकुण होती त्याच्यावरती आम्ही विचार करत होतो काय करायच. ते म्हणाले साहेब, माझी एक डेड ऑडीटची एक मिटींग आहे ती मिटींग करुन आम्ही येतो. आम्ही साधारणत: दोन ते आडीचला ॲटोक्लस्टरला पोहचलो.

तीथ पोह्चल्यानंतर म्हणजे आम्ही या संस्थेचे ट्रस्टी आहोततर बाहेर बाऊन्सर आडवतात तुमचे. मला एक कळत नाही या जम्बो कोवीड सेंटरच्या बाहेर, ऍटोक्लस्टरच्या बाहेर बाऊन्सर ठेवायची काय गरज आहे. आपल्या ब प्रभागाचे सन्मा. प्रभाग अध्यक्ष सकाळी साडेसात पासून आम्ही जाईपर्यंत दोन पर्यंत बाहेर थांबले होते त्यांना आतमध्ये जाऊ देत नव्हते. नंतर मग ज्योत्स्ना मॅडमला बोललो, त्या म्हणाल्या आम्हांला प्रविण जाधवांनी सांगीतल आहे, नंतर प्रवीण जाधवांना बोललो, प्रविण जाधवानी सांगीतल शशांक राळेनी फोन केला होता त्यांना बोलवलं, शशांक राळेना फोन केल्यानंतर ते म्हणाले सचिन कसबेना फोन करा तो माणूस काय आलाच नाही तो म्हणाला तीथ आलोतर तुम्ही मारहाण कराताल ही एवढी विचीत्र परिस्थिती होती आणि आयुक्त साहेब सभागृहात सांगतो त्या दोन डॉक्टरांना आम्ही ठोकल आणि जेव्हा जेव्हा आमच्या नागरीकांवरती अशी परिस्थिती येतील, शंभर टक्के ठोकून काढल असतं मग कोणाची परवा नाही करणार. साहेब, हे ऍटोक्लस्टर, जम्बो कोवीड काय लावल हे, आहो तुम्ही सामान्य नागरींकांना विचारा जम्बो कोवीडमध्ये ऍडमीशन देवू का तर तो पाया पडतो आणि म्हणतो भाऊ, ऍडमीशन नका देवू पण तीथ गेल्यानंतर माणूस परत येत नाही. यांची घर भरायला आपण ते कॉन्ट्रॅक्ट दिलय का. आहो, आपल्या वाबळे सरांकडे एक द्या, डॉ. विनायक पाटीलांकड एक द्या, लाठीकड एक दया आणि यांना सगळयाना काढून टाका. साहेब, हे एक एक लाख रुपये घेवून बेड देतात. आमच्या शिक्षीकांच निधन झाल मग एक लाख रुपयासाठी ही शक्यता नाकारता येत नाही की दुसरे एक लाख मिळवण्यासाठी त्यांना आयसीयूतून काढल असल. आम्ही आठ तास बसलो होतो ऍटोक्लस्टरमध्ये आम्हांला सीसीटीव्ही फुटेज पण दाखवल नाही, आम्ही पत्र दिलतरी सीसीटीव्ही फुटेज आम्हांला दाखवल नाही. त्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये काय दडल मला नाही माहीती. आम्ही तीथ बसलो होतो त्यावेळेला ते अमोल होळकुंडे यांच्या चेह-यावरती थोड पण अस जाणवत नव्हतं की माझ्या ऍटोक्लस्टरमध्ये ही घटना घडलेली आहे. काहीतरी वाटल पाहीजे की माझ्या अख-यारीत जी संस्था आहे त्या संस्थेमध्ये एक लाख रुपये देवून ऍडमीशन होतं, अजीबात नाही सारवासारव करण्याचा प्रयत्न. साहेब, आपल्या पालिकेत असे प्रकार घडत असतीलतर आपल्या पालीकेसाठी ही फार मोठी मानहाणीची गोष्ट आहे. आज कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असु द्यात आज आपल्या नागरीकांचा जीव वाचवण्यासाठी जीवाच रान करतो, प्रत्येक नागरीकाचा जीव वाचला पाहीजे. व्हेन्टीलेटर असू द्या, आयसीयू असू द्या, बेड असू द्या, हॉस्पिटलला ऑक्सिजन सिलेंडर पुरवायचे असु द्यात, एखादया नागरीकांना रेमडेसिवीर लागलतर

आमच्यासारखा चारवेळा कॉल करतो की बाबा दोन चार हजार जास्त घे पण आमच्या नागरीकांना रेमडेसिवीर दे आपली यंत्रणा तेवढी सक्षम नाही की तुम्हांला तशा चांगल्या पध्दतीने रेमडेसिवीर देतील म्हणून. आपली आरोग्य व्यवस्था कोलमडली तर ती आपण सावरली पाहीजे. आयुक्त साहेब माझी तुम्हांला विनंती आहे की हे जे जम्बो कोविड आणि ऍटोक्लस्टर आहे यांच मॅनेजमेंट काढून टाका हे जे वरती बसलेतरना कपाले, होळकुंडे अजून कोण कोण त्यांना काढून टाका आणि आपल्या महापालिकेच्या एका एका डॉक्टरांकडे ते द्या. वायसीएमचा कारभार बघा काही चुका असतील, मोठ काम करताना थोडयाफार चुका घडतात, शंभर टक्के घडतात पण मला माझ्या वायसीएमच्या डॉक्टरांचा अभिमान वाटतो की ते चांगल्या पध्दतीने कामकाज करतात, लोकांचा जीव वाचवतात.  हे इथ बील बनवायची, बील पाठवायची चार-चार कोटी, पाच-पाच कोटी या सभागृहाचा अशावेळेस सदस्य आहे म्हणून लाज वाटते आम्हांला लाज. आज पालीकेच्या अधिका-यांची काय परिस्थिती आहे तीथ. आहो, पालीकेच्या अधिका-यांना विचारत नाहीत. ते कोण डॉक्टर होते त्यांना म्हणाले इकडच्या डॉक्टरांच ते रजिष्ट्रर घ्या की त्याच्यामध्ये कोण कोण येतय, कोण कोण जातय आम्हांला एक नाव कळल होतं की ते डॉक्टर व्हेरीफाय करायला. ते आपल्या पालीकेचे डॉ. गोरे आहे त्यांना साध रजिष्ट्रर नाही दाखवल दोन तास. काय अवस्था आहे दुर्बल असे आपले पालीकेचे अधिकारी तीथ झालेत. जम्बो कोवीड फार सेन्सीटीव्ह विषय आहे साहेब. आपण त्यांना फार मोठया प्रमाणात पैसे देतो हे पैसे लोकांचे आहेत, तीथ ट्रिटमेंट देता म्हणून काही उपकार करत नाहीत. लोकांच्याच पैशातून लोकांवरती उपकार करतो. जम्बो कोवीडमध्ये तुम्ही गेल्यास सगळ ठिक असतं, रिसेप्शनवाला चांगल बोलतो, एस सर, गुडमॉर्निंग सर, गुड अफटरनुन सर, आपले पदाधिकारी गेले की चांगल बोलतात एकदम व्यवस्थित कामकाज चाललेल आहे. नातेवाईकांना आठ आठ दिवस तीथ भेटूं देत नाहीत त्या जम्बोमध्ये. काल फोन केला होता एका नातेवाईकांनी आजी ऍडमीट आहे मी म्हणल त्यांना पीपीई कीट घालून तरी भेटू दयात निदान, त्यांची परिस्थिती समजू द्यात. तो समोरचा माणूस काय म्हणला असेल, साहेब घरी गेल्यानंतर भेटू द्या आणि संध्याकाळी त्याची आजी गेली त्या आजीच निधन झालं. पेशंट वारतातना त्या नातेवाईकांच्या प्रतिक्रीया घ्या ते नातेवाईक आपल्याला अशिर्वाद देतात का शिव्याशाप देतात. जर पालिका म्हणून एवढा खर्च करुन जर आपल्याला शिव्याशाप भेटणार असतीलतर आपण पण विचार करायची वेळ आलेली आहे. आम्ही तीथ रात्रीच एकला जातो दिडला जातो पालीकेचे एक मानधनावरती डॉक्टर तीथ आहेत बीचारे त्यांना कामाची गरज

आहे ते चांगल काम करतात आता नऊ तारखेला त्यांचा बॉण्ड संपणार आहे आपले अधिकारी त्यांना विरोध करतात की तुम्हांला मुदतवाढ देवू शकत नाही. अशा अधिका-यांना मुदतवाढ द्याना एक दिवस ब्रेक देवून त्यांना घ्याना ते चांगल काम करतात घ्याना. पण जम्बो कोवीडवाल्यांना एकाला कॉन्ट्रक्ट दिल की त्यांनाच कायम ठेवायच हा कोणता नियम आहे. ऍग्रीमेंट तुटलतरी तुटू दया मा.महापौरताई, पण यांच्यावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा, या ऍटो क्लस्टर आणि जम्बो कोवीडवरती खंडणीचे गुन्हे दाखल करा. या जम्बो कोवीडमध्ये जावून पाहणी करा स्टिंग ऑपरेशन राबवा म्हणजे नागरीकांच्या प्रतिक्रीया कळतील. पेशंट आतमध्ये गेला की मोबाईल नाही दयायचा असं काहीतरी चालल आहे कातर तो एखादी व्हिडीओ क्लिप बनवल. कोणत्या गोष्टीला हे घाबरतात, काहीतरी काळबेरं चालत म्हणून हे घाबरतातना, दुसरी शक्यता नाकारता येत नाही साहेब ही. ते फक्त आपल्या फाईललाना रेमडेसिवीर चिटकवायच, म्हणायच रेमडेसिवीर दिल आणि रेमडेसिवीर बाहेर विकायचे झालेना असे वायसीएम मध्ये एक दोन प्रकार झालेत तुम्हांला फोन केला होता त्याची तुम्ही पण गंभीर दखल घेतली. आज याठिकाणी कौतूक करायची वेळ नाही पण तुम्ही चांगल काम करतात साहेब. पण या संस्थांना पोसण्याच काम आपण नाही केल पाहीजे. एक घटना घडली, सात घटना सांगतो साहेब, पुराव्यानिशी की सात पेशंट कडून सात लाख रुपये घेतले आणि त्यातले दोन पेशंट दगावले. या सभागृहात नगरसेवक म्हणून बसलो याची आम्हांला पण लाज वाटते कातर आमच त्याठिकाणी काही चालतच नाही. तीथ गेटवरती गेल्या गेल्या बाऊंसर आडवतो, आहो, आम्हांलाच काय पालिकेच्या अधिका-यांना पण आडवतात अशीतर परिस्थिती आहे. वायसीएमला असु द्यात, जम्बो कोवीडला असू द्यात, ऍटो क्लस्टरला असू द्यात कोणत्याही ठिकाणी जर नागरीक गेलातर त्याला चांगली ट्रिटमेंट भेटली पाहीजे हा त्याचा अधिकार आहे. आणि असे जर प्रकार झाले आमच्यावर गुन्हे दाखल झाले तरी चालतील शंभर टक्के त्याच जागेवर चित्रण करा आमच्यावर एफआयआर करा काहीही करा याठिकाणी सगळया नगरसेवकांच्या वतीने सांगतो हे जम्बो कोवीड, ऍटोक्लस्टर या ज्या संस्था आहेत यांना पोसण्याच काम न करता यांचे ठेके काढून घ्यावे. महापालिकेचे जे आपले डॉक्टर्स आहेत त्यांच्या नियंत्रणाखाली जम्बो कोवीड आणि आपल ऍटोक्लस्टर द्याव. तीथ जी काम करणारी यंत्रणा आहे ते बीचारे पगारावरती आहेत त्यांना आपल्या महापालिकेच्या मार्फत मानधनावरती कामावर ठेवाव जशीच्या तशी यंत्रणा काम करेल. पण या ठेकेदाराना पोसण्याच काम आपण नाही करायच. हा आपल्याला लागलेला कलंक आहे, आपल्याला लागलेला

काळीमा आहे तो आजच्या आज आपण पुसला पाहीजे ही नम्र विनंती आहे. वायसीएममध्ये जे मानधनावर काम करणारे डॉक्टर आहेत ते पंचवीस जण चांगल काम करतात ते काही माझ्या घरचे नाहीत. आम्ही सीएमओ, वॉर्डमध्ये जातोना तीथ ते चांगले काम करतात त्यांना मुदतवाढ द्या  त्यांच आठ तारखेला थांबतय, यांना कामाची गरज आहे म्हणून ते आपल्याकडे येतात. आपल्या नियमात बसत नसेलतर एक दिवस ब्रेक देवून दुस-या दिवशी घ्या पण त्यांना घ्या पण ऍटोक्लस्टरवरती आणि जम्बो कोवीड सेंटर वरती कडक कारवाई करा, धन्यवाद.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कुंदन आणि विकासच मी खरोखर कौतूक करेल की त्यांनी ज्या विषयाला हात घातला तो विषय खुप दिवसापासूनचा डोक्यामध्ये होता आणि तो बोलता येत नव्हता असं कुठूनतरी, आपण म्हणतोना मारुनमुटकून बुक्यांचा मार असा सहन करत होतो. आयुक्त साहेब जेव्हा सेकंड कोवीडच सुरु झाल तेव्हा मी तुम्हांला सांगीतल होत की सर जम्बो कोवीड त्या कपालेंना चालवायला देवू नका. त्यावेळेला तुम्ही मला असं सांगीतल गेल की त्यांच ऍग्रीमेंट आहे ते ऍग्रीमेंट तोडू शकत नाही त्या ऍग्रीमेंटमध्ये असं सांगीतल की पुन्हा जर ही वेळ आलीतर पुन्हा जर ऍटोक्लस्टर, जम्बो कोवीड चालू करायच झालतर आपल्याला त्याच लोकांना चालू दयाव लागेल. माझा एक मुलभूत प्रश्न आहे महापालिकेमध्ये जर कॉम्प्युटर तुम्हांला घ्यायचा झालातर तुम्ही त्याची क्वॉलीटी बघता की कुठलातरी लोकल ब्रॅण्डचा घेवून येता. म्हणजे ज्यावेळेला तुम्ही टेंडर केल ते ज्या डॉक्टरनी ते जम्बो कोवीड चालवायला घेतल असेलतर त्याच कॅलीबर आणि त्याची कॅपेसिटी काय आहे याचा तुम्ही कधी विचार केला का. तुम्ही त्यादिवशी सांगीतल की आपल्याला मॅन पॉवर मिळणार नाही मग त्यांना मॅनपॉवर कुठून मिळते का त्याच्या घरातली प्रॉडक्टीव्हीटी आहे का ती. आज विकासनी जो विषय मांडला त्याला माझ सुध्दा अनुमोदन आहे. आज वायसीएमचे जर डॉक्टर बघीतलतर डॉ.विनायक आहेत, डॉ. लाठी आहेत, डॉ.वाबळे आहेत, डॉ.सोनी, डॉ.दादेवार, डॉ.गोफणे, डॉ.भावसार मॅडम आहेत हे ज्या पध्दतीने काम करतात त्या पध्दतीने काम करायला आज आम्ही त्यांना टाळया वाजवून त्यांना मानाचा मुजरा देवू शकतो. जम्बो कोवीडमध्ये या पंधरा दिवसामध्ये सात पेशंट पाठवले सातही मधला एकही पेशंट घरी आलेला नाही. सातीच्या साती पेशंटची आम्ही डेडबॉडी घेतलेली आहे. त्या माणसाला एखाद फ्रूट पाठवलतर ते जम्बो कोवीडमध्ये पोहचल जात नाही, औषधाची बातच वेगळी आहे. मला वाटत सिमाताई

जर्मनीमध्ये ज्यूला मारण्यासाठी हिटलरने ज्या पध्दतीने काम चालू केलना ते काम या जम्बो कोवीडमध्ये चालतय. सगळयात जास्त मृत्यूची संख्या तीथे. डॉक्टरच काय कोणीही उत्तर देत नाही आयुक्त साहेब तिथे. जेव्हा तुम्ही त्यांच्याशी ॲग्रीमेंट केल होत तेव्हा तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये क्लॉज होता का आमच्या पीसीएमसीचे वर्कर आमच्या पीसीएमसीचे अधिकारी तिथे काम करणार म्हणून. प्रत्येक अधिकारी आमचा तीथे झटून काम करतो, आज खांडेकर साहेब जम्बो मध्ये पाहतात. डॉ.प्रिती, डॉ.प्रितीला फोन करा, ती काय डॉक्टर आहे का, ती डॉक्टर आहे. याची मावशी, त्याची बहीण, त्याची आई असं ते जम्बो कोवीडमध्ये भरली गेलेली लोक आहेत. ज्या पध्दतीने विकासने हा विषय मांडला त्याला आम्ही सगळे नगरसेवक दुजोरा देतो. जर यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा तुम्ही दाखल केला नाहीततर आम्ही तुमच्यावर गुन्हा दाखल करु. साहेब याचा कुठेतरी तुम्हांला विचार करावा लागेल. कोवीड वाढलय म्हणून जम्बो कोवीड वाढवतो, कोवीड सेंटर वाढवतो पण ते वाढवताना कोण घेतय, कुठला डॉक्टर घेतो, त्याच अगोदरच रेकॉर्ड काय, तो काय करतो. जम्बो कोवीडला त्यादिवशी आपल्या वायसीएममधुन पाठवल्या गेलं, वायसीएममधुन त्याला चिठ्ठी दिली की जम्बो कोवीडला जा तुम्हांला ॲडमीशन मिळेल म्हणून. त्या पेशंटला ॲडमिशन मिळाल नाही, त्यानंतर त्यांनी मला फोन केला की सुजाता ताई मला ॲडमिशसन मिळत नाही. ही जी डॉ.प्रिती आहे ती सांगातात की डायरेक्ट पेशंट आमच्याकडे पाठवायचा नाही म्हणून. पेशंट पाठवला वायसीएमने, रिक्मन्डेशन वायसीएमकडून हे काय चालल आहे. मी नगरसेवकांना विचारेल कुठल्या नगरसेवकाना ॲटोक्लस्टरमध्ये जागा मिळाली, कुठल्या नगरसेवकाला जम्बो सेंटरमध्ये जागा मिळाली. नगरसेवक काय त्याला दोन पंख लावून शिंग लावून असा मोठा होत नाही पण नगरसेवक जवळजवळ सत्तर ते ऐंशी हजार लोकांचा एक पोशिंदा असतो तो त्यांच्यासाठी काम करत असतो, त्यांचा कार्यकर्ता असतो म्हणून सर आम्हांला बोलायची इथे वेळ आली. जम्बो कोवीड, ॲटोक्लस्टर काढून दया आणि आपल्या महापालिकेच्या चांगल्या डॉक्टराच्या हातात दया तीथला कुठलाही माणूस कुठेही जाणार नाही ती माणसे तीथेच काम करतील. वायसीएममधल्या कोवीडच्यावेळेला तिथल्या नर्सेस, आया, मावशा यांना आपण बाहेर काढल तर त्यांनी बाहेर आंदोलन केल की आम्हांला परत ठेवा, कोणी कुठे जात नाही आणि आपल्या चांगल्या सक्षम डॉक्टरांच्या हातामध्ये हे कोवीड सेंटर दया. आपल्या पीसीएमसीमध्ये तुम्ही जे काम करताना साहेब त्याच्यामध्ये तुम्ही मानाचा तुरा ओवा नाहीतर तुमच्यावर कपाळेनी कपाळमोक्ष केला, ॲटोक्लस्टरने कपाळमोक्ष केला एवढ म्हणण्याची पाळी तुमच्यावर साहेब

येणार. आज आमची एक माजी नगरसेवीका सुमन नेटके आहे तीची आई सुभदा चार दिवस झाले जम्बो कोवीडमध्ये पडलेली आहे पण त्या जम्बो कावीडमध्ये नेमक काय करतात हे तीला सुध्दा कळत नाही, आज शेवटी खांडेकर साहेबानी त्यांच्याशी कॉन्टॅक्ट करुन दिला. आज ऍटोक्लस्टरच जे प्रकरण होत तर तीथला डॉक्टर डायरेक्टली नगरसचिव उल्हास जगताप तीथले मॅनेजमेट कोऑर्डीनेटर बघतात म्हणून त्यांच्याकडे बोट दाखवतो, कस काय त्यांच्याकडे बोट दाखवू शकतात की त्यांना विचारा म्हणून, ते कोण आहेत. माई हा अंदाधुंदी कारभार चालला आहे. हा कारभार चालू देत त्यांना काय मिळायच ते मिळू देत आम्हांला फक्त आमच्या पेशंटची, आमच्या नातेवाईकांची, आमच्या रुग्णाशी आमच्या पीसीएमसीच्या नागरीकांशी आमच्याशी कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य आम्हांला पार पाडायच आहे त्यासाठी आमची आयुक्त साहेब कळकळीची विनंती आहे. मला वाटत आपण या गोष्टी केल्या नाहीतर शंभर टक्के तुम्हांला नगरसेवांच्या मोठया आंदोलनाला तोंड दयाव लागेल एवढच मी तुम्हांला इथे बोलते. त्याच बरोबर कोवीड सेंटरमध्ये जे जे पेशंट गेले त्यांच कुठलही सामान कोवीड सेंटरमधुन त्यांच्या नातेवाईकाला परत दिल गेल नाही. त्याच्यामध्ये पर्सेस गेल्या, सोन गेल, मोबाईल गेले. माझ्या शिल्पा नावाच्या मैत्रीनीच्या सास-याना जम्बो कोवीडमध्ये ऍडमीट केल, ते बोलू शकत नाहीत कारण त्यांना ऑक्सीजन मास्क लावलेला आहे, त्यांच्या बाजूला एक नर्स सुध्दा गेली नव्हती.  तीस-या दिवशी आम्ही त्यांना प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये ऍडमीट केल आणि त्यांना वाचवलं, साहेब हा कुठला कारभार. आपली महानगरपालिका आहे आपण तीथे छान पध्दतीने लीहील आहे “लोकशाहीचे हे मंदीर सुंदर, संभाषण घडो मधुर निरंतर, सत्य, न्याय, शांतीचा राहो आदर, जनहित विकासाचे गाठो तुंग शिखर” या उक्तीला तुम्ही आता बरोबर वागताय का एवढ बघण्याची ही वेळ आलेली आहे आणि जर हे तुम्ही पाहील नाहीतर पीसीएमसीमधला कुठलाही नागरीक माई आपल्याला माफ करणार नाही. मा.महापौर आणि मा.आयुक्त माझी विनंती आहे दोघांनीही तुम्हांला आता हया वेळेला सावरायच आहे हे जर तुम्ही सावरल नाहीतर आम्ही सगळेजण एकजुटीने उभे राहू आणि तुमच्या विरोधामध्ये शंभर टक्के इथे विरोध करु एवढच बोलते आणि इथेच थांबते.

मा.मिनल यादव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सर्वात प्रथम ऍटोक्लस्टर आणि जम्बो कोवीड हे कोणाच्या बापच नाहीय हे सगळयात प्रथम तीथल्या डॉक्टरानी मनावर हे केल पाहीजे कारण तीथे जे डॉक्टर्स आहेत त्यांना असं वाटत की जम्बो कोवीड आणि ऍटोक्लस्टर हे महानगरपालिकेनी आम्हांला

देवून टाकलेल आहे आम्ही त्याचे सगळे कर्तेकरवीता आहोत आणि महानगरपालिकेकडूनही आम्ही पैसे घेणार आणि सर्वसामान्य गोरगरीब जनता आहे त्यांच्याकडूनही आम्ही लुबाडायला मोकळे झालेलो आहोत. मा.महापौर मॅडम किती वेळा आम्ही फोन करतो शंभर वेळा फोन केले, ऍटोक्लस्टर, जम्बोला एखादाही आम्हांला साधा ऑक्सिजन बेड मिळत नाही. कधीही फोन करा आयसीयू नाही डॉक्टर सांगतात ताई तीथले आयसीयूचे पेशंट काढून तुम्हांला देऊ का आम्हांलाही तेवढ कळत की सिरीअस पेशंट काढून आमच्या पेशंटला तीथे जागा दया पण एकदाही तीथे जागा अव्हेलबल होत नाही. सकाळचा विषय सांगते मी ऍटोक्लस्टरच्या गायकवाड साहेबांना फोन केला की माझ्या प्रभागातला एक पेशंट सिरीअस आहे तर ते म्हणाले ताई पाठवून दया मी घेतो लगेच. त्या पेशंटला बाहेर स्ट्रेचरवर फक्त त्यांनी ऑक्सिजन लावल आणि तीथून दुसरे डॉ.प्रिती म्हणून कोणतरी आहे तीथे त्यांचा मला फोन आला की ताई त्यांना आमच्या इथे बेड अव्हेलेबल होत नाही त्यांना आयसीयू लागतो बाहेर त्यांना शिफ्ट करा. त्या पेशंटच वय ५२ आहे आणि तो आज मरणाच्या दारात आहे अशावेळेस तुम्ही काहीतरी त्याला ट्रिटमेंट देण्याच्या ऐवजी मला फोन करुन सांगता की तुम्ही बाहेर पेशंट शिफ्ट करा. मी डॉ.वाबळे सरांना फोन केला आणि म्हणाले की सर ही कुठली पध्दत आहे कामाची तुम्ही एकतर पेशंटला घेत नाहीत, चेक करत नाहीत, तीथे त्याचे नातेवाईक रडतात तो मरणाच्या दारात आहे, त्याच ऑक्सिजन ५० वर झालाय तुम्ही त्याच्यावर ट्रिट करण्याच्या ऐवजी खुशाला याला त्याला फोन करुन सांगता आमची ही जबाबदारी नाही आम्ही हया पेशंटला घेणार नाहीत. म्हणजे तुमच्याकडे लाख लाख रुपये भरले की मग तुमच्याकडून आयसीयू बेड खाली होणार आहेत का. जसे दादा बोलले काल एक लाख रुपये भरले मग आयसीयू बेड खाली झाला. हा आयसीयू बेड नक्की खाली होता का एखादा जाणारा पेशंट होता त्याचे व्हेन्टीलेटर काढल आणि या पेशंटला एक लाखभर रुपये दिले म्हणून दिलं. म्हणजे तुम्ही ठरवणार का इथ कोण जगणार आणि कोण मरणार. जम्बो कोवीडची अशी परिस्थिती आहे की तीथे गेलेला एकही पेशंट, खरच माई एकही पेशंट जीवंत बाहेर येत नाही. म्हणजे लोकांच्या मनात भीती भरली की आम्हांला एकवेळ वायसीएमला पाठवा, ऍटोक्लस्टरला पाठवा पण जम्बो कोवीडला खरच माई खुप वाईट परिस्थिती आहे. माझ्या प्रभागातील दोन नवरा-बायको जोडप होतं त्यांचा मुलगा बाहेर सकाळपासून थांबला ता म्हणत होता आतमध्ये फक्त ज्यूस तरी दया, मी फोन करुन सांगीतल आणि तो म्हणाला ताई आता आतमध्ये ज्यूस दिलय फक्त एकदा बघता का ते दिलय का ते तर मला

सांगीतल की तो पेशंट तीन तास झालेले आहे एक्सपायर झालेला आहे आणि रिसेप्शन म्हणून सांगीतल की आम्ही ज्यूस पेशंटला पाजलाय. म्हणजे तुम्ही पेशंटच्या मनाचा विचार करताय का नाही. तो पेशंट एक्सपायर झालेला आहे तुम्ही बाहेर काय बोलताय म्हणजे कोणाच कोणाला को-ऑर्डीनेशन नाही आतमध्ये तुम्ही काय करताय. आयुक्त साहेब खरच तुम्ही आलात तुम्ही व्हिजीट देता तेव्हा परिस्थिती वेगळी असेल पण अंतर्गत परिस्थिती खुप वाईट आहे. मी नंम्र विनंती करते की जे डॉ.वाबळे सर आहेत किंवा डॉ.लाठी सर आहेत ते वायसीएमच ज्या प्रकारे काम बघत आहेत, माहीती आहे की तीथेही थोडयाफार चुका होतात पण ज्या पध्दतीने काम वायसीएमला होतय त्या पध्दतीच काम ऍटोक्लस्टर आणि जम्बो कोवीडला नक्कीच होत नाही, माई नंम्र विनंती करते की अशा सगळया डॉक्टरासना काढून टाका महानगरपालिकेला सर्वसामान्य जनता पैसा देते, कर भरते आपण कुणावर उपकार करत नाहीत बेड देवून किंवा इंजेक्शन किंवा या सोई पुरवून त्यांचा तो पुर्ण अधिकार आहे. त्यामुळे अशा सर्व अधिका-यांवर आणि सर्व डॉक्टरांवर कडक कारवाई करावी, धन्यवाद.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माई, इथे बसलेल्या सगळया नगरसेवकांची आणि ऑनलाईन उपस्थित असलेल्या सगळया नगरसेवकांची एकच तळमळ आहे की माझा पेशंट. मला वाटते इथे कुणाच्या घरचा नातेवाईक नाही परंतु आम्ही ज्यावेळेला त्या प्रभागाच प्रतिनिधीत्व करतो किंवा तुम्हीही करता त्यावेळेला आपल्याला वाटत की मी पाठविलेला पेशंट, माझ्या घरातला पेशंट, माझ्या कुटूंबातला एक घटक म्हणून त्याची नक्की चांगली देखभाल झाली पाहीजे. मा.आयुक्त साहेब तुम्ही चांगल काम करताय का, आज सगळेजण बोलता बोलता निश्चितपणे तुम्हांला चांगल म्हणतात आणि आम्हांलाही असं वाटल की तुम्ही चांगल काम करताय परंतु हे चांगल काम करत असताना आम्हांला निश्चितपणे वाटतय की आम्ही भोसरीला फोन करायचा एखादा पेशंट आहे सर, ऐकाना तेवढा ऑक्सिजन बेड आहे का ते बघाना, नाही तीथे खुप गर्दी आहे बघतो काही झालतर मग डॉ.ढगेना फोन करा लगेच आम्हांला कळतय की तीथे काय कंडीशन आहे बेड होणार आहे नाही होणार हे उत्तर आम्हांला मिळत सर आणि आम्ही समजून घेतो की बाबा, ठिक आहे बाकीचे पेशंट आहेत नसेल झाली त्यांना आज व्यवस्था करायला. दुस-या दिवशी आम्ही एखादा पेशंटला पाठवल की त्याच्यासाठी जागा होते. आयुक्त साहेब एवढच नाहीतर तीथ डॉ.ढगे असतील, डॉ.म्हस्के असतील माई, इथ उल्लेख करण्याच कारण एवढच आहे की जे करतात जीथ आम्ही सगळेजण नावानिशी

सांगतो की हे वाईट आहेत तीथ सांगीतल पाहीजे की हे सुध्दा चांगलच काम करतात. सांगायच तात्पर्य एवढच आहे की त्या दोघांना विचारल आमक्या आमक्या पेशंटची काय ऑक्सिजन लेव्हल होती तर ताई, दहा मिनीट देतात आम्ही कन्फर्म करुन सांगतो, सांगायच तात्पर्य एवढच की हे असं आम्हांला इथ ऐकायला मिळतं. जिजामाता दवाखान्यात कधी पण जा तीथ डॉक्टरांना कधी पण फोन करा साहेब असं असं होतं तर ताई काही केल्या होणार नाही, प्लिज तुम्ही ऍटोक्लस्टरला पाठवता का, ताई तुम्ही जम्बो कोवीडला पाठवता का. साहेब त्या दोन दवाखान्याची नाव ऐकलीना तर म्हणतात आपला पेशंट तीकडे नाही पाठवायचा म्हणतात ते तर डेड हाऊस आहे, डेड हाऊस. तीथ माणस मारण्याच ठिकाण मा.आयुक्त साहेब इतक वाईट बोलाव लागतं त्यामुळ तीथ पेशंट पाठवताना दहा वेळा विचार करावा लागतो. खरच पेशंट कसा आहे खरच तीथ पाठवायचा का नको आपण इकडे वाबळे साहेबांना विनंती करु वाटेल ते करु परंतु आपले पेशंट आपल्या दवाखान्यामध्ये ठेवू. रुबी अलकेअर जे वायसीएमचा एक भाग म्हणून आपण चालवायला दिलेल आहे तीथही आजपर्यंत जेवढे मी पेशंट पाठवले असतील, आपल्या वायसीएमच्या आयसीयूला पेशंट पाठवले असतील त्यातला एखाददुसरा पेशंट नक्की दगावला आहे परंतु जर दहा पेशंट पाठवले आणि त्यातला एखाददुसरा दगावणं हे तुम्ही आम्ही नक्की समजू शकतो पण दहा पाठवले आणि दहाही दगावले आता सुजाताताई म्हणाल्या आम्ही सात पेशंट पाठवले आणि सातही दगावलेतर निश्चितपणे त्यांच्या कामावरती प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. मग भोसरीगावात पेशंट वाचतात, जिजामाताला पेशंट वाचतात, वायसीएमला पेशंट वाचतात आणि त्याच बरोबर रुबी अलकेअरला सुध्दा पेशंट वाचतात माई का तीथ देव आहेत का तीथ औषध वेगळी आणि बाकीच्या ठिकाणी औषध वेगळी आहेत का, काहीच नाही या ठिकाणी काम करणा-या डॉक्टरांमध्ये एक मानसीकता आहे की हे माझे पेशंट आहेत आणि यांना मी ट्रिट करणं ही माझी नैतीक जबाबदारी आहे आणि त्या भावनेतून काम करणारे डॉक्टर्स जर आपल्याकडे असतीलतर साहेब या शहरातील नागरीकांचा जीव वाचवण्यामध्ये जो काही तुमचा मा.महापौरांचा आपल्या सगळया सभागृहाचा प्रयत्न आहे त्याला कुठतरी यश मिळणार आहे. मागच्या दहा-बारा दिवसापुर्वी मी आणि सिमाताई जम्बोकोवीडला गेलो तीथे डॉ.प्रिती आहे आम्ही तेथे चार तास होतो माहीती घेण्याचा प्रयत्न केला, माहीती म्हणजे त्यांच्या चुका दाखवायच्या होत्या करेक्शन्स करायचे होते. करेक्शन यासाठी करायचे होते की जर माझा नागरीक त्या ठिकाणी जात असतीलतर माझ्या नागरीकाला चांगल्या चांगल्या सुविधा काय देवू शकतात यासाठी

त्यांच्याशी चर्चा करायची होती. आम्ही गेलो त्यावेळेला त्यांच्या चेह-यावरचे एक्सप्रेशन असे होते की आम्ही काहीतरी त्यांच्याकडे बघायलाच आलो. त्यांना सांगीतल विनंती आहे जरी आम्ही खुप विषय दोघी शोधत असलो, माहीती घेत असलो, काही विषय वाजवत जरी असलोतरी हा विषय वाजवण्याचा नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मी तुम्हांला या विषयी बोलले पण नाही आम्ही तुम्हांला याविषयी एसएमएस सुध्दा केला नाही. ठिक आहे चार चुका होतात, आज नागरीक महत्वाचा आहे. आज कुणाचा विषय चव्हाटयावर आणण्याचा विषय नाही परंतु ज्यावेळेला असं काहीतरी घडत त्यावेळेला बोलल नाही म्हणून माझा नागरीक गेला का, माझा नागरीक दगावला का, त्याच्या कुटूंबापासून तुटला का या गोष्टीची मीच कुठतरी जबाबदार आहे का म्हणून या विषयला आज कुठेतरी वाचा फुटली. अनेक नगरसेवकांना हे विषय बोलायचे असतील अनेकांनी बघीतले, अनेकजण फिरतात, अनेकजण आपल्या प्रभागातील नागरींकांना जी काही सुविधा देता येईल त्याचा प्रयत्न सगळेच नगरसेवक करतात. परंतु जर असा एक लाखाचा बेड मिळत असेलतर आम्ही सगळेजण आता आमच्या प्रभागामध्ये दवंडी पिटवतो की एक एक लाख रुपये तयार ठेवा तुम्हांला आयसीयू बेड आमच्या इकडे मिळतील. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब त्या ऍटोक्लस्टरला आम्ही गेलो तीथे आम्ही सांगीतल की आम्हांला आत व्हिजीट करायची आहे, नाही, नाही कशी व्हिजीट करता येईल तुम्हांला माहीती आहेत का आतमध्ये किती सिरीअस प्रॉब्लेम असतात ते आणि तुम्हांला इन्फेक्शन म्हणल आम्हांला दोघीनाही कोवीड होवून गेला तुम्हांला वाटत तर आम्ही पीपीई कीट घालतो पण आम्हांला आत जाऊ दया. नाही नाही असं करता करता मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तीथ आपले सुनिल पवार डॉक्टर आहेत त्यांची तीथली हातबलता हे सांगतातना ही वस्तुस्थिती आहे, हातबलता पाहतो आपण आपल्या डॉक्टरांची आहो त्यांचे वर्कर म्हणून आपले अधिकारी. आपल्याकडचे जे कर्मचारी वर्ग आहे आणि अधिकारी वर्ग आहे ते ह्या सगळया मालकांचे नौकर झालेत माझे अधिकारी. तीथ गेल्यानंतर सुनिल पवार आमचे बीचारे मी नावानिशी सांगते साहेब की ताई चलाना थोडावेळ लागेल ती त्यांची सिस्टीम जुळतेय हे बीचारा माझा अधिकारी सांगतो आणि आम्हांला आमच्या अधिका-यांची किव येते, दया येते की आमच्या अधिका-यांची अशी अवस्था का, केवीलवाणी अवस्था साहेब, आपल्याला खरतर अधिकार काय, मग साहेब आम्ही आतमध्ये गेलो. पहील स्टेटमेंट बघा मॅडम ही स्वच्छता, मी म्हणल तुम्ही डॉक्टर आहेत मी काही इथली स्वच्छता बघायला आलेली नाही मला पेशंट बघायचे आहेत मला पेशंट पर्यंत घेवून चला. नाही, नाही तरी तुम्ही

बघा डस्टबीन आमच किती क्लिन आहे, आमचा ऐरीया किती क्लिन आहे. मी म्हणल चला मला आतमध्ये जायच आहे आणि मग आम्ही ऑक्सिजनच्या बेडपर्यंत गेलो माई तीथ मी एखादया पेशंटला विचारायची ताई जेवण झाल का तर त्या येवून म्हणायच्या जेवण झालनां, साहेब ही काय दहशत एखादा सासु-सुनेचा प्रकार असतोना तसा प्रकार पाहीला मिळाला. मग मी दुस-या पेशंट कडे गेले साहेब, कसे आहात, बरे आहात का, काय होत तुम्हांला औषध वगैरे मिळालनां. एक पेशंट म्हणाला की ताई मला तीन दिवस झाल खोकला येतो मला अजून खोकल्याच औषध मिळाल नाही. अत्यंत विदारक चित्र त्या माणसाच्या चेह-यावर तो काही माझ्या वॉर्डातला नाही, माझ्या प्रभागातला नाही पण माझ्या शहराचा नागरीक नक्की होता. चिपडलेले डोळे, खोकून खोकून डोळयाची आग कळती आपल्याला त्या डोळयातन आलेल पाणी हे सगळ चित्र पाहील आणि अक्षरश: माझी बोलती बंद झाली आणि आंगावर काटे उभे राहीले. आणि मी म्हणले तीला आवरा नाहीतर इथेच भांडण होतील मग सिमाताई म्हणाल्या आमच्या आशाताई अशाच आहेत सिमाताईनी थोडयाशा गप्पा मारत तीला गुंतवण्याचा प्रयत्न केला आणि तरी त्या बाईच लक्ष माझ्यावरतीच, तीकड डोळयानी खुनावतेय आणि त्यांची ती डॉक्टर असेल, नर्स असेल, आया असेल देवाला माहीती आहे पीपीई कीट मध्ये कोण होत्या. डॉक्टर कोण, नर्स कोण काय आपल्याला कळत नाही. त्या म्हणाल्या ताई, हा माणुस आहेना दिल की बाटलीच पितो. आता जो माणुस तीन दिवसापासून मला औषधाचा थेंब दिला नाही म्हणतो तो माणूस बाटली कशी काय पिंतो, दारुची बाटली विकाता का तुम्ही. मग माझ्या समोर जायच औषध आणायच आणि त्यांना औषध दयायचं. तीथे दोन मिनीट आम्ही थांबलो, अशा एक नाहीतर अनेक पेशंटच्या व्यथा त्याठिकाणी आहेत. त्याच्यानंतर ऍटोक्लस्टर कपाळे डॉक्टर धावत पळत आलेच ज्या डॉ.कपाळे शी मी फक्त फोनवर बोलले, मॅसेजींग आपला पेशंट आहे, साहेब आजपर्यंत एकदाही मला जम्बो कोवीडमध्ये आयसीयू बेड मिळाला नाही. सिस्टीमन काम कराव लागत आशाताई, आधी पेशंट ऍडमीट होणार मग तो ऑक्सिजन बेडवर जाणार, एलजीयु वर जाणार मग ते आयसीयूवर जाणार आमचे डॉक्टर ठरवतीलना त्याच पध्दतीने. साहेब हरकत नाही ना. तुमची सिस्टीम बरोबर चालू आहे पण सर बघाना कुठे ऍडजेस्ट होते का ते, तर नाही नाही. मी मॅसेज टाकला की अमुक पेशंट तर ताई नो आयसीयू, नो आयसीयू असच उत्तर आहे आणि आम्ही सुध्दा ते प्रांजळपणे कबूल केल तुमच्याकडे तक्रार सुध्दा नाही किंवा तुम्हांला बोललोही नाही. ठिक आहे सिस्टीम आहे सिस्टीमने जावू दयात नको आपण त्यांना डिस्टर्ब नाही करायचा. धावत पळत कपाळे

डॉक्टर आले त्या डॉक्टराना बघीतल्यानंतर त्या डॉक्टरांच्या डोळयात, वागण्यात, बॉडी लॅंग्वेजमध्ये डॉक्टरकी दिसलीच पाहीजे. डॉक्टरानी पेशंटशी बोलताना पेशंटला आत्मियता वाटली पाहीजे. असं वाटल पाहीजे की माझ दु:ख त्याला सांगीतल आहे त्यावर फुंकर मारेल, मला एखाद इंजेक्शन देईल, मला एखाद औषध देईल ज्याच्यामुळे मी बरी होईल. त्यांना मी म्हणल साहेब तुम्ही कोणत्याही अँगलनी डॉक्टर वाटतच नाहीत एक व्यावसायीक कसा असतोना साहेब आणि तो व्यावसाय आज निश्चितपणे या सभागृहात तुम्हांला ऐकायला मिळतो. तीथल जेवण नागरीकांना व्यवस्थीत मिळतय का हे बघाव म्हणल. साहेब तुम्ही किती पैसे दिले ते या सभागृहातला एकही माणूस विचारणार नाही किती पैसे मोजले साहेब, मोजल्यानंतर किती रिझल्ट मिळाला ते विचारण्याचा निश्चितपणे आम्हांला अधिकार आहे कारण माझ्या प्रत्येक करदात्या नागरीकांचे इथ पै पै या शहराच्या विकासामध्ये या सगळया प्रक्रीयामध्ये लागतात त्यामुळ पैसे कितीपण जाऊ दयात साहेब रिझल्ट किती टक्के मिळाला विचारलतर ऍटोक्लस्टरला झिरो टक्के असेल. त्या दिवशी आम्ही गेलो होतो त्या दिवशी त्यांच्याकडे १४६१ पेशंट आले होते आणि १४६१ पैकी मला वाटते १९३ पेशंट त्यादिवशी त्यांच्याकडे पंधरा सोळा तारखेपर्यंत तेवढया कालावधीमध्ये साधारणत: सतरा आठरा दिवसात त्यांची लेखी चिठ्ठी आहे माझ्याकडे म्हणजे बतावण्या मारते, अंदाजे आकडे सांगते असं अजीबात नाही. १६१ पेशंट त्या दिवशी दगावले होते, डेड रेश्यो काढा तुम्ही काय डेडरेश्यो निघतो ते बघा. जर एवढे पेशंट मरत असतीलतर कशासाठी चालवायच. डॉ.कपाळे, डॉ.होळकुंडे यांच्या हाताखाली जर माझे डॉक्टर्स काम करणार असतीलतर माझ्याच डॉक्टरांना सांगाना, महापालिकेचे डॉक्टर सगळे कुवतीचे आहेत, चुका सगळयाकडून होतात परंतु माझा डॉक्टर तीथ इन्कम बघणार नाही, पैसे बघणार नाही प्रामाणिकपणे कष्ट करेल माझ्या नागरीकांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करेल त्याच्या उपर जर त्या माणसाची लाईफलाईन तेवढी असेलतर तो जाइल परंतु माझ्या डॉक्टरावर निश्चितपणे विश्वास आहे. याठिकाणी मागचा स्पर्शघोटाळा तुम्हांला माहीती आहे त्यासाठी एका अधिका-याना तीथन आपण पाठवल आहे, त्यांना घरचा रस्ता दाखवला एवढे भ्रष्ट लोक असताना साहेब आपण परत ते होळकुंडे जे आहेत ते आपल्या पालीकेतील डॉ.अंजली ढोणे या कर्मचा-यांचे पती आहेत. साहेब तुम्हांलाही माहीती आहे की जर मी नगरसेवक असेलतर माझ्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती या पालीकेच्यामध्ये काम करु शकत नाही हे कागदोपत्री सिध्द आहे हे मागच्यावेळेला सुध्दा सांगीतल परंतु डोळे बंद करुन चालुदयात. तुम्हांला किती बोलणार, किती सांगणार, किती तक्रारी करणार,

त्यांनी किती पैसे कमावले त्यांच्या खिशात किती गेले त्याच्याशी अजीबात घेणंदेणं नाही. हे पैसे ज्यांच्या खिशात जातातना त्यांनी माझ्या नागरीकाना एकदातरी चेक केल पाहीजे, एकदा तरी बघीतल पाहीजे. साहेब, ऍटोक्लस्टरला सुध्दा सेम कंडीशन आजपर्यंत होळकुंडे डॉक्टरांना किमान पन्नास फोन केलेत, माणसाचा चेहरा बघीतला, माझ सुदैव अजून माणसाला बघायची वेळ नाही आली. पण आजपर्यंत एकही पेशंट ऍटोक्लस्टरला ऍडमीट केलेला नाही. परवा एक तनपुरे नावाचे माझ्या वॉर्डातले एक गृहस्थ आहेत त्यांनी सांगीतल आज आशा  एकना माझा पेशंट ऍटोक्लस्टरला ऍडमीट केला आहे मी म्हणल अरे, कसा काय तुझ्याकडून पेशंट गेला माझ्याकडून तर एक पण होत नाही. नाही म्हणाला तो डायरेक्टली गेला आहे आणि ऑक्सिजन बेड पर्यंत झाल. तीथल्या मी डॉ.गायकवाडांचा नंबर घेतला त्यांना विचारल असा असा पेशंट आहे त्या पेशंटची आपल्याला तब्येत कळेल का तर मला त्या डॉक्टरांचा मॅसेज रायटींगमध्ये आला की ताई अमुक वेळा पर्यंत अमुक वेळापर्यंत डॉक्टरांना भेटता येतं त्यांच्याशी चर्चा करता येती, पेशंट कसा आहे याची माहीती सुध्दा आपल्याला त्याठिकाणी घेता येती आणि तेवढच नव्हेतर आशाताई त्याठिकाणी व्हिडीओ कॉलींग केल जात आणि व्हिडीओ कॉलींगवर तुमचा पेशंट दाखवला सुध्दा जातो. मी पण घाईघाईत म्हणले अरे, गणेश लगेच जा आणि आपला पेशंट कसा आहे ते बघुन ये त्याचे तीथ मामा आहेत. तीथ गेल्यानंतर माई दोन वाक्यात सांगीतल की पेशंट बरा आहे फार इम्प्रूमेंट नाही जसा आहे तसा आणि दुस-या मिनीटात त्या माणसाला पाठवून दिलं तीन दिवस झाल तो म्हणाला ताई आज तीन दिवस झाल मी जातो तीथ कसला व्हिडीओ कॉलींग नाही आणि कसल काही नाही. साहेब, किती बतावण्या किती गोष्टी याठिकाणी केल्या जाणार आहेत. आता नगरसेवकांनी सांगीतल की तुमचा एमओयू आहे सगळ सगळ सगळ मान्य मग त्यांना सांगीतल का आपण क्लिनींग ऍग्रीमेंट केल का आपण त्यांच्याशी, क्लिनींग ऍग्रीमेंट केल का. या कुणाला पण या आणि मारा आमची माणस. सांगीतल का एक लाख रुपये घ्या आणि कोणताही पेशंट घ्या हे आपल्या ऍग्रीमेंटमध्ये लिहील आहे का आपण. दबाव आणलातर म्हणतात ताई पालीकेकडून औषधच येत नाहीत. औषध का येत नाही हे लोणकर साहेबांना विचारल साहेब, घ्याना कुणाकडनही औषध घ्या डायरेक्ट घ्या पण ते औषध पोहचवा म्हणले तर लोणकर साहेबांकडन उत्तर आल की ताई आज मागणीच पत्र असेलतर उदया लगेच द्या म्हणलतर कसं देणार, सिस्टीम आहेना. जशी त्यांच्याकडे पेशंट ऍडमीट करायची सिस्टीम आहे पेशंट आला की आधि नॉर्मल बेडवर रहायच मग ऑक्सिजन बेडला मग एचडीयू आणि मग आयसीयू मग

आमच्या पालीकेत सिस्टीम नाही डॉक्टर म्हणून त्यांना कळत नाही आपल्याकडे एवढे पेशंट आहेत आपल्याला अंदाजे एवढे औषध लागतील, काहीच नाही. याठिकाणी एक नवीन धंदा शोधतात माई ते, त्यांना आता पुणे महापालिकेच्या धरतीवर औषध खरेदीपण त्यांच्याकडेच घ्यायची आहे आणि म्हणून दिवसाढवळया माझ्या पेशंटला औषध न देता मारण्याच कुरघोडी जाणीवपुर्वक त्याठिकाणी चालू आहे. कारण आता आम्ही ओरडतोतना की म्हणणार तुमच्याकडन औषध पुरवठा व्यवस्थीत होत नाही मग औषध पण मीच घेतो, पेशंट पण मीच बघतो आणि सगळा कार्यक्रम पेशंटला नदीला पोहचवण्याचा पण मीच करतो फक्त डोळया पुसण्यासाठी तुम्ही १३३ जण तीथ जावा. मा.महापौर साहेब, अत्यंत वाईट, दुर्दैवी आणि लज्जास्पद गोष्ट आहे. आज एक किस्सा सांगीतला एक लाख रुपये घेवून आयसीयू तीथ मिळतं. आज आम्ही सगळे जण रोज एकाद दुसरा एकाददुसरा आयसीयू मिळवण्याचा प्रयत्न करतो आणि असेही आमचे पेशंट पाठवतो त्याठिकाणी सगळयावरती प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का. पाप यांनी करायच, चुका यांनी करायच्या, पैसे यांनी कमवायचे आणि बदनामी का म्हणून नगरसेवकांनी घ्यायची, का म्हणून पक्षानी घ्यायची, का म्हणून सभागृहाने घ्यायची, का १३३ नगरसेवकांनी घ्यायची काय आपली चुक आहे या सगळयामध्ये. आपण तर प्रामाणिक प्रयत्न केले माझ्या नागरीकाला माझ्या शहरातल्या जो मतदार बंधुभगीनी आहे त्या सगळयांना न्याय मिळाला पाहीजे त्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध झाली पाहीजे म्हणून आपण केलेला प्रयत्न आहे. मा.महापौर साहेब, मला या सभागृहाच्या वतीने विनंती करायची आहे एक ठराव करा, सन्मा.आयुक्तांना आदेश दया की ज्या ठिकाणी कपाळे असतील, ऍटोक्लस्टरला होळकुंडे असतील तीथून त्यांचा चार्ज काढा, त्यांचा बॉस महापालिकेचे डॉक्टर असले पाहीजे. त्यांनी महापालिकेचे डॉक्टरांच्या नियंत्रणाखाली काम केले पाहीजे. तीथे निर्णय घेण्याची ताकद महापालिकेच्या अधिका-याची महापालिकेच्या डॉक्टरांची असली पाहीजे. आज आम्ही उल्हास जगतापाना विचारल साहेब, काय आहे तीथ तर ताई ऐकाना मी प्रयत्न करतो चाललय. मग त्यांच्यावर असं का अतिरीक्त आयुक्तच आहेत ते महापालिकेचे. त्यांनी तीथ असं जायच आणि मांजरागत थांबायच पण मांजर तरी का व्हायच, हरकत नाहीना लोक वाचताततना आमचा अधिकारी बाहेर थांबला तरी आम्ही ते आनंदाने ऍक्सेप्ट करु, नाही विचारलना आमच्या अधिका-यांना पण काय ट्रिटमेंट आहे, चांगल काम करतात हे जर तीथ असतना तर आमच्या अधिका-यांचा मान-आपमान सुध्दा आम्ही निश्चितपणे बाजूला ठेवणार आहोत. पण मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब तुम्हांला दोघांनाही विनंती आहे की येत्या दोन

दिवसामध्ये तुम्ही ते ऍटोक्लस्टरमधील स्पर्शचा आणि त्याचबरोबर जम्बोकोवीडचा काय निर्णय घेणार आहेत. आता आमचे नागरीक मरण्यासाठी कुणाच्या हातात पैसे देवून देणार नाहीत. पैसेतर पैसे दया आणि नागरीकांना मारा हा असला खेळ आता बंद करायला सांगा आणि माई आज तुमचे कडक आदेश याठिकाणी अपेक्षीत आहेत आपले डॉक्टरच त्याच होल ऍण्ड सोल बॉस असतील अशी व्यवस्था निश्चितपणे आपण त्याठिकाणी करावी अशी विनंती करते, थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.अॅड.सचिन भोसले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज सकाळी ऍटोक्लस्टरची बातमी वाचली आणि सकाळी ऍटोक्लस्टरला गेलो तीथ गेल्यानंतर आपले नगरसचिव साहेब त्याठिकाणी होते नगरसचिव साहेबांना विचारल की साहेब काल जो प्रकार झाला त्याच्यात थोडस सत्यता तपासण्याच काम मी केलं. आमच्या विकास भाऊन काल जावुन बाकीचे तीन जण जे डॉक्टर्स होते त्या लोकांना यांनी जाब विचारला अतीशय चांगल काम माझ्या सहकार्यानी केलं, कुंदन भाऊनी आणि विकास भाऊनी खरच त्यांची प्रशंसा करायला पाहीजे. सत्ताधारी नगरसेवक असून देखील ते फक्त आपल्या शहरातल्या नागरीकांच्या प्रश्नासाठी आणि जो अन्याय त्याठिकाणी झाला त्याला वाचा फोडण्यासाठी ते त्याठिकाणी गेले. त्या डॉक्टरांशी मी दहा मिनीटे चर्चा केली अमोल होळकुंडे होते त्यांच्या बोलण्यात कळत होत की हे नक्की डॉक्टर आहे का. सगळयात महत्वाचा विषय हा की आपण सगळेजण म्हणतो महापालिकेचे रुग्णालय चांगले आहेत, वायसीएम चांगल आहे आपल्याकडे सगळी प्रशासकीय यंत्रणा चांगल काम करते मग या स्पर्शला आपण काम दिलय याच्यामागे नक्की आहे कोण हा फार मोठा प्रश्न आहे. म्हणजे आपले १२८ नगरसेवक, आपले वैदयकीय अधिकारी, आयुक्त या सगळयांना ओव्हरटॅक करुन त्याला काम दिल जातय म्हणजे नक्की आहे कोण. दिल जातयतर दिल जातय पण त्याला मॅनेजमेंट येत तर काहीच नाही. सोप्या भाषेत बोलायच झालतर ऍटोक्लस्टर हे नागरीकांचा जीव वाचवण्या साठीच ठिकाण नाही ते डेड हाऊस झालय, डेड हाऊस. माणूस जर तीथ उपचारासाठी गेलाना तर त्याची डेडबॉडीच बाहेर येते इतकी भयानक परिस्थिती आहे. कुठल्याही प्रकारच तीथ नियोजन नाही. त्याठिकाणी बाऊंसरची काय गरज आहे ते हॉस्पिटल आहेना हॉस्पिटलमध्ये बाऊंसरची काय गरज आहे. जो माणूस चुकीच करत असेल त्याला त्या गोष्टीची गरज लागते. कारण त्याला माहीती असतं आपण चुकीच काम करतो आणि मग कोणतरी आवाज उठवल आणि तीथ येईल आणि गोंधळ घालेल त्याच्यासाठी त्यांनी काय केल तीथ

बाऊंसर ठेवलेत. आत मध्ये जर पाहीलना तर मगाशी ताईन पण सांगीतल की त्या पेशंटला ज्यूस दिल जात नाही हे एक उदाहरण नाहीतर अशी खुप उदाहरण आहेत. जम्बो कोवीडमधली खुप उदाहरण आहेत मी आता तीन दिवसापुर्वी स्वत: अनुभवलय. माझ्या जवळच्या मित्राचे वडील सेम कंडीशन तीन दिवस फक्त सांगायचे पेशंट जेवत नाही, पेशंट जेवत नाही, तुमचा पेशंट जेवत नाही त्याला आम्ही जेवण दयायला गेलो की तो जेवत नाही. माझ्या मित्राला मी म्हणलो की तु कीट घाल आणि जा तुझ्या वडीलाशी बोलतर त्याला आतमध्ये सुध्दा जावु देत नाहीत म्हणजे तुम्ही आतमध्ये नक्की करताय काय, म्हणजे फार गांभीर्याने या गोष्टीचा विचार झाला पाहीजे. सकाळी आम्ही पत्र दयायला गेलो सचिव साहेब त्याठिकाणी होते, सचिव साहेबांना सांगीतल साहेब तो जो कुणी डॉक्टर आहे आणि तो सरळ सांगतो त्याच माझ्याकडे रेकॉर्डींग आहे. त्या मयत झालेल्या आहेत वाबळे त्यांच्या जावायाच रेकॉर्डींग माझ्याकडे आहे. तो सांगतोय सरळ सरळ बोलतो की माई आमचे कुंदनभाऊ तीथ फोन करत होते तर कुंदनभाऊना त्यांनी बेड दिला नाही आणि दहा मिनीटानी दुस-या व्यक्तीला म्हणजे ज्याचा काहीही संबंध नाही असा व्यक्ती त्या हॉस्पिटलमध्ये बेड मिळवून देतो. म्हणजे तुमच आमच काहीच नाही म्हणजे आपल्या पेक्षा तीथ एक काम करणारा डॉक्टर जो लाचखोर आहे जो पैसे कमवतो त्याला हेच कळत नाही की कुठल्या सिचवेशनमध्ये आपण आता आहोत, आपल हे राज्य आपली महापालिका कुठल्या परिस्थितीमध्ये आहे, तुम्ही आम्ही सगळे जण किती तळमळीनी बोलतो. हा जो असला कारभार करणारा माणूस आहेना त्याची लायकी नाही. जो पैसे घेतो तो जाधव त्याला विचारलतर तो डायरेक्ट सांगतो की राळे आणि आणखीन एक त्याचा दुसरा सहकारी या दोघानी त्याच्यामध्ये काळाबाजार केला त्यांनी पैसे घेतले माझा त्याच्यामध्ये कुठलाही संबंध नाही मी म्हणल जावून तु फिर्याद दे. आताची परिस्थिती अशी आहे की ज्यांच्या घरातली मयत झाली त्या घरावरती शोककळा पसरलेली आहे तो व्यक्ती आज एफआयआर दयायला जावू शकतो का, जाणार नाही. तो मला फोन वर सांगतो की आजच्या परिस्थितीमध्ये माझ्या घरामध्ये सहा व्यक्ती पॉझिटीव्ह आहेत मी त्यांना म्हणलो आम्ही येतो तुमच्या घरी कारण की हा प्रश्न एका व्यक्तीचा नाही आता यांनी सांगीतल सात लोक कदाचित त्याच्या मागे खुप मोठ रॅकेट असेल त्याची चौकशी सुध्दा करणे गरजेच आहे. कारण की एक माणूस आत मयत झाली त्यांनी दु:खाच्या याच्यात बोलून दाखवल. कदाचित बरे झालेले सुध्दा लोक बरेचसे असतील त्यांना असं वाटत असेल की चला आता आपला पेशंट बरा झाला आता आपण काही कुठ बोलायला नको आपले एक लाख रुपयेतर

गेलेत. म्हणजे हे किती पेशंट बरोबर असं झालय, त्या कोवीड केअर सेंटरच्या माध्यमातून. मा.महापौर साहेब, त्याठिकाणी जेवढे पेशंट आहेत त्या पेशंटला वायसीएम किंवा दुसर एखाद महापालिकेच जम्बो कोवीड केअर सेंटर उभारा, आपली श्रीमंत महापालिका आहे आपल्याकड भरपूर पैसे आहेत तुम्ही का निर्णय घेत नाहीत. यांना समजत नाही कुठल्या वेळेला काय राजकारण करायच आहे ते, कुठ पैसे कमवायचे, तुम्ही पैसे कमवाना पण कुठ. हे मढयाच्या टाळूवरच लोणी खाण्याच काम चालल आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही आम्ही जर आज गप्प बसलोना तर आपल्याला लोक दारात नाही उभ करणार. शंभर टक्के यांचा शिव्याशाप आपल्याला लागल्याशिवाय राहणार नाही. त्याच्यामुळे माई आज तुमची माझी प्राथमिक जबाबदारी आहे जे चुकीच काम करतयना त्याला शासन झाल पाहीजे त्याच्यावरती गुन्हा दाखल झालाच पाहीजे. मी सकाळी साहेबांशी बोललो याच्यावर जर तुम्ही आज गुन्हा दाखल नाही केला, त्या स्पर्शच सगळ काम बंद करा साहेब त्यांना आठ दहा दिवसाचा वेळ द्या दहा दिवसात तुम्ही त्यांना सांगा आणि दहा दिवसात आपली दुसरी यंत्रणा उभी करा. आपल्याला महापालिकेला कुणासमोर नाक घासायची गरज नाही, आपली यंत्रणा सक्षम आहे आपल्याकडे चांगले वैदयकीय अधिकारी आहेत. चांगला स्टाफ असताना का तुम्ही यांच्यापुढे नाक घासता, आहो हे पैसे कमवायला आलेत यांना शासन झाल पाहीजे, लाज वाटली पाहीजे अशा लोकांना जे आज मढयाच्या टाळूवरच लोणी खातात. मग कुणीका असेना त्याच्या मागे. माई तुमच्याकडून एवढीच अपेक्षा आहे, या शहराच्या प्रथम नागरीक म्हणून तुम्हांला विनंती करतो की ताबडतोब आजच्या आज त्याच्यावर गुन्हा दाखल करा. त्या डॉक्टरवर पण आणि स्पर्शवर पण. कारण की एका हाताने टाळी वाजलेली नाही. पैसे घेतले ते पैसे स्पर्शपर्यंत आले आणि स्पर्शला जो कोणी त्याच्या मागे राहून मॅनेज करतो त्याच्यावर शंभर टक्के कारवाई झाली पाहीजे. तरी तात्काळ कडक कारवाई करा नाहीतर काहीपण होईल दहा गुन्हे नाहीतर शंभर गुन्हे दाखल करा आमच्यावर काही फरक पडणार नाही. तीथ जर नागरीकांचा हाकनाक बळी जात असेलना तर आम्ही हे सहन करणार नाही. मी तर नाहीच पण माझा कुठलाच नगरसेवक ते सहन नाही करणार. पक्षाचा विषय येत नाही एक माणूस आहे इथ तुम्ही आम्ही काम करतो. आपल्याला याच्यावरती आज कारवाई करण गरजेच आहे. आजच्या आज त्याच्यावर गुन्हा दाखल करा एवढीच या सभागृहाच्या माध्यमातून तुम्हांला कळकळीची विनंती करतो. दुसरा एक विषय आहे ज्या पध्दतीने आपल्या आयुक्तांनी एक निर्णय घेतला की आपल्या हॉस्पिटलला ऑक्सिजन प्लान्ट उभारतोय. साहेब थेट पध्दतीने काम दयायची काय पध्दत आहे हो,

तुम्हांला शॉर्ट टेंडर करता येत नाही का, शॉर्ट पिरीएड नोटीस तुम्हांला काढता येत नाही का. माई काय होणार आहे तुम्ही आम्ही आता दुर्लक्ष करतो या सगळया गोष्टीचा फायदा हे घेतात. तुम्ही दयाना दोन तीन दिवसाच टेंडर येवू दयातना लोक. एकाच माणसाला डोळयासमोर ठेवून काम का देता तुम्ही. भरपूर लोक आहेतना काम करायला, आख्ख्या राज्यात खुप लोक आहेत. कितीतरी कंपन्या आहेत त्या तुमच काम याच्यापेक्षा कमी पैशात करुन देतील. या परिस्थिती मध्ये माई तुम्ही आम्ही जास्त ॲप्रोच करु शकत नाहीत. आयुक्त साहेब प्रयत्न करतात सगळी मेहनत करतात परंतु यांच्याकडे ते समोर तेवढे अव्हेलेबल होत नाहीत. दुसरी गोष्ट आता बऱ्याच स्मशानामध्ये वेटींग होत आठ-आठ, दहा-दहा तास लागत होते एक एक बॉडीला त्याच्यावर सुध्दा कितीतरी लोकांच्या तक्रारी आल्या की आमच्याकड तीथ पैसे घेतात. तुम्ही सहा हजार रुपये देवून थेट पध्दतीने काम दिल. मयत जाळायला किती रुपये लागतात माहीती आहे का, एक बॉडी जळायला किती रुपये लागतात, सात मन लाकड लागतात आणि तीनशे ते पाचशे गवरी लागते त्याच्यावर गवरी लागत नाही, ४२०० रुपये मयतीला खर्च येतो कशासाठी तुम्ही सहा हजार रुपये देता. ही परिस्थिती अशी आहेना तुम्हांला माहीती आहे लोक लक्ष देणार नाहीत पण हा महत्वाचा विषय आहे. तीथपण गलथान कारभार आहे तुमच्याकड आकडेवारी नाही किती लोक कोरोनानी गेलीत याची आकडेवारी तुमच्याकडे आहे का म्हणजे हा सगळा भोंगळ कारभार चालला आहे. या परिस्थितीमध्ये आम्ही सगळे नगरसेवक काम करतो परंतु डायरेक्ट ॲप्रोच कुणाला करता येत नाही. भीती वाटते की बाबा चला एकत्र जावून तीथ गर्दी केलीतर आजून काहीतरी वेगळा प्रकार होईल आणि याचा फायदा हे ठेकेदार घेतात. ४२०० च्या वर एक मयत जाळायला पैसे लागत नाहीत एवढ मी तुम्हांला सांगतो. ४०० रुपये मन लाकूड आहे आणि ५ रुपयाला एक गवरी आहे तुम्ही कशी काय १० रुपयाला गवरी घेता. या कोरोनाच्या काळामध्ये जे पाप करतातना हे शंभर टक्के इथच फेडून जाणार आहेत. पण तुमची आमची जबाबदारी आहे सत्य काय आहे, खर काय आहे का योग्य आहे जे योग्य असेल त्याच्यावरती आपण कारवाई केली पाहीजे. आयुक्त साहेब तुमच काम चांगल आहे एवढीच एक अपेक्षा आहे सरळ मी विनंती करतो की या स्पर्शला येथून पुढे आठ ते दहा दिवसाची मुदत दया आणि आपली यंत्रणा तीथ उभी करा. आपल्याकडे डॉक्टर घ्या, डॉक्टराना आता ५०-६० हजार दिलेतरी ते येत नाहीत दयानां एक एक लाख रुपये पगार चांगले डॉक्टर जर महापालिकेला मिळालेतर आपल्या लोकांचा जीव वाचणार आहे तुम्हांला पुण्य लागल. लोकांचे ऑक्सिजनपायी, व्हेन्टीलेटरपायी जीव जातात. आपण लोकांना

उत्तर नाही देवू शकत. त्याच्यामुळे माई आणि आयुक्त साहेबांना सुध्दा विनंती आहे की याच्यावर लवकरात लवकर निर्णय घ्या आणि आजच्या आज गुन्हा दाखल झाला पाहीजे स्पर्शवर पण आणि वाल्हेकरवाडीतल ते कुठल हॉस्पिटल आहे त्याच्यावर पण आजची आज गुन्हा दाखल झाला पाहीजे नाहीतर उदया आमच्या शिवसेना स्टाईल आम्ही दाखवतो काय आहे एवढीच विनंती सभागृहाच्या माध्यमातून करतो आणि थांबतो.

मा.अंबरनाथ कांबळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमचे सहकारी नगरसेवक कुंदनभाऊ, विकासदादा, आता बोललेले सचिनभाऊ, आशाताई, पलांडेताई आणि यादव ताई. आमच्या पिंपरी चिंचवडमध्ये १३३ नगरसेवक आहेत. आयुक्त साहेब पिंपरी चिंचवड शहरातला प्रत्येक नागरीक हा नगरसेवकाजवळ येवून त्याच्या आडचणी मांडतो आणि तो नगरसेवक त्या अडचणी सोडण्याचा प्रयत्न करतो. आता जे काही  नगरसेवक बोलले ती गंभीर परिस्थिती आहे मला काही जास्त बोलायच नाही विकास भाऊनी जे काही बोलायच आहे ते बोलून दाखवलेल आहे. मी मागच्या पण लॉकडावूनला सांगीतलेल होत की आमचे १३३ नगरसेवक असतील आमचे जेवढे कोवीड सेंटर असतील किंवा महापालिकेचे जे काही दवाखाने असतील तीथ आत जाण्याची आम्हांला परवानगी मिळावी कारण काय होत त्या पेशंटचा माणूस बाहेर असतो आणि तो नगरसेवकांना सांगतो की माझा पेशंट आत आहे त्याची परिस्थिती अशी आहे त्याला जेवण नाही, परिस्थिती बेकार आहे. तो माणूस कन्टीन्यू आमच्याकडे येवून सांगतो मी त्या डॉक्टरांना वेळोवेळी फोन करतो. आता विकासभाऊनी आणि कुंदनभाऊनी सांगीतल की जम्बोमध्ये जे कोण पवार डॉक्टर आहेत त्यांना आम्ही दहा दहा फोन करतो ते नगरसेवकांच्या फोनचा विचार पण करत नाहीत. माझी सभागृहाला विनंती आहे की आमच्या १३३ नगरसेवकांना जम्बो कोवीड सेंटरमध्ये जाण्याची परवानगी मिळावी ही परवानगी मिळाली नाहीतर जे जम्बोच्या बाहेर बॉडीगार्ड ठेवलेले आहेत आणि हे जम्बोवाले कोण असतील त्यांचा विचार आम्ही आमच्या स्टाईलने करु. आयुक्त साहेब आमचा पेशंट कुठेही ऍडमीट असु दयात नागरीक आम्हांला सांगतात, नागरीकांचा जीव धोक्यात असतो आणि ते सर्व गोष्टी येवून आमच्यापाशी सांगतात. त्यांचा जीव आम्हांला महत्वाचा आहे, आमचा पण जीव आम्हांला महत्वाचा आहे किंवा नाही पण जेव्हा आमचा नागरीक आम्हांला कोवीड सेंटर मध्ये बोलवील तेव्हा आम्ही कोणताही नगरसेवक त्या कोवीडमध्ये आत जाणार कारण नागरीकांपेक्षा आम्हांला आमच्या जीवाच एवढ महत्व नाही कारण

नागरीकांचा जीव मला महत्वाचा आहे म्हणून १३३ नगरसेवकांना आतमध्ये जाण्याची परवानगी मिळावी. ज्यांना जायच ते जाणारच आणि मी मनापासून सांगतो आपल्या महापालिकेचे जेवढे डॉक्टर आहेत डॉ.वाबळे असतील, डॉ.गोफणे असतील, सर्व वायसीएमचे एवढ सुंदर काम करतात की एकदम चांगले काम करतात, कोवीडवाल्यांना कशाला आपण पोसतो. तीथ लोक मरतात किती काही काही गोष्टी घडतात तीथ, जेवण नाही व्यवस्थीत, कसली नीट सुविधा नाही आणि त्याच्यात आमच्या सारख्या नगरसेवकांना पण आत जाऊं देत नाहीत. मा.महापौर आणि मा.आयुक्त साहेब उदया पासून मी प्रत्येक कोवीड सेंटरला व्हिजीट देणार आणि कोणत्या नागरीकांनी काय बोलल त्याची सगळी कॅसेट व्हिडीओ आणून दाखवणार आणि त्याच्यातूनही आम्हांला आत सोडल नाहीतर आम्ही आमच्या पध्दतीने वागायचा प्रयत्न करणार मला बोलायला संधी दिली त्याबद्दल मी तुमच मनापासून आभार व्यक्त करतो.

मा.निता पाडळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. गेल्या आठ दिवसापूर्वी मी आयुक्तांना फोन केला होता की नेहरुनगरमध्ये माझ्या वॉर्डमधली एक लेडीज आहे ती तीच्या दिरासाठी बेड मिळावा म्हणून सगळी कडे फिरत होती ती नेहरुनगरच्या जम्बोला गेलीतर तीथल्या एकाने तीला सांगीतले की मला तीस हजार रुपये द्या तीस हजार रुपये दिल्याच्यानंतर तुम्हांला बेड देतो. ती लेडीज इतकी गरीब होतीना की तीने मला रडत रडत फोन केला की ताई मी कुठून तीस हजार रुपये आणणार इथे मला हे तीस हजार रुपये मागतात तर मी म्हणल फोन द्या तर ती म्हणाली फोन घेत नाहीत. एवढा सगळा प्रकार झाल्याच्यानंतर मी आयुक्तांना दुस-या मिनीटाला फोन केला की आयुक्त साहेब आपल्या नेहरुनगर जम्बो कोवीडला असा असा प्रकार चालला तर आयुक्त साहेब म्हणाले मॅडम आता बाहेरची लोक कोणी एजंट काय करत असतील ते आम्ही नाही सांगू शकत हे मला आयुक्तांच उत्तर मिळाल. मी आयुक्त साहेबांना सांगीतल तीथ आपले अधिकारी पाठवा पण काहीतरी करा तीस तीस हजार रुपये देवून बेड देतो म्हणतात मग काय करायच तर हे चुकीच आहे. दुसरी एक घटना जम्बोची मी तुम्हाला सांगते माझ्या शेजारी अनिल नढे म्हणून राहत आहे तर माई इतकी छोटीछोटी मुल त्याची होतीना आणि त्याला कोरोना पॉझिटीव्ह आल्याच्यानंतर जम्बोला ऍडमीट केल होतं तर त्याच्याकडे चार दिवस अक्षरश: कोणत्याही डॉक्टरानी पाहीलेल नाही. शेवटी तो मरण्याच्या आदि दोन दिवस कन्टीन्यू त्याच्या बायकोकडे फोन करत होता की मला येथून काढ, मला प्रायव्हेटमध्ये ने, मला इथ नको, मी इथे मरेन आणि शेवटी त्याची बायको

माझ्याकडे येवून रडत होती की ताई मी काय करु माझ्याकडे पैसे पण नाहीत. मी तो सुध्दा त्या पेशंटचा नावासहीत आयुक्ताकडे मॅसेज पाठवलेला आहे. तो पेशंट चारवेळा जम्बोमध्ये चक्कर येवून पडला. कोणी सुध्दा त्याच्याकडे पाहीला गेलेल नाही. मरण्याच्या शेवटपर्यंत तो त्याच्या बायकोला फोन करुन सांगत होता की मला इथून ने, काहीतरी कर, मी चारवेळा चक्कर येवून पडलो तरी सुध्दा माझ्याकडे पाहील नाही. इतकी छोटीछोटी त्याची मुल आहेतना मोठा मुलगा आठ ते नऊ वर्षाचा असेल आणि छोटा मुलगा चार ते पाच वर्षाचा आणि तो रिक्षा चालवून कसतरी पोट भरायचा. अक्षरशा त्या कुटूंबावरती इतकी वाईट वेळ आली याला जबाबदार फक्त हे जम्बो कोवीड आहे. मी तर सांगते काळेवाडीतले जेवढे पेशंट जम्बोमध्ये गेलेना तेवढयांचे प्रेतच बाहेर आलेले आहेत कुणी पेशंट जम्बोमध्ये जगला नाही. आज डॉ.वाबळे असतील, डॉ.गोफणे असतील आज गोफणे साहेबांचा कुठेही संबंध नाही ना ऍटोक्लस्टर तरी कोणत्याही हॉस्पिटलमधीली माहीती जर आम्ही एखादया पेशंटची जर मागीतलीतर दहा मिनीटात गोफणे साहेब मला त्या पेशंटची ऑक्सिजन लेव्हल ते सगळे रिपोर्ट सांगतात. यादव म्हणून पेशंट ऍटोक्लस्टरला आहे अक्षरशत: मी पाच वेळा फोन केला ते होळकुंडे डॉक्टर आहेत त्यांनी नंबर दिला की ताई इथे इन्क्वायरी करा मी पाच ते सहा वेळा फोन केला परंतु ताई आम्हांला त्या पेशंटची हिस्ट्री आम्हांला देता येणार नाही सांगीतल, दुस-या दिवशी सकाळी मी परत फोन केला प्लिज मला त्या पेशंटच्या नातेवाईकाना सांगायच आहे ते येवून बसलेले आहेत तेव्हा सुध्दा फोन केलातर त्यांनी मला उत्तर काय दिल की एक ते तीनमध्येच तुम्ही इन्क्वायरी करु शकता आता आम्ही तुम्हांला सांगतो मग त्यांनी मला पेशंटची ऑक्सिजन लेव्हल ९६ आहे एवढच मला सांगीतल आता आम्ही सांगू शकतो पण एक ते तीन हीच वेळ इन्क्वायरीची आहे त्यावेळेस तुम्ही पेशंटच्या नातेवाईकाना सांगा, कुणालाही सांगा त्याचवेळेत फक्त इन्क्वायरी होवू शकते नंतर आम्ही इन्क्वायरी करु देत नाही. तर माई असा जो काही तीथे प्रकार चाललेला आहे हा पुर्णपणे चुकीचा आहे. अक्षरश: माई प्रत्येक माणूस आपल्याकडे आशेच्या नजरेनी बघतो. प्रत्येक कुटूंबामध्ये आज पाच-पाच, सहा-सहा पेशंट पॉझिटीव्ह आलेले आहेत. माई, माझ्या वॉर्डमधलेतर एका घरामधले दोन-दोन लोक गेलेले आहेत इतकी वाईट परिस्थिती त्यांच्यावरती आलेली आहे. परंतु लोक इतके हवालदिल झाले त्यांना वाटत नगरसेवकांना सांगीतल्यावर आपल्या पेशंटला व्यवस्थित ट्रिटमेंट मिळेल ऍटोक्लस्टरला, जम्बो कोवीडला परंतु तीथे अक्षरश: काही ट्रिटमेंट होत नाही. पेशंटला सुरवातीला अक्षरश: कसल्यातरी बेडवर झोपवतात दुस-या दिवशी वाटलतर काहीतरी करतात आणि

आपण विचारल तीथल्या डॉक्टरांना वगैरे तर म्हणतात आमच्या आमच्यात ते शिफ्टींग करतो. कपाले म्हणून आहेतना त्यांनी फोन उचलायला सुध्दा एक पीए ठेवलेला आहे. कन्टीन्यू त्याची पीए कोणतरी लेडीज आहे ती म्हणते साहेब मिटींगमध्ये आहे तुमच काही काम असेलतर मॅडम आम्हांला सांगा, मॅसेज करा आणि मॅसेज केल्यावर आता बेड अव्हेलेबल नाही साधा बेड आहे. आयसीयू लागत असेलतर आम्ही फोन करतोना. साधा बेडतर पेशंटला पण मिळतो. आपण व्हेन्टीलेटर खरेदी करतो एवढ सगळ करुन जर आपल्या नगरसेवकांना एखादा बेड जर कधी लागलातर तो मिळत नाही. माई मी त्या दिवशी मिटींगमध्ये आयुक्तांना पण म्हणल की आयुक्त साहेब कुठतरी नगरसेवकांचा कोणता पेशंट असेल, अर्जन्सी असेलतर त्या पेशंटला एखादा बेड तुम्ही देतजा. आयुक्तांना फोन केलातरी सुध्दा बेड मिळत नाही. आयुक्त साहेब सांगतो म्हणतात पण काही नाही. माई माझी आपणाला हात जोडून विनंती आहे की हे जे लोक आहेतना पैसे देवून बेड देतात हे करतात ते करतात हे कुठेतरी थांबल पाहीजे. आपल्याला पेशंट वाचवायचे आहेत. ३५ ते ४५ वयोगटातील लोक जास्तीत जास्त मरणा पावतात. असे जर तरुण तरुण जायला लागलेतर त्यांचे घर पुर्ण उध्दवस्त होणार याकड आपण पाहील पाहीजे मला बोलायला दिल्याबद्दल मी आपले आभार मानते.

मा.अभिषेक बारणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर प्रथम मी पत्रकार बंधुना अशी विनंती करीन की आम्ही जी आता चर्चा करतो तो आम्ही आमचा राग आणि रोष व्यक्त करतो आणि हा राग आणि रोष कुठल्या सेंटर्स बद्दल करत असल, व्यवस्थेवरती करत असलतर याची कृपया प्रसिध्दी होवू नये याच्यामुळ लोक अजून घाबरतील. आताची कालची परिस्थिती माझ्या अगोदर सभागृहातले सदस्य बोललेले आहेत. आयुक्त साहेब या आमच्या सगळयांच्या व्यथा आहेत. अशी परिस्थिती झालेली आहे की अंस वाटतय की आपण नगरसेवक झालो नसतोतर परवडल असतं आणि येणा-या काळात हे जर बदलणार नसेलतर आमचे आता राजीनामे घ्या. माई, आज मागच्या वर्षाच्या नियोजनामध्ये आणि या वर्षाच्या नियोजनामध्ये एवढी तफावत कशी काय. आयुक्त साहेब आम्ही तुम्हांला एकच सांगतोत की मागच्या वर्षीच जे नियोजन होत आणि या नियोजना मध्ये काय तफावत घडतेय तर बाकीच्यांचे पण सल्ले घ्या. त्यांना देखील विचारा की काय काय केलं होत, कुठला कुठला अधिकारी कशाकशासाठी अपॉईंट केला होता. आज तुम्ही जो वॉररुमचा सुरवातीला नंबर दिला आहे आणि नंतर यंत्रणा कामाला लागली. सगळयांना सांगून टाकल की या

नंबरवरती फोन करा शहरातील नागरीकना सांगायची की बेड नाही, बेड नाही, बेड नाही आणि त्यावेळेस फोन उचलले जात नव्हते त्यानंतर त्यात तुम्ही सुधारणा केली त्याबद्दल तुमचे आभार पण ते वारंवार आम्हांला सांगाव लागलं त्याच्यानंतर आम्ही तुम्हांला सुचवल की प्रत्येक हॉस्पिटलला बेड अव्हेलेबल होत नाहीतर त्याठिकाणी आपले प्रभागातील जे ज्यूनिअर ईंजिनीअर्स आहेत त्यांना अपॉईंट करा त्या त्या हॉस्पिटलला ते ते ईंजिनीअर ठेवा आणि त्याठिकाणी खरच बेड अव्हेलेबल आहेत का नाही याची शाश्वती होइल. त्यासाठी ती लोक खुप चांगल्या पध्दतीने काम करतात सवणे साहेब त्यांचे हेड आहेत ते खुप चांगल काम करतात त्यांच आभार. मी तुम्हांला वारंवार विनंती करतो की आयुक्त साहेब हेल्प डेस्क चांगल्या पध्दतीचे तयार करा. आज वायसीएमला आहे मग जम्बो कोवीडला का नाही. कालच तुषार आमच्या बरोबर असताना आम्ही तीथे गेलो होतो. आज सामान्य नागरीक तीथ गेलातर हेडीसफेडीस होते त्याठिकाणी आपला अधिकारी असला, एक मदत कक्ष असला की त्याला काय पाहीजे त्या नागरीकांची काय समस्या आहे, बेड आहे का नाही त्याची अव्हेल्याबीलीटी काय आहे याची आम्ही तुम्हांला सुचना करतो ते देखील तुम्ही करायला तयार नाहीत. आज निताताईनी सांगीतल की तीस ते चाळीस वयोगटातील युवक जातात जाण्या मागचा प्रमुख कारण काय. आज तुम्हांला डेड रेश्योवरती कंट्रोल नाही आणि तुम्ही दर आठवडयाला त्याची मिटींग घेता मग त्याच्यावरती उपाययोजना करतो काय आपण. तुम्हांला सांगीतल्यानंतर तुमच्याकडन उत्तर येत की आपल्याकडच बाकीच्या पेक्षा चांगल आहे, बाकीच्या पेक्षा चांगल म्हणजे काय. काल एका किर्तनातल्या महाराजानी सांगीतल की पुणे आणि मुंबई याठिकाणी जर कोरोना नसतातर अख्ख महाराष्ट्र पोसायची इथली ताकद आहे. आपल्याकडे भरपूर बजेट आहे तरी देखील आपण कमी पडतो म्हणजे तुमच्या कार्यपध्दतीवर काहीतरी चुकतयना. आज आम्ही तुम्हांला वारंवार सांगतोय की आयुक्त साहेब तुम्ही जी लोक पॉझिटीव्ह सापडतात त्यांना त्वरीत जे कोवीड सेंटर केले आहेत त्याठिकाणी ॲडमीट करा. पॉझिटीव्ह पेशंट शहरामध्ये वाढतात त्याच्यामुंळे हे नंबर वाढतात, त्यांना आठ दहा दिवस तीथ राहू दया. जे सीसी सेंटर केलेले आहेत त्याठिकाणी अजून आठशे ते हजार खाटा शिल्लक आहेत त्या ठेकेदाराना आपण ८०-८० टक्क्यांनी बील देणार आहेत मग शंभर टक्के क्षमतेन ते भरु दयाना. त्याठिकाणी मागच्या वर्षीसारखी यंत्रणा लावा पॉझिटीव्ह पेशंट सापडला की त्याला विनंती करा त्याला कोवीड सेंटरला नेऊन ॲडमीट करा म्हणजे तो चार ठिकाणी फिरणार नाही त्याच्या घरातली लोक पॉझिटीव्ह होणार नाहीत, त्याला जास्त त्रास होणार नाही. प्राथमीकतेवर

त्याच्यावर उपचार होतील चार गोळया त्याच्या पोटामध्ये जातील. आज ज्यावेळेस त्याची लेव्हल ८०-८५ वरती खाली येते आणि तेवढी लेव्हल खाली आल्यानंतर तो ऑक्सिजन बेड शोधतो. वयोगट वीस आणि चाळीस मधल्यामध्ये ताकद असल्यामुळे त्याची ८०-८५ लेव्हल येईपर्यंत तो तग धरतो आणि तो फिरत असल्यामुळे नंतर त्याला बेड भेटत नाही बेड नाही भेटली की डायरेक्ट ऑक्सिजन ऑक्सिजनच डायरेक्ट व्हेन्टी आणि व्हेन्टी लागल्यानंतर तो परत येतच नाही. माई, काल माझ्या एक जवळचा मित्र त्याच वय ३२ चार दिवसापुर्वी कळल की तो पॉझिटीव्ह आहे त्याला म्हणल तु ॲडमीट का नाही झाला तर तो म्हणाला मला काहीच त्रास होत नाही, त्याला म्हणल पहील सीटी स्कोर करुन घे, स्कोर केलातर त्याचा सतरा स्कोर आला नंतर त्याला म्हणल पहील ॲडमीट हो, ॲडमीट झाला, ॲडमीट झाल्यानंतर तीस-या चौथ्या दिवशी जेव्हा त्याला जास्ती झाल तवा त्याला व्हेन्टीची गरज पडली आणि आता तो इथ नाही. मग तुम्ही पेशंट खराब होऊ दयायची वाट का बघता. तुम्हांला हे सांगीतलतर तुम्ही म्हणतात की शासनाचे नियम आहेत होम आयसोलेशन करा. आहो, शासनाचे नियम जरी असलेना तरी या महापालिकेचे आयुक्त म्हणून तुम्ही सर्व निर्णय घेवू शकता. तुम्हांला निर्णय घेता येत नसतीलतर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा तुमच्यावरती दाखल झाला पाहीजे. तुम्हांला आम्ही सांगतो, सोसायटी मधील लोक दहा वेळा फोन करुन सांगतात हया बिल्डींगमध्ये दहा जण पॉझिटीव्ह आहेत, त्या बिल्डींग मध्ये बारा जण पॉझिटीव्ह आहेत तीथ काहीतरी एखादा बोर्ड लावा मागे आपण करायचो की मिनी कण्टॅन्मेंट झोन तस डिक्लेअर करा, पण तस काहीच नाही ही सिस्टीमच नाही. एका पॉझिटीव्ह पेशंटच्या मागे पंधरा जण कॉण्टॅक्ट मध्ये येतात त्यांची आम्ही चाचणी करतो म्हणून सांगतात, कुठ आहे ती चाचणी, चाचणीच दिसत नाही ती. मागच्या वर्षी आम्ही ज्यावेळेस कोवीड काळामध्ये काम करत होतो त्यावेळेस एखादा पॉझिटीव्ह पेशंट आलारे आला की तीथले जे डॉक्टर असतात ते त्यांना रेफरसीट दयायचे की बाबा तुम्हांला या या सेंटरला न्यायच आहे त्यांच्यासाठी विशेष ॲम्ब्युलन्स बुक केल्या होत्या विशेष सत्तर ते ऐंशी गाडया घेतल्या होत्या. त्याला मध्ये पार्टेशन टाकल होत पाठीमागे तो बसायचा आणि कोवीड सेंटरला नेऊन सोडायचो आता आम्हांला त्या गोष्टी करायला लागतात. आमच्या प्रभागातला एखादा पॉझिटीव्ह पेशंटला पोहचवायला आम्हांला आमच्या स्वत:च्या गाडया वापरुन पोहचवावे लागते. करण्या बद्दल आम्हांला वाईट वाटत नाही पण ते जेवढयाप्रमाणात व्हायला पाहीजे ते होत नाही. आज हे आपल घर आहे आणि आपल्या घरातल्या लोकांना सगळ हे झाल आहे. आज मी बोलतो उदया मी

असेल का नाही बोलायला अशी परिस्थिती झालेली आहे आयुक्त साहेब. आणि जर तशी परिस्थिती असून तुम्हांला हे काम जमत नसेलतर किंवा करता येत नसेल ब-याचशावेळा तुमच्यातुन बोलणारी भावनीक शब्द आहेत आम्हांला बोलूशी वाटत नाही की का बोलायच हा पण माणूस तेवढाच पळत असेल. परत नंतर घरी गेल्यावर विचार केला की, नाही बोललच पाहीजे ते आयएएस आहेत त्यांची जबाबदारी आहे आणि यांची जबाबदारी यांना करता येत नसेलतर उपयोग नाहीना. आम्हांला राज्यसरकार काय करतय, केंद्र सरकार काय करतय, तीकडच्या रेमडेसिवीर येतात का नाही त्याच काय होत याच्याशी घेणं देणं नाही. आज आपण शहरामधल्या दोनशे ते आडीचशे हॉस्पिटलला कोवीडच्या परवाग्या दिल्या होत्या. मी मागच्या आठवडयात आपल्याला सांगत होतो की आपल्याकडे काही रेमडेसिवीर स्टॉकला आहे त्याच्यातले किमान बाहेरचे प्रायव्हेट हॉस्पिटल आहेत जे व्हेन्टीवरती यांना किमान एक एक डोसतरी दया. तुम्ही आम्हांला कारण काय दिल की दोन दिवसानंतर आपल्याला कमी पडणार आहे मग आपण काय करणार. आपल्याला कमी पडणार म्हणजे कुणाला कमी पडणार शहरातल्याच नागरीकांना कमी पडणारना. मग काल जो व्हेन्टीवरती प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये जो माणूस रेमडेसिवीर साठी गेला तो कुणाचा गेला तो आपला गेला नाही का. एवढतरी तुम्हांला कळल पाहीजे की आपली यंत्रणा स्ट्राँग म्हणजे काय. शहरातल्या प्रत्येक हॉस्पिटलची जबाबदारी आपली आहे, त्यांना काय कमी पडतय काय नाही ते दयायची सुध्दा जबाबदारी आपली आहे. आपण त्यांच्यावरती कंट्रोल ठेवण्यासाठी आपल्या महापालिकेचे जे जेई अपॉईंट केले तेच आम्ही काम करतोत मग आपण का करु शकत नाही. आम्ही तुम्हांला वारंवार विनंती केली की त्याठिकाणी रेमडेसिवीर लागतात किमान जे व्हेन्टीवरती असतील त्यांचा स्कोर दहा पंधराच्या वरती गेला असेल त्यांना तरी तुम्ही आपल्याकडचे रेमडेसीवीर दया, नाही मग उदया आपल्याला कमी पडेल, उदया आपल्याला कमी पडेल हे मान्य मग एक पॉलीसी करा की दहा स्कोरच्या वरच्यांना दयायची, बारा स्कोरच्या वरच्यांना दयायची, चौदा स्कोरच्या वरच्यांना दयायची काहीतरी ठरवा याच्यामध्ये काहीच ताळमेळ नाही. तुम्हांला आमही वारंवार सांगतो की या सगळया गोष्टीकडे तुम्ही लक्ष दया, लक्ष दया तरी तुम्ही देणार नाहीत तर काय अर्थ आहे. आता तुम्ही हे मान्य करणार आहेत की नाही हे माहीत नाही की पॉझिटीव्ह लोक येतात त्यांना तुम्ही क्वॉरंटाईन सेंटरला नेणार, त्यांना ॲडमीट करणार का नाही करणार. मा.महापौर साहेब, मी एकच सांगतो की जे पेशंट पॉझिटीव्ह येतात माझी एक विनंती आहे बाकीच्या गोष्टी आपल्या ब-या पैकी सॉल्व्ह झाल्यात. दुसर असं की जम्बो कोवीड सेंटरच काम

काढायच तुम्ही म्हणताय थेरगाव हॉस्पिटल, आकुर्डी हॉस्पिटल, जिजामाता हॉस्पिटल, भोसरी हॉस्पिटल हे पुर्ण क्षमतेनी आपण जोपर्यंत चालू करत नाहीतना तोपर्यंत या बाकीच्या कामाच्या तुम्ही नादीच लागू नका. आज तुम्ही ते चालू करताय ते पन्नास पन्नासच करायच का सत्तरच करायच हा विचार करताय आता पहील्या टप्प्यात पन्नास करु नंतर सत्तर करु निश्चित तुमच हे बरोबर आहे तुमच म्हणण आहे की ऑक्सिजनचा तुटवडा आहे मग ऑक्सिजनचा तुटवडा आहे आपल्याकडे एवढ इन्फ्रस्ट्रक्चर आहे इथली पहीली आपण पुर्ण व्यवस्था केली पाहीजे. काल परवा आपण नवीन हॉस्पिटलच्या परवानग्या बंद केल्या, काल परवा पर्यंत आपण त्याना परवानग्या दिल्या आडीचशे ते तीनशे या शहरात आता नवीन हॉस्पिटल चालू झालेत. हॉस्पिटलची निश्चित गरज आहे पण त्याच्या दर्जाच काय, दर्जा कोण चेक करणार. आपल्याकड बेड आहे, आपल्याकडे प्रॉपर्टी आहे फक्त ऑक्सिजन अभावी आपण त्या क्षमतेनी चालू करु शकत नाहीत मग त्यांना ऑक्सिजन कुठून भेटणार आहे. आज ते सुध्दा ऑक्सिजनमुळे बरेचशे पेशंट घेत नाहीत. माझी एवढीच विनंती आहे की पहीला माझा एकच मुद्दा आहे की कॅण्टोन्मेंट झोन, मिनी कॅण्टोन्मेंट झोन हे करणार आहेत का नाही करणार, प्रत्येक पेशंट पॉझीटीव्ह आल्यानंतर खरच शहानिशा करा, शासनाचा जीआर आहे शासन असं पण म्हणत की त्याची रुम सेप्रेट पाहीजे, त्याची रुम सेप्रेट असताना त्याची काळजी घेणारा एक माणूस घरात पाहीजे. त्याच्यानंतर शासन असं पण म्हणत की त्याच्या रुमला चार खिडक्या पाहीजे ते वार तीथ खेळतं पाहीजे हे सगळ म्हणतात तरच तो घरात राहु शकतो मग ही शहानिशा आपण करतोय का. यासाठी सोपा पर्याय आहे की जो मागच्या वेळेस आपण केला होता, पेशंट पॉझिटीव्ह आला की त्याला गाडी घरी पाठवा आणि त्याला कोवीड सेंटरला ऍडमीट करा. चार दिवस त्यांनी औषध खाल्ल्यानी त्याचा जो सिटीस्कोर आहे तो वाढणार नाही. तो चार ठिकाणी फिरणार नाही तो चार ठिकाणी स्प्रेड करणार नाही आणि तो स्प्रेड नाही झालातर तो ऑक्सिजन पर्यंत जाणार नाही ऑक्सिजन पर्यंत गेला नाहीतर व्हेन्टी लागणार नाही. आपण विचार कशाचा करतो, सत्तर ऐंशी लोक मरतात आपण स्मशनभूमीचा विचार करतो, आपण ऍम्ब्युलन्सचा विचार करतो. आहो, पण तीथपर्यंत जायचच नाहीना आपल्याला त्याच्यावरती उपाययोजना काय. ज्यांचे ज्यांचे आमच्या सगळयांचे जम्बो कोवीडवर ऍलीगेशन आहेत त्याबद्दल देखील माई मी तुम्हांला सांगतो की त्वरीत आयुक्तांच शेवट असं उत्तर पाहीजे आम्हांला अपेक्षीत की मी जबाबदारी घेतो जम्बो कोवीड सेंटरची त्या ठिकाणी सगळया गोष्टी व्यवस्थित होतील आणि ते

जर नाही बोलले आजच्या सभागृहात आणि त्याची जर बातमी फक्त आपल्याच लागल्या आणि त्यांच्या नाही लागल्या तर उदया ज्या लोकांना ऑक्सिजनची गरज आहे त्याठिकाणी लोक जाणार नाहीत आणि हे करणार नसेल, हे मान्य नसेलतर तुषार हिंगे असतील, मी असेल असे आमचे महीनाभरात राजीनामे घेवून टाका एवढच बोलतो आणि थांबतो.

डॉ.वैशाली घोडेकर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर, मा.आयुक्त मी दोघांनाही सांगते की मध्ये तुम्ही ज्यावेळेस कोवीडची मिटींग घेतली त्यावेळेस मी तुम्हांला काही मुद्दे सांगीतले होते. आताच माझ्या सहकार्यानी अतीशय वास्तविकता वस्तुस्थिती आपल्या समोर मांडलेली आहे. आयुक्त साहेब त्या मिटीगमध्ये मी तुम्हांला प्रिती व्हिक्टर हीच एक उदाहरण दिल होतं. रात्री एकला मी तीला फोन केला तेव्हा तीच मला उत्तर आल माझी ही झोपेची वेळ आहे मी उदया सकाळी बघेल. तीन वाजता तो पेशंट गेला. मी तुम्हांला दुस-या दिवशी तो मॅसेज पाठविला, विभागीय आयुक्तांना तो मॅसेज पाठविला त्याचवेळेस त्या प्रिती मॅडमवर कारवाई झाली असतीना तर तीथल मॅनेजमेंट हे बदलल गेल असतं. त्याचवेळेस मी आपल्याला रिक्वेस्ट केली होती सर की जम्बो मध्ये आपल्याला कुठेतरी सुधारणा करावी लागेल. आता सभागृहातल्या माझ्या सहकार्यानी जे काय सांगीतल तर आयुक्त साहेब आपल्याला एक आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे मी परत ते मुद्दे रिपीट करणार नाही की कशा पध्दतीने काम होतं. परंतु एक आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे की हे जे मीसमॅनेजमेंट होतय, मीसको-ऑर्डीनेशन होतय, पेशंटकडे दुर्लक्ष होतय त्यांच्या ट्रिटमेंटकडे दुर्लक्ष होतय याच्यामुळेतरडेडरेश्यो वाढत नाही. तुम्ही म्हणालतर पेशंट डायरेक्ट स्कोर सोळा घेवून येतो वीस घेवून येतो, सर चोवीस चोवीस स्कोर असलेले पेशंट बरे झालेले आहेत. मग याचा अर्थ कुठेतरी आपल को-ऑर्डीनेशन चुकतय जम्बो आणि ऍटोक्लस्टरच. त्याचठिकाणी सर्वात जास्त डेडरेश्यो वाढलेले आहेत, सर जर आपण तीथल डेड ऑडीट केलना तर तुम्हांला कळेल सर्वात जास्त डेड हे त्याठिकाणी झालेले आहेत. मी म्हणेल की खरच पिंपरी चिंचवड शहर जर वाचल असेलना तर ते वायसीएम मुळे. आपण त्याला आदि  पांढरा हात्ती, पांढरा हात्ती म्हणून चिडवत होतो परंतु त्या वायसीएममुळे आज आपल हे शहर याठिकाणी वाचलेल आहे आणि तीथले डॉक्टर अतीशय चांगल काम करतात. सर तुम्ही मला त्या मिटींगला उत्तर दिलं की आम्ही को-ऑर्डीनेटर नेमलेले आहेत. का-ऑर्डीनेटर अतीशय चांगल काम करतात, खुप चांगल काम करतात पण त्या को-ऑर्डीनेटरच पण तीथ चालल

पाहीजे. त्याठिकाणी कशा पध्दतीने ट्रिटमेंट दिली जाती, कशा पध्दतीने वागणूक दिली जाते याच्याकडे प्रत्येक को-ऑर्डीनेटर लक्ष देत नाही बसणार याच्यासाठी तीथली मॅनेजमेंटच ही बदलली पाहीजे. अतीशय विदारक दृश्य हे पिंपरी चिंचवडच माई आपल्या समोर येतय याचा कुठेतरी आपण गांभीर्यांने विचार केला पाहीजे. तुमची रुग्णसंख्या ही पंचवीससे येऊदयात, तीन हजार येऊदयात, साडेतीन हजार येऊदयात पण डेडरेश्यो हा कुठेतरी दोन, तीन, चार, पाच अशाच आकडयामध्ये आम्हांला दिसला पाहीजे याच्यावर कुठतरी काम केल पाहीजे. याठिकाणी माई मी पहीली विनंती करेन की त्या प्रितीला तीथून काढल पाहीजे. त्या प्रितीला तीथून काढा कारण की बिलकुलही तीथ तीची पेशंटला व्यवस्थीत वागणूक मिळत नाही आणि त्या मिटींगमध्ये मी एक आयुक्त साहेबांना विनंती केली होती की सर सेन्ट्रलाईज ॲडमीशन करा तर आज हे चित्र दिसल नसतं. पेशंट जर जम्बोमध्ये आणि ॲटोक्लस्टरमध्ये ॲडमीट करायचा असेलतर फक्त वायसीएम थ्रू आणि आपले वायसीएमचे डॉक्टर यांनीच पाठवला पाहीजे. ते स्वत: ॲडमीट करु शकणार नाहीत एवढीही मी त्यावेळेस विनंती केली होती याच्यावर मिस को-ऑर्डीनेशन हे कुठेतरी संपल जाईल, गेल्यावेळेस आपल्या वायसीएममधुन चिठ्ठी मिळायची मग तो पेशंट जम्बो नाहीतर ॲटोक्लस्टरला जायचा. जर तुम्हांला अचानक इमर्जन्सीमध्ये रात्री तीन वाजता जर दरवाजात पेशंट आलातर ते त्यांनी आपल्या वायसीएमच्या अधिका-याला कळवल पाहीजे. खरच कुंदन आणि विकास यांच मी अभिनंदन करेल त्याच्यावर काय बीतली असेल हे आम्हांला कळतय. ज्या शिक्षीकेनी त्याला शिकवल त्याना मदत करता आली नाही म्हणजे आम्हांला सांगायच बेड अव्हेलेबल नाही आणि तुम्ही तुमचे बेड दयायचे हे जम्बोमध्ये सुध्दा चाललेलं आहे, ॲटोक्लस्टरमध्ये पण चाललेल आहे. मग आपण किती जरी को-ऑर्डीनेटर नेमलेना तरीही काहीही होणार नाही. माझी पहीली विनंती आहे की त्या प्रितीला लगेच काढून टाकण. माझी दुसरी विनंती आहे ही असेल की त्याठिकाणी ॲडमीशन जे होतील ते फक्त वायसीएम थ्रूच झाले पाहीजे. सेंट्रलाईज कुठेतरी करा म्हणजे कोण पैसे घेत, कोण घेत नाही की आपला देखील त्याठिकाणी अंकुश राहील. तीसरा मुद्दा मी आपल्या समोर आणु इच्छिते की आपण जेवढे खासगी हॉस्पिटलला कोवीड परमीशन दिले आहे आता तुम्ही काल ते बंद केल परंतु आपण बघीतल का की आपल्याकडे वैदयकीय एक डिपार्टमेंट आहे त्यामध्ये आधी पासून आपण हॉस्पिटलच्या नोंदी घेतो. दर दोन वर्षाला आम्हांला त्या रिन्यू कराव्या लागतात. ते हॉस्पिटल सोडून असे अचानक एका रात्रीत किती हॉस्पिटल तयार झाले याचा आपण विचार केला का. अचानक हॉस्पिटल निर्माण झाले त्यांची पात्रता काय,

त्यांची कितपत त्याठिकाणी ट्रिटमेंट देण्याची कुवत आहे याचा देखील विचार आपण केला पाहीजे कारण त्याठिकाणी आपला नागरीक जाणार आहे. डेड जर झालीतर आपल्या पिंपरी चिंचवडच्या नागरीकाची होणार आहे. सर ते तपासा तुम्ही की ते किती गेले दोन तीन वर्ष नोंदणीकृत आहेत तरच त्यांना कोवीडची परमीशन दया नाहीतर आता त्यांच्या परमीशन रद्द करा. कोणीही कोणततरी हॉटेल घेतय, कोणततरी कार्यालय घेतय आणि त्याठिकाणी कोवीड हॉस्पिटल निर्माण करतय हा धंदा कुठेतरी बंद करा आणि तीसरा मुद्दा मी आपल्या समोर आणून देवू इच्छिते की कोवीड हॉस्पिटल खाजगीला जेवढी आपण परमीशन दिली त्याठिकाणी सपोज त्यांच व्हेन्टीलेटर फुल झाल असेल किंवा व्हेन्टीलेटर नसेल आणि ऑक्सिजन वरुन जर तो पेशंट व्हेन्टीलेटरवर जायचा असेलतर त्याचे रिलेटीव्ह पॉझिटीव्ह असलेतरी इकडे तीकडे शहरात फिरत असतात की माझ्या रिलेटीव्हला कुठेतरी व्हेन्टीलेटर पाहीजे. का तर तो खाजगी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजनवर असतो पण नंतर त्याला व्हेन्टीलेटर लागणार असतं. घरात सहा-सहा जण पॉझिटीव्ह असतात तरी त्यांचा एखादा रिलेटीव्ह आपल्या शहरात फिरतो की इथ व्हेन्टीलेटर आहे का त्यासाठी. खाजगी हॉस्पिटलला एक पत्र पाठवा की जर तुमचा ऑक्सिजनवर असलेला पेशंट सिरीअस झालातर त्याला व्हेन्टीलेटर मिळवून देण्याची जबाबदारी ही तुमची आहे, खाजगी हॉस्पिटलची आहे. तर त्या प्रत्येक कोवीडच्या खाजगी हॉस्पिटलचा एक को-ऑर्डीनेटर पाहीजे व त्यांचे नंबर्स आमच्या सगळयाकडे पाहीजे आणि प्रशासनाकडे पण पाहीजे म्हणजे तो को-ऑर्डीनेटर जर सिरीअस पेशंटला व्हेन्टीलेटर लागला आणि तो त्यांच्याकडे अव्हेलेबल नसेलतर तो बिर्ला असेल, लोकमान्य असेल किंवा दुसरे हॉस्पिटल असेल, ससूण असेल, आपल वायसीएम असेल या लोकांना को-ऑर्डीनेट करेल म्हणजे त्यांचे नातेवाईक इकडे तीकडे फिरणार नाहीत. आज नातेवाईकांची अतीशय दुर्दशा झालेली आहे घरातला जर कर्ता पुरष ऍडमीट असेलना तर ती बाई काही करु शकत नाही. त्यांची मुल काही करु शकत नाही मग ते कुठून व्हेन्टीलेटर घेतील. हॉस्पिटल सरळ चिठ्ठी देतात की तुमच्या माणसाला आता व्हेंन्टीलेटर लागणार आहे तुम्ही तुमच बघुन घ्या ही गोष्ट अतीशय चुकीची होती आयुक्त साहेब. त्याठिकाणी त्या हॉस्पिटलचीच जबाबदारी पाहीजे की त्या ठिकाणी त्यांनी त्यांना व्हेन्टीलेटर मिळवून दिल पाहीजे नाहीतर खाजगी हॉस्पिटलनी कोवीड चालवू नये. देणार असेलतर प्रॉपर व्यवस्थीत ट्रिटमेंट दया. या मिस को-ऑर्डीनेशनमुळेना डेड रेट खरच वाढला आहे. या बेसीक गोष्टीकडे थोडस लक्ष दिल पाहीजे आणि मी तर म्हणेल की जी पेशंटची संख्या वाढतेना हे रिलेटीव्ह जे सगळीकडे फिरतातना

त्यांच्यामुळे सुध्दा वाढते. मी आधीही सांगीतल टेस्ट निगेटीव्ह आली तरी पॉल्स पॉझिटीव्ह असतो त्यामुळे देखील तो एक कॅरीअर होत आणि त्याच्यामुळे देखील पेशंटची संख्या वाढते. माई अतीशय मार्मीक सगळयांचे मुद्दे आहेत, सगळयांचे अतीशय बारीक हे मुद्दे आहेत याच्याकड खरच आयुक्त साहेबांनी लक्ष दिल पाहीजे खाजगी कोवीडवर सुध्दा आपला अंकुश असला पाहीजे. कोणत्याही खाजगी कोवीड मधल्या रुग्णालयातील नातेवाईक इकड तीकड व्हेन्टीलेटर हे करताना दिसला नाही पाहीजे नाहीतर मी खरच तुमच्या कार्यालयाच्या बाहेर येऊन बसणार. कारण त्याठिकाणी किती दयनीय अवस्था होतेना ते मी बघीतलेली आहे. ती बाई इकडे तीकडे फिरते याला फोन लाव, त्याला फोन लाव व्हेन्टीलेटर आहे का काय करणार ती व्हेन्टीलेटर नाही मिळालातर. असे दोन तीन प्रकार समोर आलेले आहेत. मी एवढीच विनंती करीन की त्वरीत त्या दोन्ही जम्बो कोवीड सेंटर आणि ऍटोक्लस्टरच्या त्या सन्माननीय जी डॉक्टरांची नाव घेतलेली आहेत कुंदन आणि विकासनी आणि ती प्रिती व्हिक्टर यांच्यावर त्वरीत कारवाई झाली पाहीजे, खाजगी हॉस्पिटलवर अंकूश ठेवला पाहीजे, कोणत्याही पेशंटचे रिलेटीव्ह फिरले नाही पाहीजे आणि डेडरेट कमी झाला पाहीजे याच्यावर आपण सगळयांनी आत्मपरिक्षण केल पाहीजे, धन्यवाद.

मा.तुषार हिंगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आताच ब-यापैकी सगळयांनी जम्बो कोवीडवर बरच काही बोलले. आयुक्त साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की परवा दिवशी २८ तारखेला आपल्या जम्बो कोवीडला गेलो होतो. तीन वाजता मी डॉ.पवार साहेब आहेत त्यांना भेटलो होतो आपल्या महापालिकेचे ते कर्मचारी आहेत. त्यांना पेशंट बद्दल माहीती विचारली त्यांनी तीथ मला पाच वाजेपर्यंत बसुन ठेवल माहीती भेटली नाही ती त्यांची चुकी नाही जे आतमधले लोक आहेत मॅनेजमेंट मधले ते अजीबात सहकार्य करत नाहीत. आम्ही दुपारी तीन ते रात्री आकरा वाजेपर्यंत तीथ होतो तीथ जी वस्तुस्थिती बघीतली तर अजीबात लोकांना चांगल्या पध्दतीची वागणूक मिळत नाही प्रत्येक नागरीकांची तीथ हेळसांड होते माझ्या सारख्या माणसाचे होते तर सर्वसामान्य माणसाचे काय हाल होत असतील. अधिका-यांना त्या दिवशी फोन केला रात्री ढाकणे साहेबांशी पण त्या विषयावर बोललो. आपण ज्या शववाहीका देतो त्या शववाहीके बरोबर कमीत कमी चार लोक ही असली पाहीजेत. त्यांना आपण टेलीफोन देतो तीथ अस सांगीतल जात की तुमची डेडबॉडी ही तुम्हीच तुमच्या पध्दतीने त्याची विल्हेवाट लावायची अस नातेवाईकांना सांगीतल जातं. त्याच दिवशी एक आठरा वर्षाचा मुलगा आपल्या ४५ वर्षे वयाच्या वडीलांच्या मयत स्वत: पीपीई कीट

घालून त्यांनी डेडबॉडी ऍम्ब्युलन्स मधुन उतरवली आणि त्यानी स्वत: दहन केल. जर का आपण त्या गोष्टीचा मोबदला त्याना देत असूतर त्यांची पुर्ण जबाबदारी आहे आपल अजीबात त्याच्यावर लक्ष नाही. जम्बो कोवीडच ज्या पध्दतीने काम चालल आहे, ज्या पध्दतीने नागरीकांची हेळसांड होते ती खरच खुप एकदम भयानक परिस्थिती आहे. अजीबात त्याला चांगली वागणूक दिली जात नाही. आठ दिवसापुर्वी तीथ ४२ बॉडया होत्या दोन दिवस लोकांना बॉडया दिल्या नव्हत्या. एक महीला विनंती करत होती की प्लीज दोन दिवस झाल मला माझी बॉडी दया. ती बाई सांगत होती की माझ्याकड सात हजार रुपये नाहीत माझी बॉडी न्यायला ऍम्ब्यूलन्सवाला सात हजार मागतो प्लिज माझी काहीतरी व्यवस्था करा मला माझी बॉडी दया खरच ती आम्हांला लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. त्याच बरोबर आपण आता शहरात नवीन हॉस्पिटलला परमीशन देतो त्याच्या ऑक्सिजनची, त्याच्या रेमडेसिवीरची त्याची पुर्ण जबाबदारी महापालिकेची आहे. एकतर तुम्ही परमीशन देवू नका आणि दिलीतर त्याच पालकत्व हे पुर्ण महानगरपालिकेनी घेतल पाहीजे. बरेचसे हॉस्पिटल असे आहेत की ते पेशंटला सांगतात की तुम्ही तुमचा पेशंट घेवून जावा आम्ही ऑक्सिजन देवू शकत नाहीत आमचा ऑक्सिजन एक दिवसाचा आहे, आमचा ऑक्सिजन दोन दिवसाचा आहे. एकतर परमीशन देवू नका आणि दिलतर पुर्ण पालकत्व त्याच घ्या. त्याच पध्दतीने आम्ही वेळोवेळी सांगतो की ज्या ऍम्ब्यूलन्स स्मशनभूमीमध्ये जातात त्या तीथ गेल्यानंतर चार चार तास थांबतात त्याच्यापेक्षा आपण जीथ जीथ परमीशन दिलय तीथ आपण एक मांडवाची व्यवस्था करावी तीथ बॉडया ठेवता येतील आणि जो ताण ऍम्ब्युलन्सवर पडतो तो कमी होईल. त्याच बरोबर आता अभिषेकदादानी सांगीतल की शहरात आपण विवीध ठिकाणी सीसी सेंटर तयार केले, आज सीसी सेंटर तयार केलेत पण तीथ लोक जात नाहीत. तरी माझी आपल्याला विनंती आहे की कमीत कमी वयवर्षे २५ ते ४५ या वयोगटातले जे युवक-युवती आहेत त्यांना कृपा करुन तुम्ही सीसी सेंटरवर ठेवा जेणेकरुन आपल्याला त्यांच्यावर लक्ष ठेवता येईल ते शहरभर फिरतात. त्याचप्रमाणे मी एक सांगू इच्छितो की प्रत्येक अधिका-याला आपण काही सांगायला गेलोतर ते त्याच काम आहे हे याच काम आहे असे सांगून प्रत्येक अधिकारी टोलवाटोलवी करतो. माझी आपल्याला विनंती आहे की आपण पालीकेचे कर्मचारी आहोत आपण माणूसकी म्हणून तरी काम केल पाहीजे. आम्ही सांगीतल हे गरजेच आहे ते गरजेच आहे तर तीथन आम्हांला ऑर्डर आली नाही, आम्हांला मागणीच आली नाही. जे खरच गरजेचे आहे आपण कशाची वाट न बघता आपण त्वरीत पुरवठा करावा.

त्याच पध्दतीने सर्व नगरसेवकांची माईंच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी करावी त्यात सर्वपक्षीय नगरसेवक आसावेत. यांच्यावर अंकुशच राहीलेला नाही. आम्ही नगरसेवक कुणीही कुठलही घरच काम घेवून जात नाहीत ते सर्व नागरीकांचेच काम घेवून जातात पण त्याला अजीबात ट्रिटमेंट दिली जात नाही, त्याला चांगली वागणूक दिली जात नाही तरी त्याची आपण काळजी घ्यावी असे मी आपल्याला सांगू इच्छितो. सगळया फेसबुकवर फिरतय की नगरसेवक कुठे आहे, नगरसेवक सापडला का, नगरसेवक भेटतो का पण प्रत्येक नगरसेवकांनी किती तळमळ करायची पण प्रशासन जर का मदत करत नसेलतर आम्ही हातबल आहोत. प्रत्येक नगरसेवकांच जे म्हणण आहे ते विचारात घेवून आपण त्याच्यावर कारवाई करावी असं मी आयुक्त साहेब आपल्याला सांगू इच्छितो. त्याच पध्दतीने आयुक्त साहेब मी थोडासा वेगळा विषय सांगू इच्छितो की मागच्यावेळेस आपल्यातले तीन नगरसेवक गेले ज्या पध्दतीने आपण कर्मचा-यांना विमा दिला होता तसा नगरसेवकांच्या विम्या बद्दलपण आपली चर्चा झाली होती तरी त्याच्यावर आपण विशेष बैठक घेवून त्याबद्दल काय करता येईल हे बघाव. मा.महापौर साहेब, जम्बो कोवीड साठी आपण विशेष सभा लावून आणि नगरसेवकांची एक सर्वपक्षीय कमिटी करावी जेणेकरुन एक चांगला त्यांचा अंकूश राहील यासाठी काम कराव, धन्यवाद.

मा.संदिप वाघेरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. जशी जीबी चालू झाली तसा एकच विषय आहे, ऍटोक्लस्टर, जम्बोकोवीड आणि सर्व कोवीडच्या संदर्भात. आयुक्त साहेब, कुंदन गायकवाड असेल किंवा डोळस भाऊ असेल सुरेखा काकडे उर्फ वाबळे हया आपल्या महापालिकेच्या मुख्याध्यापिका होत्या चिखलीमध्ये. पदमा हॉस्पिटल वाल्हेकरवाडी मध्ये डॉ.कसबेकड त्या ऍडमीट होत्या, एक लाख रुपये घेतले नंतर ऍटोक्लस्टरमध्ये कोण संचालक असेल ८० हजार रुपये तीथ वीस हजार रुपये अशी सकाळच्या पोर्टलला बातमी वाचली. मा.महापौर साहेब, म्हणजे वर्डवाईज एक डब्ल्यूएचओ आहे तसच मी इथ बसल्या बसल्या एक विचार केला की आपल्या इथ महापालिकेत किंवा भारतात डीआरए प्रकार आहे म्हणजे डॉक्टर, अधिकारी आणि राजकारणी त्याचा शॉर्टफॉम आहे. आयुक्त साहेब मागच्यावेळेला पण कोवीड होता ठिक आहे आज स्ट्रेन बदलला आहे, स्ट्राँग आहे. आज अशी परिस्थिती आहे की मी पंधरा दिवसापुर्वी ऍटोक्लस्टरमध्ये  व्हिडीओ काढला बघीतल तीथ सगळ मिडीयाला दाखवल की लोकांना सांगायच की इथ बेड फुल आहेत. आता ज्या काकडे मॅडम कोवीडनी वारल्या साधारणपणे दिडशे लोकांची तीथ लाईन होती त्याच्यामधन तो पेशंट

पदमा हॉस्पिटलमधन तीथ घेतला ८० आणि २० हजार रुपये घेवून. अशा पध्दतीने जर इथ माणूस ॲडमीट होतो आणि मग त्यांना तीथ ट्रिटमेंट दिली जाते. आयुक्त साहेब जम्बो कोवीड असेल किंवा ॲटोक्लस्टर स्पर्श हॉस्पिटल याच्यावर मागे पण विषय झालेला होता तुम्ही म्हणले होते की याच्यावरती आम्ही समिती गठीत केलेली आहे. ५ कोटी १४ लाख महापालिकेनी त्यांना न काम करता बील दिल होत. त्याच्यात डॉ.पवन साळवे जो अधिकारी त्या समितीमध्ये नसतानाही, मुख्य वैदयकीय अधिकारी नसताना त्यांनी सही केली आणि अतिरीक्त आयुक्त अजीत पवार यांनी ते बील दयायला भाग पाडल, स्थायीची मान्यता न घेता त्याच्या पुर्वी बील अदायगी करण्यात आली त्यानंतर बाकीच्या गोष्टी, राजकारण झालं सगळया शहरानी बघीतलं किंवा सर्वांना माहीती आहे. आयुक्त साहेब ही महापालिका लोकांच्या पैशानी चालते लोक इथ टॅक्सच्या रुपाने, कररुपाने पैसे भरतात आणि त्यांना त्या सुविधा मिळाव्यात ही त्यांची माफक अपेक्षा आहे. मगाशी अभिषेक पण बोलला की आपण आता दोन जम्बो कोवीड करतो भोसरी आणि सांगवीला, आहे ते पहील नीट करा. हार्डीकरांच्या वेळेला एक गॅसपाईपलाईनच टेंडर काढल ते पहील पत्र मीच दिल की स्पर्धा होवू दयात. २६ कोटी ६१ लाख रुपयाच टेंडर काढल होत नंतर त्या पत्राचा आयुक्तांनी विचार केला नंतर दोन दिवसानी शॉर्ट टेंडर काढून आठरा ते साडेआठरा कोटीला बाकीच्या लोकांनी टेंडर भरलय. म्हणजे आठ ते साडेआठ कोट रुपयाचा मलीदा क्लेअरकट ही लोक म्हणजे ही कोण अधिकारी असतील अजून कुणी असेल किंवा राजकारणी असतील या सर्वांच्या संगनमताने हे सर्व चालल होतं. आम्ही इथ विश्वस्त म्हणून आलोत, लोकप्रतिनीधी म्हणून आलोत आणि आम्ही प्रत्येक भागाच नेतृत्व करतो, पिंपरी चिंचवड शहराच नेतृत्व करतो आमची एकच माफक अपेक्षा आहे की महापालिकेनी जी लोकांना सुविधा निर्माण करुन दिल्यात, हॉस्पिटल केलेत, व्हेन्टीलेटर, ऑक्सिजन बेड या लोकांना आपण मोफत देतो आणि हे परस्पर इकड दुकानदारी करतात. मा.महापौर साहेब, तुम्ही मागे आयुक्तांना आदेश दिला होता की स्पर्श हॉस्पिटलचे जे बील अदायगी करण्यात आली त्याच्या बद्दल तुम्ही अहवाल दया वीस दिवसात आयुक्त साहेब देतो म्हणले होते त्या अहवालाच काय झाल आणि तुम्ही याच्यावरती कारवाई करणार आहेत का. आज सदोष मनुष्यवधाचा गुन्हा स्पर्श हॉस्पिटलवरती दाखल झाला पाहीजे त्या पदमा हॉस्पिटलच्या डॉक्टरवरती झाला पाहीजे. आपण ॲक्शन घेतले, ॲक्शन मोडमध्ये दाखवल ठिक आहे आयुक्त साहेब तुम्हाला इथ येवून दोन तीन महीने झालेले आहेत तुम्ही इथली माहीती घेतली, तुम्हांला सगळया गोष्टी माहीती झालेल्या आहेत. म्हणजे असं नाही की तुम्हांला कोण काय करतय

आणि कोण काय करत नाही हे माहीत नाही. तुम्ही इथ पालक म्हणून अधिकारी आहात, तुमच्या अंडरमध्ये ही सगळी महापालिका चालणार आहे त्या हिशोबानी तुम्ही आता निर्णय घेवून म्हणजे आता तुम्ही काम केल हे जनतेला दिसू दयात आणि इथ ज्या लोकांच्या अडचणी आहेत हॉस्पिटल भेटत नाही, व्हेन्टीलेटर बेड भेटत नाही, ऑक्सिजन बेड भेटत नाही ही लोकाची कुठेतरी शोधाशोध मोहीम आहे ती थांबवा आणि आता जे आपण चार हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन प्लॅन्ट करतो तो त्वरीत कार्यान्वित करुन तीथ व्हेन्टीलेटर, ऑक्सिजन बेड लगेच्या लगेच वाढवा की जेनेकरुन आपल्या पिंपरी चिंचवडच्या लोकांना किंवा अजूबाजूच्या परिसरातून येतात त्यांना जीवदान मिळेल. मा.महापौर साहेब, मी एक महीन्यापुर्वी डेड ऑडीटसाठी पत्र दिलय अजून पर्यंत मला माहीती दिली नाही की, माहीती अधिकारात पण दिलय आणि नगरसेवकाच्या पत्रावर पण दिलय. आम्ही माहीती संकलन करतो. आता मध्ये पेपरला बातमी होती की ९६७ मृत्यू आपण लपवले खर काय खोट काय हे आयुक्तांनाच माहीती आणि आयुक्तांनी आता सभागृहाला क्लेअरकट उत्तर दिले पाहीजेत. मी पण सर्व नगरसेवकांना विनंती करतो की सीएसआर बाकीच्या फंडातून महापालिकेला बरीचशी मदत होती आणि बाकीच्यांनी पण करा की जेणेकरुन प्रशासनाचा भार हालका होईल. आयुक्त साहेब तुम्ही पारदर्शकता आणा तुमचे अधिकारी पण काय करतात आणि ठेकेदार पण काय करतात बेधडक कारवाई करा तुम्ही. म्हणजे तुम्ही खरच ॲक्शन घेवू शकता हे जनतेला पण कळल पाहीजे आणि सभागृहाला पण कळल पाहीजे. आज स्पर्श हॉस्पिटल जे दुकानदारी करतय त्याच्या मागे कोण आहे काय आहे. मागची जी बील देण्यात आली ५ कोटी १४ लाखाची ती कुणाच्या अकौंटवर गेली काय गेली, कशी गेली त्यानी काम केलं का नाही केलं हे कळल पाहीजेलना का नुसत ये रे माझ्या मागल्या. साहेब, ही कुणाची दुकानदारी चालली आहेना ती बंद करा. हे जनतेचे पैसे आहेत जनतेच्या कामासाठी उपयोगाला आले पाहीजेत आणि जनतेच कामच यातून झाल पाहीजे. आज असं झाल आहे की जनतेच काम नाहीतर जनतेला कामाला लावलेल आहे. म्हणजे टाळूवरच लोणी खात नाहीत आता हे प्रेतच खायला लागलेली आहेत. आज रोज ९३-९४ च ॲव्हरेज चालल आहे. का आता सेन्चूरी व्हायची वाटत बघायची का. वैशालीताई पण मगाशी म्हणल्या की जम्बो कोवीड असेल, ॲटोक्लस्टर असेल वायसीएम मार्फत रेफरचीट घेवूनच तीथ पेशंट दाखल झाले पाहीजेत. मा.महापौर साहेब तुम्ही असे क्लेअर आदेश दया की आता जी दुकानदारी चाललेली उघडकीस आली डोळस आणि गायकवाड मुळ आणि याच्या अगोदर पण ब-याचवेळा बोललो तुम्ही अजून कुठल्या गोष्टींची

कारवाई केलेली नाही. मा.महापौर साहेब, तुम्ही आदेश देवून सुध्दा आयुक्तांनी अजून सुध्दा सभागृहापुढ अहवाल मांडलेला नाही. आयुक्त साहेब याच्यावरती तुमच्याकडन आम्हांला उत्तर अपेक्षीत आहेत आणि आता एवढ बोलून थांबतो.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, चर्चेचा आग्रह धरल्यानंतर आपण सगळयास चर्चा करण्यास जो वेळ दिला त्याबद्दल आपले मनापासून आभार. आयुक्त साहेब ज्यावेळेस स्पर्शचा पहील्यांदा विषय निघाला त्यावेळेस तुम्ही नवीन होता आणि आज तुम्ही सभागृहात आम्हांला सगळयांना मुर्ख समजून नव्हेतर, मुर्खच समजता आणि म्हणून तुम्ही तो अहवाल सभागृहाच्या पटलावरती आजपर्यंत स्पर्शचा ठेवलेला नाही त्यामुळे तुमचा तीव्र शब्दात लोकशाहीचे सर्व तंत्र पायदळी तुडवले, सन्मा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी संविधान लिहील आणि संविधानाने ज्या ज्या नगरसेवकांना या सभागृहात बसण्याची आम्हांला अनुमती मिळाली त्या सगळया संविधानाचा आपण अनादर केलेला आहे म्हणून आपला याठिकाणी तीव्र शब्दात धिक्कार करते. तुम्ही जर का त्यावेळेस हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला असतातर आज आम्हांला स्पर्शच्या बद्दल असे व्हिडीओ आणि ऑडीओ ऐकण्याची वेळ आली नसती त्यावरती कडक कारवाई झाली असती. वाटल होत की तुमच्याकडे बघुन की तुम्ही अत्यंत इमानदार अधिकारी आहात, असाल पण ते कृतीतून दिसल पाहीजे साहेब तुमच्या, दुर्दैवाने ते मला तुमच्या कृतीतून दिसत नाही. का तुम्ही तो अहवाल ठेवला नाही.या शहराच्या प्रथम नागरीक मा.महापौर यांनी या सभागृहात आदेश दिल्यानंतर त्यांच्या आदेशाची पायमल्ली तुम्ही कुणाच्या आदेशानी तुम्ही केली. तुम्हांला साधा सभागृहाचा नियम माहिती नाही साहेब. जो या सभागृहात डायसवरुन बोलतो त्याची आपल्याला याठिकाणी अंमलबजावणी करावी लागते आणि ती तुम्ही केलेली नाही आणि म्हणून तुमचा धिक्कार करेल मी. ऍटोक्लस्टरला आणि जम्बो कोवीडला जे काही होत त्यांच्या अनेक व्यथा याठिकाणी नगरसेवकांनी मांडलेल्या आहेत म्हणून आज तुम्हांला सगळयांना विचारायच तुम्ही आणि आम्ही मालक आहोत या संस्थेचे आणि हे नौकरदार आहेत यात त्यांना अन्सरेबल असलच पाहीजे. आपण आपले अधिकार विसरतो आणि म्हणून अधिकारी लोक अधिकारशाहीने वागायला उन्मत पण होतात. आम्ही जर फोन केलातर आमच प्रशासन आहे आम्ही आमच बघतो. साहेब, आम्ही सुध्दा लोकशाही मार्गाने या सभागृहात निवडून आलेलो आहोत. या शहरातला जो जो नागरीक करदाता आहे जो या भारत देशात राहतो त्याला तुम्हांला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, तुमच्यावर टिका करण्याचा अधिकार

आहे आणि नैतीकतेनी तर आम्हांला लोकांनी निवडून दिलेल असल्यामुळे आम्हांला तो अधिकार आहेच आणि तुम्ही आमचा अधिकार डावलताय वारंवार डावलताय तुमच्या केबीनच्या बाहेर आमचे नवखे नगरसेवक हात बांधुन उभे असतात, तीथ विचारलतर नाही, साहेब येऊ देत नाहीत. कार्ड पाठवाव लागत. आम्ही घाबरत नाहीत तुम्हांला कारण मी तीथ तुम्हांला सांगायला येणार नाही माझा कुठलातरी कॉन्ट्रॅक्टर आहे त्याला याच्यामध्ये बसवा मला दोन रुपयाचा फायदा करुन दया म्हणून त्यामुळे मी बेधडकपणे येणार तुमच्याकडे आणि मला तो अधिकार आहे. तुम्ही तो अहवाल दुस-या जीबीला दहा दिवसाच्या आतमध्ये देण्यासाठी असं मा.महापौरांना म्हणला होतात की खुप कमी वेळ आहे. मा.महापौरांनी सांगीतल होत मला माहीती नाही मला तो लागणार आणि तुम्ही तो दयायचा. एकदा आदेश दिल्यानंतर खर तुमच्याकडन अरग्युमेंटच व्हायला नव्हती पाहीजे याच्या उपर तुम्ही अरग्युमेंट केली आणि अरग्युमेंट मा.महापौरांनी अमान्य केली, त्यांनी सांगीतल तुम्ही दयायच. त्यावेळेस ५ कोटी १४ लाख रुपये अतिरीक्त आयुक्त मा.अजीत पवारांनी दिलेत म्हणून अख्ख्या सभागृहानी सगळे पुरावे मांडले होते. त्यांच काय व्हायच ते झालेलच आहे, त्यांनी ज्यांना ज्यांना पाठीशी घालायचा प्रयत्न केला होताना साहेब त्यातला एकही माणूस अजीत पवाराला याठिकाणी या खुर्चीवर बसवू शकलेले नाही आणि तुमच्यावरच्या सगळया अधिका-यांनी समजून घ्यायच. जे दोन रुपये कमवण्यासाठी तुमच्याकडे येतातना ते खुर्ची टिकवू शकत नाहीत तुमची. जे निस्वार्थीपणे येतात, निस्वार्थीपणे लोकासाठी भांडतात तीच लोक तुमच्या पाठीशी उभ राहू शकतात. मा.महापौर साहेब, आता स्पर्शवरती ऍटोक्लस्टरला जी ऑडीओ क्लिप याठिकाणी ऐकवण्यात आली आणि व्हिडीओ क्लिप सुध्दा आहे त्याच्यावरती मा.आयुक्त काय करणार आहेत तुम्ही त्यांना खुलासा विचारायचा जर आयुक्तांनी त्याठिकाणी ऍटोक्लस्टरमध्ये स्पर्शच्या वतीने चालू असलेल्या हॉस्पिटलवरती जर गुन्हा दाखल केला नाहीतर जे जे लोक स्पर्शमध्ये मृत झालेले आहेत त्या सगळयांचा मनुष्यवधाचा गुन्हा मी स्वत: सिमा सावळे मा.आयुक्तांवरती दाखल करेल आणि त्याला सर्वस्वी जबाबदार स्वत: आयुक्त असतील. अशाप्रकारचे पैसे मागून महानगरपालिकेच्या अशिर्वादावरती चालणा-या एखादया हॉस्पिटलने आणि आयुक्त साहेब आपल्याला माहीती होतं त्याठिकाणी स्पर्श दोषी आहे त्याला तेव्हाच तुम्ही काढू शकला असता, तुम्ही काढल नाही साहेब, तुम्ही वाट पाहीली आणि कुणाच्यासाठी आणि का म्हणून तुम्ही अहवाल दडवला. आमचे कोण असतील पाठीराखे, आमचे बंधु कोण असतील, भगीनी कोण असतील त्यामध्ये त्यांची नाव उघडकीस होवू दया त्यांच पण नगरसेवक

पद रद्द करण्याची मागणी करते मी याठिकाणी. कुणाला लपवल साहेब आपण आम्हांला कळलच नाही शेवटपर्यंत, तुमची कारकीर्द पाहील्यानंतर तुम्ही कुणाला भेटतात नाही भेटत हे बघीतल्यानंतर एक वर्षात एखादया व्यक्तीला काम करायला संधी दिली पाहीजे, काम करु दिल पाहीजे म्हणून साहेब तुमच्या पाठीशी ठामपणे उभ राहीलो, तर बघायला काय मिळतय तुम्ही अहवाल दडवलात. मा.महापौर साहेब, जम्बो कोवीड सेंटरला प्रिती व्हिक्टरला त्या दिवशी आपला फोन येत होता दुर्दैवाने आम्ही त्याठिकाणी होतो. मी, तुषार हिंगे आणि अभिषेक बारणे आणि आशाताई असं आम्ही कामानिमीत्त पहील्या दिवशीच भेटलो, महानगरपालिकेतच आमची भेटाभेट झाली आणि त्यांनी सांगीतल की ताई उदया आपल्याला तीथ जायच. आकरा साडे आकरा पर्यंत आम्ही वाट बघीतली तुषारचा काही फोन येतो का काय, कस भेटायच तुषारचा नेमका वाढदिवस पण होता मला वाटल एखादयावेळेस येणार नाही तो. मी आणि आशाताई त्याठिकाणी साडेआकराला गेलो, गेल्यानंतर सगळया ॲम्ब्यूलन्स मी मोजल्या किमान बारा ते तेरा ॲम्ब्युलन्स त्याठिकाणी उभ्या होत्या, त्यातले आम्ही पेशंट पण पाहीले होते. आत मध्ये जाताना पहीलेच तुमचे बॉडीगार्ड आडवायला तयार तीथं. त्यांचा काही संबंध नाही आम्हांला आडवण्याचा आम्ही आतमध्ये गेलो तीथ गेल्यानंतर आम्ही माहीती विचारायला सुरवात केली. आल्यानंतर एकंदर प्रिती मॅडमचा थाट पाहीला, तुमचा फोन घेतलान् ओ, माय गॉड ए लेडी यार, समजते नहीए, मी म्हणल कोण आहे मॅडम तर मला तुमचा त्याच्यावरती मेयर म्हणून नंबर सेव्ह आहे तीच्याकड तुमचा तो दिसला. मी म्हणल कोण आहे, बताई आप तर मी बघीतला तीनवेळा फोन आला तीस-यांदा त्यांच्या हातून त्यांनी मला फोन दिला, इनको समजमे नही आरहा है. क्या हैही नही तो मैं कहॉसे ॲडजेस्ट करू म्हणजे ती म्हणाली इम्पॉसीबल आहे ही बाई हीला समजून सांगणं हे तुमच्याबद्दलच वक्तव्यावर. आम्ही म्हणल ठिक आहे काही कामाच प्रेशर असेल, मॅडम प्रथम नागरीक आहेत त्या आणि आम्ही सगळे नगरसेवक आहेतना ते तुमच्या सगळयाची बील पास करणारे आहेत तुम्ही भाषा सांभाळून वापरा. माझ तीथच तीच्यावरती डोक हाल्ल होतं, याच्यावर पण म्हणल आपण गेलो कशासाठी आणि आपल्या हातून वेगळ काहीतरी घडायला नको. मग तीथे उभ राहीलो तुमच्याशी मी बोलले, तीन शेवटपर्यंत तुमच म्हणण नाकारतच राहीली. तीथ उभ असताना आम्ही त्यांना विचारल की तुमच जम्बो कोवीड कधीपासून चालू झालं. आम्हांला बघायच आहे आतमध्ये. ती म्हणली नही नही आप देख सकते. म्हणल जनता मालीक हैं इसके, जनता पैसा देती इसका हामको देखना हैं. मी म्हणाले आम्हांला पीपीई कीट दया आम्हांला

आतमध्ये पेशंटच बघायच आहे. जस मगाशी आशाताईनी सांगीतल की एका पेशंटला तीन दिवसापासून खोकला येत होता, मा.महापौर साहेब, त्याचे डोळे बाहेर यायचे राहीले होते, त्याला औषध नाही. इतर पेशंटकड आम्ही गेलोतर तीथे हं, देतोना आम्ही तुम्हांला जेवण, देतोना आम्ही तुम्हांला औषध, खरं खरं सांगा. अरे, पेशंट बोलायलाच तयार नाही त्यांच्याकडे बघतात, आमच्याकडे बघातात. आम्ही म्हणल हरकत नाही काही वाटलतर आमचा नंबर देते, आशाला म्हणल आपल कार्ड दे काही वाटलतर पण एक जण पेशंट म्हणली मॅडम ऐकानाहो फोन सगळे काढून घेतलेत आमचे, तुम्हांला कसा फोन करायचा, त्रास आहे तो सांगू कसा आणि आम्ही तीथ व्हिजीट करत करत नंतर मी त्या बाईना बोलण्यात गुंतवल आणि आशाताई आतमध्ये गेल्या तोपर्यंत तीन दुसऱ्या डॉक्टरला बोलावल आणि तीला वाटल की ही काय अनपड आहे, अंगठाबहाद्दर आहे म्हणजे ऑलवेज अधिकारी असतील सगळया अधिका-यांना वाटत की आम्ही अनपड, आंगठाबहाद्दर यांना काय कळत तीन इंग्लीशमध्ये सांगीतल तीच्या एका ज्युनिअरला बोलवल आणि तीला सांगीतल की जाऊन बघ ती बाई तीथ काय बोलते. मी तीला भूसवू दिल नाही की ती काय बोलली ती मला कळलं. मी आपल वेडयाच सोंग घेवून तीच्याबरोबर थांबत राहीले. तीकडन आलो परत जेवणाची तपासणी केली. त्या ठिकाणी ख-या अर्थान ज्या काही डेड झाल्या होत्या त्या दहा दिवसाच्या कार्यकाळामध्ये १३१ लोक मृत पावली होते आणि तो जो मृत पावलेचा आकडा ऐकल्यानंतर असं वाटल की हे जास्त गांभीर्याने घेण्याची गरज आहे. दरम्यानच्या काळात ते सर्व बघत आलो आणि नेमक मला माहीती नव्हत की ते डॉ. कपाळे आहेत म्हणून ते आले आणि ते कुणाबरोबर तरी बोलत होते तर ते म्हणले अरे, कोईतो सिमा सावळे आणि आशा शेंडगे अशा दोन नगरसेवीका आल्यात स्पिकरवर होताना फोन तर तो म्हणला सिमा सावळे हैं ना डेन्जर हैं. मग त्याच्या मागे मागेच गेलो आणि म्हणल साहेब, नमस्कार मी सिमा सावळे, ओ... सॉरी, सॉरी, सॉरी, ओ आप आऐ एक घंटा हो गया मैं मिलाही नही. आल्यानंतर असं शर्ट मागे टाकल, केस असे झटकले हिरो स्टाईल, मी विचार केला की डॉक्टर आहे का कोण आहे परमेश्वराला माहीती. मी म्हणल आपण डॉक्टर आहात का इथे, तर म्हटल हो, मीच डॉक्टर आहे मी म्हणल पेशंटची माहीती घेण्यासाठी आलो होतो. नाही नाही, आम्ही आमच्या लेव्हलला बरोबर करतो असं, करतो तसं, करतो आणि नॉन स्टॉप त्याठिकाणी कुठलीही माहीती पुर्ण मिळू नये म्हणून प्रिती व्हिक्टर त्यांना हे करत होत्या. नेमक त्यावेळेस डॉक्टर सुनिल पवार जे आपले त्याठिकाणी आहेत त्यांना सुनिल पवार आप जाईएना ओ मालुमात लेके

आईएना, अच्छा ओ पेन लेके आईएना मी सुनिल पवारांना विचारल तुम्ही ऑफिसबॉय आहेत का यांचा, सुनिल पवार वायसीएमचे डॉक्टर आहेत परमनन्ट आपला एम्प्लॉई आहे आणि त्याला तीथ वेगवेगळी काम सांगीतले जातात कारण की आपले वरिष्ठ त्यांच ऐकत नाहीत. आपले डॉक्टर तीथ मालक म्हणून नाहीतर ऑफिस बॉय म्हणून आपले डॉक्टर तीथ काम करतात अशी आपल्या डॉक्टरांची तीथे अवस्था आहे. आणि नेमकी शिफ्ट सुटली आणि बघीतल काय तर अगदी २३ ते २७ वयोगटातील असे असंख्य मुल/मुली मला आतमध्ये येताना दिसले. मी म्हणले हे कोण आहेत तर ते मला म्हणाले हे आमचे डॉक्टर आहेत. मग मी एकाला विचारल की तुम्ही कुठ शिकलात डिग्री कहाँसे लीया तर तो म्हणाला मैं फस्ट ईअर में हूँ नां. मग हा फस्ट ईअरला तो सेकण्ड ईअरला तो इथला, तो मुंबईल, ती दिव, दमण कुठून कुठून माणस जमा केलेली. प्रॉपर मला फार काही कोण दिसल नाही. आणि नेमक सकाळी साडेआकराला आम्ही ॲम्ब्युलन्स मोजून गेलो होतो तीकडन परत आलो आम्ही स्वागत कक्षात गेलोतर सकाळी जो माणूस तीथ ॲम्ब्यूलन्स मधे आणलेला होता तो साडेतीन वाजता ॲम्ब्युलन्स मधुन काढताना जागेवरती मयत झालेला होता, जागेवरती मयत झाला होता. ही अवस्था आम्ही आमच्या डोळयानी पाहीली. आता तीथ व्हिडीओ बनवाव का, त्यांच ऑडीओ रेकॉर्ड करावा का अनेक गोष्टी त्यामध्ये दुमत असु शकत परंतु हा आम्ही अनुभवलेला विषय आहे. मी आजपर्यंत जीतक्यांना तीथ फोन केला असेल कोणीही तीथ फोन रिसिव्ह करत नाही एकच माणूस तीथ फोन रिसिव्ह करतो तो म्हणजे डॉ.सुनिल पवार आणि दुसरे आता तीकडे जातात डॉ.अभय दादेवार. परवाच्या दिवशी शिवसेनेच्या एका मोठया मंञ्यांकडन दिलीप देशमुख नावाच्या पेशंटसाठी मला फोन आला की ते जम्बोमध्ये उभे आहेत आणि वयस्कर आहेत त्यांना तीथ ॲडमीट करा. ॲडमीट केल सात आठ दिवस झाले. मी रोज उठून सुनिल पवारांना फोन करायचा किंवा अभय दादेवारांना फोन करायचा तीसरा माणुस माझ्याकडे कोणी नाही. त्यांच्या तीथे हेल्पलाईनवाली बाईना फोन केलातर ती काहीही माहीती सांगत नाही ती आपल्याला वेटींगला ठेवते ती गेलेली असते का आलेली असते काहीच कळत नाही मग हाळूहाळू हाळू आपण जर फोन केलाना परत विचारणार हॅलो, मॅडम बोलीएना, ओ पेशंट का क्या हूआ, आच्छा आप वेटींगपे हैं क्या मॅडम रखीएना और भी बहूत लोग वेटींग पे हैं आणि पेशंटची माहीती सांगत नाही. २९ तारखेला त्या दिलीप देशमुखाना पॅरेलेसीस झाला सकाळी डॉ.अभय दादेवारांनी मला फोन करुन सांगीतल ताई तुमचा जो पेशंट आहे तो दिलीप देशमुख यांना पॅरेलेसीस झालेला आहे त्याची लेफ्ट साईड ही गेलेली आहे तेव्हा त्यांच्या

घरच्याना कुणालातरी तुम्हांला सांगाव लागेल आणि आपण त्यांना वायसीएमला चेक करु. त्यांचे तीथे एक्स-रे काढता येतील आपल्याला त्याठिकाणी त्यांची काळजी घेता येईल. मी म्हणल हरकत नाही. मी त्यांच्या मुलीला काल फोन केला, परवाला फोन केला आणि तीला सांगीतल असं असं आहे. तीन हॉस्पिटलला फोन केला त्यांनी सांगीतल नही, हामको पता नही आपको कैसा पता हैं. आज सकाळी त्या मुलीला सकाळी साडेदहा वाजता हॉस्पिटलमधुन फोन आला की तुमच्या वडीलाना पॅरेलेसीस झाला आहे. आई सुध्दा जम्बो कोवीडलाच आहे आणि वडील सुध्दा जम्बो कोवीडला आहेत आता मी तीला सांगू शकत नाही की तुम्ही कुठे पेशंट ठेवला. मा.आयुक्त साहेबांना मागच्या आठ दिवसापुर्वी मी एक मला फेसबूकला आलेली पोस्ट पाठवली होती तेजस चव्हाण नावाच्या व्यक्तीची. त्यांनी जम्बो कोवीडच इतक वर्णन केलेल होतं की विचारुच नका आणि तो जम्बो कोवीडवरुन वायसीएमला गेला तीथल जे वर्णन केल ते सुध्दा वाचण्यासारख आहे. मग काय तर लोक पॅनीक होतील किंवा लोक घाबरतील म्हणून बोलायच नाही म्हणून सांगायच नाही हे योग्य नाही. बोलाव लागेल त्याच्यावरती दुरुस्ती झाली पाहीजे म्हणून बोलाव लागतं. मागच्या वर्षभर मा. हार्डीकरांना आपण सगळयांनी आख्ख्या पंचवीस लाख लोकसंख्येच्या शहरानी त्यांचा एक एक शब्द ऐकलेला आहे. यांचा ऐकणार नाही आपण, पाटील साहेबांनी सांगीतलतर शहर ऐकणार नाही त्यांच, पण बोलल पाहीजे, सांगीतल पाहीजे, पब्लिकच्या पुढ आले पाहीजेत इथ सगळयांना विश्वासात घेतल पाहीजे, पत्रकारांना विश्वासात घेतल पाहीजे, नगरसेवकांना घेतल पाहीजे, सामाजीक कार्यकर्त्यांना विश्वासात घेतल पाहीजे. कुणालाच विश्वासात घ्यायच नाही आमची कुठही शाखा नाही. असं काम करणार असालतर टिका तुमच्यावर होणारच नां. कारण काय साहेब तुम्हाला उत्तर दयायच का नाही दयायच माहीती नाही. आता आम्ही जनजागृती म्हणून जर का फेसबुकला एखादी पोस्ट टाकलीना तर लोक आम्हांला सांगतात तुमची डयुटी आहे, तुमच कर्तव्य आहे वेगळ काय करताय ते सांगा, लोक मरतात त्याच्याबद्दल बोला. नाही सांगू शकत आम्ही त्यांना कारण आम्हांला तोंडच नाही ते सांगण्याच. स्पर्श हॉस्पिटलला त्या डॉ.अंजली ढोणेच मागच्यावेळेस योगेशभाईनी मला वाटत पीआय दाखल केलेला आहे त्या संदर्भात त्या महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये आहेत व त्यांचे पती आडसकर यांनी ते कॉन्ट्रॅक्ट घेतल आहे. मला वाटत पीआय दाखल केल त्या संदर्भात. साहेब, आपण त्यांना घरी बसवल पाहीजे, करु दयाना त्यांना एकदाची कॉन्ट्रॅक्टरशिप आपल काहीच म्हणंण नाही. कॉन्ट्रॅक्टरशीप करायला आपली बंदी थोडी आहे पण दुहेरी फायदा तुम्ही एकावेळी नाही घेवू शकत. आणि तुमच्या इथ तुम्ही जर

अशाप्रकारची वागणूक देणार असालतर आणि अशाप्रकारे लोकांकडन जर पैसे घेणार असालतर, आलेल्या लोकांना तुम्ही जर त्रास देत असाल आणि माणूस मेलातरी तुम्ही पैसे घ्यायचे बंद करणार नसालतर तुमची लायकी नाही किंवा महापालिकेसाठी तुम्ही काम कराव म्हणून. सांगा त्या स्पर्श हॉस्पिटलवाल्यांना आमची महानगरपालिका इथ बदनाम होते. इथ सत्ताधारी म्हणून आम्ही बदनाम होतो, काय संबंध आहे आमचा. बरं म्हणून बरं सुदैवानी आमच्या सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी प्रकार उघडकीस आणला नाहीतर आम्हांला तोंडाला काळ लावून पळाव लागल असतं इकड-तीकड. इकड लपू का तीकड लपू अशी आमची परिस्थिती झाली असती. मा.महापौर साहेब, स्पर्श वरतीचा जो अहवाल आहे तो आयुक्तांनी कुणाच्या सांगण्यावरुन थांबवला होता आज याठिकाणी आयुक्तंनी त्याच उत्तर दयायच. मा.महापौर साहेब जस जम्बो कोवीड आणि आपण स्पर्शवरती बोलतो तसे आपले जे हॉस्पिटल चांगल काम करतात त्यांच सगळयांच अभिनंदन करण्याची फार गरज आहे. आयुक्त साहेब तुम्ही ऑक्सिजन गॅससाठी कमिटी नेमली, तुम्ही बील कमी करण्यासाठी कमिटी नेमली. त्या दिवशी शिवसेनेचे माजी शहरप्रमुख शिवाजीनगरचे त्यांच्या मातोश्री थेरगावला हॉस्पिटलला ऍडमीट होत्या आणि तीथ एक्सपायर झाल्या. सुरवातीला एक लाख सत्तर हजार रुपये बील घेतल होतं नंतर परत सत्तर हजार रुपये घेतले आणि डेडबॉडी दयायच्यावेळेस जोपर्यंत एक लाख रुपये भरत नाहीत तोपर्यंत आम्ही डेडबॉडी देणार नाही म्हणून तीथ तमाशा चालू होता. साहेब, मी आपल्या कमिटीच्या लोकांना फोन केला, आपल्या कमिटीचा एकही मेंबर्स त्याठिकाणी पोहचला नाही, आपण बील कमी केल नाही शेवटी ती लोक वैतागले रात्री साडेबारा वाजता पैसे भरले आणि डेडबॉडी घरी घेवून गेले मग आपली त्यांची भेट होती का नाही होत. किती बील कमी केले हॉस्पिटलवरती वचक काय, काहीच माहीत पडत नाही. जर सरकारने ठरवून दिल होतं तर एक लाख पंच्चावन हाजाराच्या पलीकडे कुठलही प्रायव्हेट हॉस्पिटल त्याठिकाणी कोरोना पेशंटचे बील घेवू शकत नाही शासन आदेश आहे. मग आज इतके पैसे घेतले जातात याच्यावर आळा कोण घालणार. बरं प्रायव्हेटवरती घालायचा घालायचा आपले जे आहेत ज्यांना आपण चालवायला दिलेले आहेत त्यांच्यावरती पण आळा घालण्याची गरज आहेना. मा.महापौर साहेब, ऑक्सिजनच विचारल, झगडे मॅडम खरच चांगले काम करतात त्या काही ऐकायला नाहीत इथे. त्या विभागीय आयुक्त कार्यालयात बसून असतात. साहेबांना फोन कराव तर कितीवेळा आयुक्तांना कुठल्या कुठल्या गोष्टीसाठी फोन करायचा ती आपल्यालाच लाज वाटते म्हणून कुणाला करायचा ढाकणे साहेबांना करायचा. ते सांगणार मी

तुम्हांला गेट बॅग टु यू. एकाद दुस-यावेळेस गेट बॅग टु यू होतं परत होत नाही. जे प्रायव्हेट हॉस्पिटल्स आहेत त्या हॉस्पिटल्समध्ये तीस रुग्णापासून शंभर ते सव्वाशे रुग्णांपर्यंत त्यांची व्हेन्टीलेटरची क्षमता आहे किंवा ओटूवर जर का त्याठिकाणी पेशंट ठेवल्या जातात आणि तीथे त्याठिकाणी ऑक्सिजन नाही म्हणून पेशंट दगावण्याची जर शक्यता असेलतर मा.महापौर ते आपल्याला नाही फोन करणार तर कुणाला करणार. मी मा.आयुक्त साहेबांना सांगीतल की दिडशे ते दोनशे टन इन्डस्ट्रीअलमध्ये प्रोफाईल कटींगच्या इन्डस्ट्रीअलला आपल्या या एमआयडीसीला तेवढा गॅस येतो आपण सक्तीचा लॉकडावून करा की इन्डसट्रीअलला कुठल्याही प्रकारचा ऑक्सिजन गेला नाही पाहीजेतरच आपल्याला इथे मुबलक प्रमाणात ऑक्सिजन गॅस अव्हेलेबल होईल डे वन पासूनतर आजपर्यंत सांगते अजुनपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. सुदैवाने सर्वात मोठी एमआयडीसी माझ्या वॉर्डात आहे आणि त्यामुळे शेजारचा कंपनीवाला मला फोटो काढून, व्हिडीओ काढून टाकतो की सिमाताई लोक मरतात आहो, अशा कशा तुम्ही नगरसेवक करांना त्या कंपन्या बंद. इथ ऑक्सिजनचे पन्नास सिलेंडर आहेत, शंभर सिलेंडर आहेत हे घेवून जा आणि त्या दवाखान्या मध्ये दयानां. अरे, मला सांगतात तुम्हांला का सांगत नाहीत, मला सांगतात कारण की मी तीथे नगरसेवक आहे मी निवडून आले म्हणून मला सांगतात. दायित्व आहे त्यांचे माझ्याकडे, मला प्रश्न विचारण्याचा त्यांना अधिकार आहे. आपण यांना सांगीतल यांना ऐकायच नसतं. झगडे मॅडम सांगणार मॅडम, मी सकाळपासून विभागीय आयुक्तांच्या पुढ आहे काय करु सांगा. मी चिखलीमधल तुमच कृष्णा हॉस्पिटल असेल, दोन तीन हॉस्पिटलच्या संदर्भात आयुक्त साहेबांना मी फोन केला होता की काय केल पाहीजे त्यांना ऑक्सिजन गॅस नाही. हे रोजचे प्रॉब्लेम्स आहेत, रेमडेसिवीर नाही. दोन दिवस झाल आयुक्त साहेब तुमची ग्रुपवरती पोस्ट पडत नाही. आयुक्त साहेब तुम्हांला मर्यादा आहेत तुमच्या वरिष्ठासंग बोलायला. आम्ही राजकारणी आहोत आम्ही जाऊना मा.अजीतदादांकडे आणि साकड घालू, राज्यात आहेत, मा.उपमुख्यमंत्री आहेत या जिल्हयाला पालकमंत्री आहेत आम्ही त्यांना सांगणार तुम्ही आम्हांला रेमडेसिवीर दिलच पाहीजे, आम्हांला ऑक्सिजन उपलब्ध करुन दिलाच पाहीजे आणि नाही देणार तर आमच्या रोषाला सामोर सुध्दा जाव लागेल त्यांना. तुम्ही आम्हांला सांगायचच नाही एक पध्दतशीर पणे खेळी चालू आहे आमची बदनामी करण्याची. दुर्दैवानी सत्ताधारी म्हणून आमच्या सुध्दा लक्षात येत नाही, आम्ही सुध्दा आमचीच मुस्कटदाबी करायला निघतो. आयुक्त साहेब रेमडेसिविर कित्येक दिवस झाले आपली पोस्ट पडत नाही काय प्रॉब्लेम आहे आम्हांला सांगा.

शहरातले पेशंट कमी झालेत का? अजीबात नाही. दुर्दैवाने आम्ही ज्या ज्या ठिकाणी टेस्टींगचे केंद्र चालू केलेतना म्हणजे एमआयडीसीमध्ये जर गेलतर दिडशे पैकी दहा, वीस असेच लोक कामगारांमध्ये निघतात आणि तेच रहिवाशी ऐरीयामध्ये जिथ टेस्टींगच काम चालू आहे त्याठिकाणी सोसायटयामध्ये गेलोतर तीस पेशंटच्या मागे दहा लोक पॉझिटीव्ह आहेत त्यामध्ये सहा महीन्याच बाळ सुध्दा आहे. ही दुसरी स्ट्रेन चालू आहे तीसरीतर यापेक्षा भयानक येणार आहे आणि म्हणून मला असं वाटत मा.माई जे आयुक्त साहेबांकडे गेल्या महीनाभर मृतांचे आकडे लपवण्याची जी काही खेळी केल्या गेली ती सुध्दा कुठतरी उघडकीस आली पाहीजे. ते लोकांना कळल पाहीजे की बाबानो घरात बसा इतकी लोक रोज मृत्यूमुखी पडतात. तुम्ही थांबला नाहीत म्हणून कोरोना थांबत नाही तोही तुमच्या बरोबर तुमच्या घरापर्यंत येतोय. त्यांना खर सांगा, ऑक्सिजन नाही खर सांगा, बेड अव्हेलेबल नाही खर सांगा, व्हेन्टीलेटर नाही खर सांगा, खर बोलायला प्रॉब्लेम काय आहे आपल्याला  का बोलत नाही आपण खरं, सगळे लपवतोय. मांजरीन डोळे मिटवून दुध पिलना म्हणून ती लोकांना दिसायच थांबत नाही, ती दिसतेच. तीला पेकाटात लाथ घालावीच लागते. मा.महापौर साहेब याठिकाणी मी माहीती घेतली असता खरतर मगाशी पडवळ मामाना या सभागृहात श्रध्दांजली वहायची राहून गेली. कासारवाडीचे आमचे पाठीराखे आमच्या वडीलांच्या जागी असणारे मा.पडवळ मामा यांच २३ तारखेला दु:खद निधन झाल. स्टर्लींग हॉस्पिटलला ते ऍडमीट होते, कॅन्सर डॉक्टरांनी सांगितला, सकाळी कॅन्सर सांगीतला आणि संध्याकाळी कोवीड पॉझीटीव्ह म्हणून सांगितल तीस-या दिवशी ते गेले. २३ तारखेला त्यांची डेडबॉडी भाटनगरला आणली. माझा पण पाय खुप दुखत होता म्हणून मी डॉक्टरांकडे गेलेले होते. मी आशाताईना सांगीतल की त्यांची डेडबॉडी आणली की मी त्यांच्या मिसेसला बाहेर भेटते आणि जाते तर मी दवाखान्यातून परत येत असताना मला आशाताईचा फोन आला आणि त्यांनी सांगीतल की सिमाताई पटकन या, डेडबॉडी आणली एखादवेळेस अंतीम संस्कार करणार. मी म्हणल हातात दिली का तर म्हणल हो ते सर्व पॅकींग वगैरे करुन दिलेल आहे पण तुम्ही या विदारक परिस्थिती आहे. मी त्याठिकाणी गेले तो जो बेड आहे चौदा लोकांना त्याठिकाणी अंतीम संस्कार झाले होते आणि दुर्दैव असं की चौथरे जे होते ते चारच होते ते तर जळतच होते बाकीचे जे खाली आजूबाजूला ठेवलेले, तुमच्यासारखा, माझ्या सारखा घरातील कोणी गेलतर फावडयाणी ती राख बाजूला करण्याची गरज होती,  जळत होती ती बाजूला करायची आणि त्याच्या बाजूने प्रेतअग्नी दयायचा. माई पाहून नाही झाल, चक्कर यायला लागली, सूचत नव्हत, घशाला कोरड पडली. मी म्हणल

शवदाहीनीमध्ये घेवून जावू तर तो म्हणला सकाळपासून नऊ लोकांचे दहन झालेले आहेत त्यामुळ शवदाहीनी गरम झाली. मी ते सर्व मोजले, व्हिडीओ काढला म्हणल चौदा ईथ आणि नऊ ईथ आणि दोन अल्पवयीन मुल होती जी पाठीमागे तीथे दफन केल होतं तीथेच. तर म्हणल ते काय होते तर नाही ते पण कोरोना पॉझिटीव्हच होते म्हणले आणि सहा ॲम्ब्युलन्स तीथ उभ्या होत्या वेटींगसाठी. मी विचार केला चौदा लोकांना इथ अग्नि देतो, नऊ लोक तीकडे गेले, दोन त्याठिकाणी दफणला गेलेले आहेत आणि सहा लोक उभी आहेत. मी म्हणल आजच्या दिवस याच मॉनेटरींग बघु काय परिस्थिती आहे ते आणि मग त्या दिवशी वेगवेगळया स्मशानभूमीत गेले आणि कोवीड प्रोटोकॉलनी किती लोक दफण केले जातात म्हणून त्याची आकडेवाडी घेतली. त्याची आकडेवारी अशी होती, भाटनगरला ७४३- १ एप्रिल ते २३ एप्रिल पर्यंत, भोसरीला ६०१- १ एप्रिल ते २३ एप्रिल पर्यंत, निगडीला ३५८, सांगवीला ११८ हे कोवीड प्रोटोकॉलनी केलेले होते. बेरीज येते १८२० आणि आपण जाहीर केले होते ८४१. वरचे जे ९७८ होते त्यामध्ये माहीती घेतली मग महानगरपालिकेत आलो दुस-या दिवशी काय परिस्थिती आहे, ९७८ लोकांची माहीती का लपवली तर ते म्हणाले अपडेट व्हायला वेळ लागतो, कुठ अपडेट व्हायला वेळ लागतो मग ते म्हणले माहीती खुप भरावी लागते. बरोबर आहे, कोरोना पेशंट आहेत मृत झालेतर त्याची माहीती भरावी लागत असेल, हरकत नाही. पासेस देतो पासेस आणि तुम्ही कोरोना प्रोटोकॉलनी तुम्ही त्याचा विधी करता मग पासेस वरती लिहून दिल्या जात किंवा विधी करताना तो मृतदेह जो आहे तो पुर्णपणे कोरोना प्रोटोकॉलनी येतो, तीथतर तुम्हांला माहीती पुर्ण होती, मग माहीती का दडवली, मग माहीती का दडवली. मी मा.आयुक्त साहेबांना पत्र दिलय परत तेच उत्तर, उत्तर म्हणजे त्यांच अनुत्तरीत आहेत ते मी माझ उत्तर समजून घेतल की त्यांना असं वाटल असेल की मी खरे आकडे सांगीतले तर लोक पॅनीक होतील, लोक घाबरतील. लोक घरात बसतील. आयुक्तांनी तसदी घेतली नाही माझ्या पत्राला उत्तर दयायची. ९५० मृतांचे आकडे तुम्ही लपवलेत, कालांतराने ते तुम्ही पुढे आणणार आमच्या परंतु तुम्ही आकडे पुढे आणेतोवर तीसरी स्ट्रेन आपल्या दरवाजात धडका मारतेय. जुलै मध्ये आहे, मा.मुख्यमंत्री सांगतात, मा.आरोग्य मंत्री सांगतात. मा.राजेशजी टोंपे साहेबांचा लाईव्ह जर पाहीलना तर आपल्याला सुध्दा वाटत की किती पोटतीडकीने हा व्यक्ती बोलतो. डॉ.लहाने सांगतात तीसरी स्ट्रेन किती भयानक असणार आहे आणि ९५० मृतांचे आकडे महापालिकेनी लपवले, का लपवले, का नाही माहीती घेतली घ्यायला पाहीजे होती. ज्या ज्या हॉस्पिटलमधून आपले पासेस जातात त्यामधे आपण जिजामाता आणि पिंपरी

वाघेरे हे त्यातले दोन हॉस्पिटलतर सुटलेच होते ज्यांनी पासेसची माहीती दिलेली नाही. आपल्याकडे पास घेतल्या शिवाय अंतीम संस्कार करताच येत नाही हे त्रिवार सत्य आहे याच्यावर पण आकडेवारी लपवल्या जातात आणि त्यात सिरीएसनेस नाही. लोकांना तुम्ही सांगीतल पाहीजे की महीन्यामध्ये याठिकाणी इतकी लोक आपल्या जीवनाला मुकलेले आहेत. घरात बसाव लागेल, लॉकडावून कडकपणे पाळाव लागेल. तुम्हांला कोरोनाचा प्रोटोकॉल एकदम कडक पणे अंमलबजावणी करावी लागेल. तुम्ही काहीच सांगत नाहीत आणि काहीच बोलत नाहीत आम्ही जायच कुणाकडे, कुणाला सांगायच्या आम्ही आमच्या व्यथा. आता आपण काय कराल कोण जबाबदार आहे त्याला बरोबर पकडणार. मग जबाबदार कोण असेल त्याच्यावरती आपण पुर्वी काय काय जबाबदा-या दिल्या त्याच आपल काही घेणंदेणं नाही. आमच म्हणण असं आहे की शिक्षा करण्यापेक्षा दुरुस्ती काय करता येईल ते बघा. शिक्षा करायला तुम्ही आणि आम्ही काय हेडमास्तर नाहीत. तुम्ही पण काही हेडमास्तर नाही की लोकांना शिक्षा करायला किंवा अधिका-यांना शिक्षा करायला पण दुरुस्तीतर करु शकतो. दुरुस्ती करायची नाही म्हणल्यावर कसं काय चालणार आहे. मा.महापौर साहेब, यापुढे आपली जी काही आरोग्य व्यवस्था आहे याच्यावरती मोठया प्रमाणात लक्ष देण्याची गरज आहे. आपले जे काही अधिकारी आहेत, ज्या ज्या ठिकाणी आपण कमिटया नेमलेल्या आहेत यांना पॉवर्स दिल्या पाहीजेत. हे सुध्दा आपल्याला अन्सरेबल असले पाहीजे यांनी सांगायच नाही की मी तीथ कसा जाऊ आणि तीथ कसा विचारु म्हणून. मगाशी वैशालीताइ खुपदा म्हणल्या साहेब तुम्हांला डेडरेट कमी कसा होईल त्याकडे लक्ष दया. तो कमी कसा होईल याच्यासाठी साहेब तुम्हांला स्वत:ला मी तुमच एका यांनी अभिनंदन पण करते की जस आम्ही जम्बो कोवीडच्या बद्दल तक्रारी सांगत होतो तुम्हांला मी सांगीतल होत की साहेब तुम्ही एकदा व्हिजीट करा. तीस-या दिवशी तुम्ही गेलात तुम्हांला सगळ अलबेल दिसलं तुम्ही तीथन परत आलात. आमचे महापौर, पक्षनेता आणि कोण कोण नगरसेवक गेले होते. मा.महापौर साहेब आपल्याला सुध्दा विनंती आहे आपण ज्यावेळेस मिटींग घेता कोरोनाची परिस्थिती आहे योगेश बहल पाच टर्म, सहा टर्म नगरसेवक आहेत, वैशालीताई महापौर राहीलेल्या आहेत, आम्ही तीन टर्म नगरसेवक आहेत, चार टर्म, तीन टर्म, पाच टर्म झालेले नगरसेवक आहेत, अनेक नगरसेवक अभ्यासू आहेत सगळयांना एकदम नाही बोलवता आलतर टप्याटप्यानी बोलवा. तुमच्या डोक्यातल्या काही कल्पना असेल, संकल्पना असेल त्या आम्हांला पण सांगा नेमक काय चालल हे बाहेर येवू दया. हे आज नाही आलना तर पुढ सहा महीने याला वॉरफुटींग वरती आपणच असणार आहोत,

आपल्यावरती हे सगळे हाल्ले आहेत आणि हे जर हाल्ले आपल्याला परतून लावायचे असतीलतर आपल्याला आलर्ट रहाव लागेल आणि म्हणून याच्यावरती वारंवार तुम्ही जे काय करता  आणि काय बोलता काय होत त्याच आम्हांला पुढे कळतच नाही. आम्ही जे ऐकतो आणि आम्हांला असं वाटत की काहीतरी चांगली कारवाई होणार आहे परंतु ती चांगली कारवाई न होता त्याच्यामध्ये अनेकदा इतक्या मोठया मिस्टेक असतात की तुम्ही मिटींग घेवून सुध्दा त्यामधन फायदा काही झालेला दिसत नाही. त्या दिवशी जम्बो कोवीडला मा.पक्षनेत्यांच्या सासूबाई होत्या, त्यांचे कार्यकर्ते होते सासूबाईना त्यांनी कपडे आणले होते. आता त्यांना माहीती होत आम्ही नगरसेवक आहेत तुम्ही सत्तारुढ पक्षनेता आहेत तुम्ही त्यांची बाजू घ्याल नाही घ्याल मला माहीत नाही पण काय झाल ते सांगते. तर ते कार्यकर्ते म्हणाले आम्हांला त्यांचे कपडे दयायचे आहेत तुमची कोण तरी नर्स दया. ती म्हणाली खाली बैठ रहे क्या, रख दोना इधर कोने में. त्यांनी मग तीला हातात पिशवी दिली तीन ती अशी टाकून दिली. ती म्हणली बादमें देखेंगे रख दो इसे बाजूमें. इतका रिस्पेक्ट आहे आपल्याला त्यामुळे त्या रिस्पेक्टचा आपण मान ठेवला पाहीजे जम्बो कोवीडचा. कोटयावधीची बील येणारच आहेत. साहेब, रेमडेसिवीरचा त्याठिकाणी काय घोळ चालतो तुम्ही बघा. त्यांच्या म्हणण्यानुसार जर चार-चार, पाच-पाच रेमडेसिवीर दिल्यानंतर सुध्दा जर का पेशंट जात असेल, जो पेशंट ओटू बेडवर होता आणि तोही जातो तर नेमके रेमडेसिवीर दिल्यानंतर रेमडेसिवीर चालत की नाही चालत हे सुध्दा बघीतल पाहीजे, देतात का ते बघा. आम्हांला आरोप करायचे नाहीत परंतु आज तीथे अशाप्रकारच जर काम चालत असेलतर निश्चितपणे आपण त्याठिकाणी कारवाई केली पाहीजे. आम्ही जर आता वायसीएमला पेशंट पाठवलातर असं काही नाही की पेशंट त्याठिकाणाहून सहीसलामत येतो पण जो रेश्यो आहेना तो खुप हेल्दी आहे परत येण्याचा. रुबी अलकेअरला पाठवला की हेल्दी रेश्यो आहे. माझा दुसरा एक कार्यकर्ता आहे शिवसेनेचे माजी नगरसेवक होते प्रविण खिल्लारे यांचा भाऊ आहे रवि खिल्लारे त्याला आम्ही जम्बो कोवीडला ऍडमीट केलं, बेड लागत होता सांगीतलच नाही आम्हांला. ज्या दिवशी दादेवारनी तीथे राऊंड घेतला आणि राऊंड घेतल्यानंतर मी दादेवारांना सांगीतल की सर तुम्ही चाललाच आहेत तर तेवढ बघालका प्लिज, माझा असा असा पेशंट आहे. मग तीथ त्यांनी सांगीतल त्याला एनआययूवरती लागणार आहे, ताई क्रीटीकल कंडीशनला पेशंट आहे आपल्याला शिफ्ट करावा लागेल, रुबी अलकेअरला शिफ्ट केला आज पेशंट बरा आहे. या स्टेजला जावुन जर का आमच्या पेशंटला त्याठिकाणी काम होणार असेल आणि आमचे लोक जर त्याठिकाणी पॅनिक होत

असतीलतर किंवा या सगळया आमच्या बोलण्यांने, तुमच जे काय म्हणण आहे ते आणि खर सांगीतल्यानंतर मला असं वाटतय की साहेब तुम्ही जर का तीथे कारवाई नाही केली आणि स्पर्श वरती आपण जर गुन्हा दाखल नाही केला तर आम्हांला तुमच्या वरती गुन्हा दाखल करावा लागेल आणि विनंती आहे साहेब कुठल्याही कमीशनरवरती तुम्हांला अशाप्रकारच हयुम्यूलेट करण्याची आमची मानसीकता नक्कीच नाही परंतु आम्हांला मजबूर करु नका तुमच्याकडे वेळ असताना तुम्ही जर वेळेत जर का तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला असतातर आज ऍटोक्लस्टरला दुसरी कुठलीतरी संस्था बसली असती आणि चांगल काम त्याठिकाणी झाल असतं पण आपण ते केल नाही आणि म्हणून मला असं वाटतय की तुम्ही जर ते केल नाहीतर तुमच्यावरती आम्हांला गुन्हा दाखल करावा लागेल. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब ज्या काही छोटया छोटया गोष्टी आम्ही सांगीतल्या आहेत, आम्हांला मान्य आहे की आम्ही काही त्यातले तज्ञ नाही आहोत. कारण की आम्ही बोलायला लागलो की अनेक तुमच्या आजुबाजूने आम्हांला असं काही जो लुक असतो की यांना काय कळतं तर तो जो लुक आहे तो लुक नका देऊ. आम्ही मुर्ख असू पण आम्ही लोकांच्यासाठी, लोक आमच्यामध्ये देव शोधायला लागलेत आता आणि आम्हांला हे देवपण नाही घ्यायच. जी माणस आम्ही वाचवू शकत नाहीत ज्या लोकांना आम्ही आरोग्य सुविधा देऊ शकत नाहीत त्यांनी जर आम्हांला सांगीतल की तुम्ही आमच्यासाठी काहीतरी करा, बेड दया, ऑक्सिजन बेड दया, त्याला व्हेन्टीलेटर दया आणि आम्ही उपलब्ध करुन देवू शकत नाही ही आमची शोकांतीका आहे आम्ही सांगू शकत नाही साहेब, बाहेर. आम्ही तुम्हांला सांगू शकतो. मा.महापौर साहेब, जशी यांनी अधिका-यांची कमिटी केलेली आहे तशी नगरसेवकांची कमिटी या सगळया सेंटरवरती झाली पाहीजे आणि खर काय आहे त्या त्या ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज मिळाले पाहीजेत किमान आयुक्तांना मिळाले पाहीजेत आणि पत्रकार बंधुना मिळाले पाहीजेत ते करा एवढीच आपल्याला विनंती आहे. जवळपास साडेतीन हजार लोक या शहरामध्ये वारलीत त्यात बाहेरची एक हजार धरा म्हणजे दोन हजार तरी लोक आपले या शहरातले गेलेले आहेत. तो जो घोळ आहे त्यात मला काही फार पडायच नाही कारण मी त्याच्यावरती खुप सविस्तरपणे आयुक्तांना पत्र दिलेल आहे त्याच त्यांनी उत्तर दयाव. कारवाई कुणावरती करायची तर स्पर्श वरती करा ऍंशी हजार ते एक लाख रुपये मागीतले म्हणून खंडणीचा गुन्हा दाखल करा आयुक्त साहेब. त्याच बरोबर परवाच्या दिवशी सुनिता तापकीर आमच्या ज्या नगरसेवीका आहेत यांनी आपल्याला ऍम्ब्युलन्सच्या संदर्भात सांगीतल आणि भाटनगरला जी एजन्सी

आहे काम करणारी साहेब, आपण त्याच्यावरती काय कारवाई करायला पाहीजे होती. माझ्या वॉर्डातले जे आहेत त्यांचा नातेवाईक गेला त्यांच्याकडन आठ हजार रुपये घेतलेत म्हणून त्यांनी मला तक्रारी अर्ज पाठवलेला आहे आपल्याला तो व्हॉटसप करते ती जी एजन्सी आहे ती तातडीने आपण बदलली पाहीजे. त्याठिकाणी दुसर कुणालातरी नेमा आणि अशाप्रकारची पिळवणूक जे कोण करणार असतील त्यांच्यावरती गुन्हे दाखल करा एवढच आपल्याला याठिकाणी सांगते आणि परत एकदा मा.महापौर साहेब, भावनेच्या भरात काही बोलल गेल असेलतर मला माफ कराव, थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमच्या या भावना प्रत्येकांनी याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. याच्यामध्ये मुख्यत: नगरसेवकांची जी भूमिका आहे आम्ही वारंवार तुमच्याकडे येतो तुम्हांला काही सूचना करतो आणि त्या पध्दतीने आपण काम कराव अशा प्रकारची आपेक्षा आम्ही व्यक्त करतो कारण आम्ही सर्व जण ग्राऊंड लेव्हलला काम करतो. मा.महापौर साहेब, आपण सगळेजण तळागाळात आहोत आयुक्त साहेबांकडन किंवा प्रशासनाकडन अगदी तळागाळातला माणूस जावू शकत नाही त्यामुळ त्यांच्या ज्या काही अडचणी आहेत त्या पोहचत नाहीत म्हणून आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणून प्रशासनाकड जात असतो आणि त्याठिकाणी काही सूचना मांडण्याचा आपण प्रयत्न सातत्याने करतो. आयुक्त साहेब मागच्या वर्षी कोरोना आला आणि जगावरती कधीच आपण स्वप्नातही विचार केला नव्हता एवढ मोठ संकट जगावरती आलं आणि हे पुन्हा येईल असं आपल्याला वाटल नव्हतं. आपल्याला वाटल की हे आता सगळ चांगल झाल आता पुन्हा कोरोनाचा स्ट्रेन येणार नाही अशाप्रकारच्या भावनेतून आपण त्याठिकाणी वावरत होतो. परंतु अचानकपणे परत कोरोनाची दुसरी लाट आली आणि या दुस-या लाटेमध्ये फार मोठया प्रमाणात पेशंट आज आपल्याला दिसतात. सगळयात महत्वाचा मुद्दा आता सिमाताईनी आणि वैशालीताईनी त्या गोष्टीचा उल्लेख केला की डेड रेश्यो मागच्यापेक्षा वाढलेला आहे. मागच्या तुलनेत मृत्यूदर वाढला आहे, मागच्या तुलनेत पेशंटची संख्या पण वाढलेली आहे. म्हणजे जवळपास तीपटीने पेशंट मागच्या वर्षी पेक्षा या वर्षी वाढलेले आहेत. या सगळया परिस्थितीचा आपण विचार केलातर आपल्याला उदयाच्या काळामध्ये म्हणजे आजच संकट तर आहेच याच्यावरती आपल्याला मात करायचीच आहे परंतु आजून भविष्यात अशाप्रकारची तीसरी स्ट्रेन येवू शकते अशाप्रकारची भीती याठिकाणी आपल्या सगळया समोर आहे. ते करत असताना आपल्याला या सगळया गोष्टीसाठी तयार

रहाव लागणार आहे. आता प्रत्येकानी त्यांच्या भावना व्यक्त करताना ज्या काही त्रुटी आहेत त्या त्रुटी सांगण्याचा प्रयत्न केला. मा.महापौर साहेब, काही चांगल्या गोष्टी पण शंभर टक्के घडतात म्हणजे या सगळया कठीण प्रसंगामध्ये प्रशासनातली काही लोक खुप चांगल काम करतात, डॉक्टर्स काही ठिकाणी खुप चांगल काम करतात. मा.महापौर साहेब, मी उल्लेख करु इच्छितो की आमच्या भोसरी हॉस्पिटलमध्ये खुप चांगल काम चालू आहे. आमच्या भोसरी हॉस्पिटलची जी टिम आहे मग तीथे डॉ.ढगे असतील, डॉ.म्हस्के असतील यांचेकडून अतिशय चांगल्या पध्दतीची ट्रिटमेंट भोसरी हॉस्पिटलला पेशंटला मिळते त्याठिकाणी प्रत्येक पेशंटची काळजी घेतली जाते. मगाशी शिरुरचे खासदार मा.अमोलजी कोल्हे यांनी भोसरीच्या हॉस्पिटलला व्हिजीट केली त्यांच्या बरोबर आम्ही प्रत्येक ठिकाणी जाण्याचा प्रयत्न केला. खासदार साहेबांनी लांबून लोकांना विचारल की तुम्हांला कशा पध्दतीची ट्रिटमेंट मिळते, तुम्हांला सगळया गोष्टी व्यवस्थित आहेत का तर त्यांच्या चेह-यावरती जे काही हावभाव होते त्याच्यावरुन दिसत होत की खुप चांगल्या पध्दतीच काम त्याठिकाणी चाललेल आहे. मा.महापौर साहेब, काल आमच्या तेथील एक अपंग व्यक्ती आहे त्या व्यक्तीला मुल नाहीत त्यांच्या मिसेसला तीन दिवसापुर्वी आम्ही भोसरी हॉस्पिटलला ऍडमीट केल रसाळ मामा म्हणून आम्ही त्यांना म्हणतो, त्यांचे दोन्ही पाय आधु आहेत त्याच्यामुळ त्यांना कुठली क्रिया स्वत:हून करता येत नाही आणि त्यांचा दुर्दैवाने रिपार्ट पॉझिटीव्ह आला. त्यांनी मला फोन केला की माझा रिपोर्ट पॉझिटीव्ह आला मग त्यांना विचारल बाकीची मदत तुम्हांला कशी काय करु शकतो हॉस्पिटलमध्ये, मी डॉ.ढगेना फोन केला आणि कॉन्फरन्स कॉलवर त्यांना घेतल त्यावेळेस डॉ. ढगेनी त्यांना त्यांची ऑक्सिजन लेव्हल विचारली, त्यांना काय त्रास होतो हे सिम्टन्स विचारले आणि त्यांना सांगीतल की तुम्हांला हॉस्पिटलमध्ये ऍडमीट केल तर मा.महापौर साहेब आपल्या वायसीएम मध्ये सहाव्या मजल्यावर अशाप्रकारची अपंग व्यक्तीसाठी एकच त्याठिकाणी सुविधा आहे आणि एकच टॉयलेट आहे त्याच्यामुळ तुम्हांला तीथे ऍडमीट व्हाव लागेल अन्यत: जर हे सगळे पॅरामीटर्स तुमचे चांगले असतीलतर तुम्हांला घरी सुध्दा आम्ही ट्रिटमेंट देवू शकतो. त्यांना इतका आनंद झाला की पन्नास टक्के तो माणूस ढगेंच्या बोलण्यातून इतका आनंदी झाला की त्याला वाटल की आपण पन्नास टक्के बरे झालेलो आहोत. डॉ.ढगेनी पण सांगीतल की कुणालातरी पाठवा म्हणजे मी तुम्हांला गोळया देतो त्या कधी, कुठल्या घ्यायच्यात ते सांगतो आणि रोजच्या रोज तुमच्या तुम्ही मॉनीटर करायच अशा पध्दतीने त्यांनी सांगीतल आणि लगेच तशाप्रकारचा माणुस मी त्यांच्याकडे पाठवला त्यांना त्या

गोळया सुरु झाल्या. तरी हे जे चांगले अनुभव आहेत हे सुध्दा महत्वाचे आहेत. जे काम करणारे कर्मचारी आहेत आणि विशेषत: भोसरी हॉस्पिटल असेल, वायसीएम असेल, जिजामाता असेल याठिकाणी आपले महापालिकेचे कर्मचारी काम करतात, त्याठिकाणी खुप चांगल काम चालल आहे. मला वाटत माझ्या या म्हणण्याशी सगळे नगरसेवक सहमत असतील. ज्याठिकाणी आपले परमनन्ट लोक आहेत ते अतीशय उत्तम काम करतात. मागच्या वर्षाच्या काळामध्ये सुध्दा जीबीमध्ये आम्ही अनेक लोकांच कौतूक केलं. याठिकाणी विनायक पाटील यांच कौतूक झाल, डॉ.गोफणेंच कौतूक झाल असे अनेक लोकांनी फिल्डवरती काम केल ते नंतर पॉझिटीव्ह पण झाले. परंतु त्यांच्यावर जो प्रसंग आला त्याचा फायदा त्यांनी निश्चितपणे पेशंटला ट्रिटमेंट करताना दिलेला आहे. त्याच्यामुळे खुप चांगल काम महापालिकेचे जे हॉस्पिटल आहेत त्याठिकाणी चालू आहे. याच्याबद्दल मला निश्चितपणे त्यांच कौतूक करावस वाटतं. त्याचबरोबर आतादुसरी जी बाजू आहे आता प्रत्येकाच्या बोलण्यातून हे आल की जे काही इतर संस्थांना आपण काम दिलेली आहेत मग ते जम्बो कोवीड असेल, ऍटोक्लस्टर असेल किंवा आणखीन वेगवेगळया ठिकाणी आपल्या महापालिकेच्या व्यक्तीरीक्त जी यंत्रणा आहे त्याठिकाणी ठेकेदार नेमलेल आहेत याठिकाणी मोठया प्रमाणात तक्रारी आहेत. ब-याच जणांनी नाव घेवून ऍटोक्लस्टरची आणि जम्बो कोवीडची तक्रार केली. त्याठिकाणी कुणी प्रॉपरली आपल्याला रिस्पॉन्स देत नाही, पेशंटचे नातेवाईक जेव्हा फोन करतात, आपण सांगतोत तरी सुध्दा त्यांना त्यांच्या नातेवाईकाशी बोलता येत नाही. म्हणजे यांनी काय केल एकतर त्यांचे फोन काढून घेतात ते बरोबर आहे कारण की फोनवरती माणूस वारंवार बोलतो. परंतु एखादया कुटूंबातल्या त्याच्या नातेवाईकाशी त्याला बोलायच असतं दिवसातून किमान एक ते दोनवेळेस तरी त्याच्या नातेवाईकाच त्याच्याशी बोलणं झाल पाहीजे परंतु प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये तशाप्रकारच बोलणं होत नाही. आता वायसीएमला जर मी डॉ.वाबळेंना फोन केलातर, डॉ.लाठीना फोन केला, डॉ.विनायक पाटील यांना केलातर दहा मिनीटांनी, पंधरा मिनीटानी, अर्धा तासानी त्यांचा रिप्लाय येतो त्या पेशंटच स्टेटस ते सांगतात. त्या पेशंटची नेमकी कंडीशन काय आहे हे सुध्दा ते सांगण्याच काम करतात त्याच्यामुळे नातेवाईकाना निश्चितपणे चांगल वाटत की नाही, आपला पेशंट बरा आहे. दुर्दैवाने अनेक पेशंट जातात, आपल्या सभागृहातले सुध्दा आपले तीन सहकारी गेले, अनेकजण पॉझिटीव्ह होते मी सुध्दा मागच्या महीन्यात पॉझिटीव्ह होतो. अनेकजण या संकटातून जातात परंतु त्याला जर प्रॉपर इलाज झालातर, योग्यवेळी तुमचे सिम्टन तुमच्या लक्षात आलेतर तुम्ही लगेच टेस्ट केली आणि

ट्रिटमेंट सुरु केलीतर मला वाटत पेशंट क्रिटीकल कंडीशनमध्ये जात नाही. मा.महापौर साहेब, आपण आता निम्मे डॉक्टर झाल्यासारखच आहे कारण आपण प्रत्येकजण सगळयाना कौन्सलींग करतो म्हणजे जेव्हा फोन येतो तेव्हा आपण त्याला विचारतो की सिम्टन काय आहेत, तुला ताप येतो का, तुझी ऑक्सिजन लेव्हल काय आहे, तुझ एचआरसीटी केल आहे का, मग तु कुठल्या गोळया घेतल्यास कुठल्या डॉक्टराकड गेला त्याप्रमाणे आपण सुध्दा सगळेजण जे काही शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न करत असतो. महापालिकेचे जे हॉस्पिटल्स आहेत त्या हॉस्पिटल्समध्ये खुप चांगल काम चालल आहे हे पुन्हा एकदा आयुक्त साहेब तुम्हांला सांगतो. विशेषत: आमच्या भोसरी हॉस्पिटलमध्ये खुप चांगल काम त्याठिकाणी तीथले डॉक्टर्स करतात याच मी तुम्ही येण्याच्या आदि कौतूक केल पुन्हा एकदा मी त्यांच कौतुक करतो. या गोष्टीच अनुकरण जर सगळया हॉस्पिटलनी केल आणि विशेषत: जे काही प्रायव्हेट हॉस्पिटलला आपले बेड चालवायला दिले त्यांनी जर या गोष्टीच अनुकरण केल तर निश्चितपणे आपण या संकटामधून बाहेर पडू आणि त्या दृष्टिकोनातून प्रयत्न झाले पाहीजेत. मगाशी सिमाताईनी आणि अनेक लोकांनी याठिकाणी आपल्यावरती आरोप केले. मागच्या जीबीमध्ये मा.महापौरांनी आपल्याला सूचना केली होती किंवा आदेश दिले होते की तुम्ही पुढच्या जनरल बॉडीच्या आत ती जी काही तक्रार सभागृहात सगळेजण वारंवार मांडत होते त्याचा अहवाल तुम्ही पुढच्या जनरल बॉडीला सादर करावा आणि त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली त्याच्या किती खोलात गेले याच्या प्रकारची काय कारवाई झाली ही अपेक्षा आमची सर्वांची होती. परंतु कदाचित कामाच्या ओघामध्ये किंवा तुमच्याकडन दुर्लक्ष झाल असेल किंवा आज व्हायला पाहीजे पण झाल नाही. जनरलबॉडी तशी उशीरा झाली, ही विशेष सभा तुम्ही बोलावली परंतु मागच्या जनरल बॉडीत ते येणं अपेक्षीत होत परंतु ते आल नाही ते आता तरी यायला पाहीजे होतं. जे काय आहे ते सभागृहाच्या समोर आल पाहीजे, जे कोणी दोषी आहेत त्यांच्यावरती कारवाई झाली पाहीजे. मगाशी कुंदन गायकवाड आणि विकास डोळस यांनी जो काही मुद्दा मांडला, संदिप वाघेरे यांनी जो मुद्दा मांडला जर कुणी अशा पध्दतीने पैसे घेतले असतीलतर त्यांच्यावरती ताबडतोब कारवाई झाली पाहीजे. कारण ही बदनामी आपल्या शहराची होती आपल्या महापालिकेची होती. आपण याठिकाणी विश्वस्त आहोत आणि अशाप्रकारे जर होत असेलतर हे आपल्या शहराच्या दृष्टिने चुकीच आहे आणि आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब काळ आपल्याला या गोष्टीसाठी कधीच माफ करणार नाही. शेवटी राजकारण आणि पद ही कायम नसतात, आयुक्त साहेब तुम्ही सुध्दा या शहरामध्ये तीन चार वर्षे काम करणार

आहात परंतु या कठीण काळामध्ये आपण जे काही चांगल काम करु तेच काम सगळयांच्या लक्षात राहणार आहे. मी आपल्याला त्यादिवशी पण भेटून सांगीतल की अनेक आयुक्त आम्ही या सभागृहात पाहीले, अनेक आयुक्तांनी काम केलं आणि सगळयांनी आपआपल्या परीने या शहरासाठी जे काही योगदान देता येइल ते देण्याच काम केलं त्याच प्रकारची अपेक्षा आमची तुमच्याकडन आहे. खर म्हणजे तुम्हांला येवून तीन ते चारच महीने झाले आहेत परंतु तुम्ही आल्यानंतर हे फार मोठ संकट शहरावरती आलेल आहे, हे खुप मोठ तुमच्यावरती चॅलेंज आहे. कारण आज तुम्ही ज्या परिस्थितीत, ज्या सिचवेशन मध्ये काम करता आम्ही प्रत्येकजण आपल्याकडे येतो, प्रत्येकजण आपआपल मत मांडत असतो तुम्ही त्याठिकाणी ऐकूण घेता परंतु आमची आपल्याला विनंती आहे की त्या ज्या काही सूचना आपण आमच्या ऐकूण घेता त्याच्यावरती अंमलबजावणी पण झाली पाहीजे अशा प्रकारची आमची अपेक्षा आहे. आज आपल्याकडे रेमडेसिवीरचा मोठया प्रमाणात तुटवडा आहे. त्याठिकाणी ऑक्सिजन मिळत नाही या दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. ब-याच जणांनी उल्लेख रेमडेसिवीरचा केला परंतु जे महापालिकेचे डॉक्टर्स पॉझिटीव्ह होते त्यांना विचारल की तुम्ही ज्यावेळेस सिरीअस कंडीशन मध्ये होता त्यावेळेस तुम्हांला रेमडेसिवीर दिलं का तर त्यांनी सांगीतल दिल आणि त्याचा शंभर टक्के त्यांना फायदा झाला. रेमडेसिवीर अत्यंत उपयोगी इंजेक्शन आहे ज्याचा स्कोर पाच सातच्या पुढे आहे त्याचवेळेला ते दिल गेल तर तो पेशंट त्याच्यातुन लवकर बाहेर पडतो हे अनेक डॉक्टरांनी सुध्दा सांगीतल. याच्यात दोन मतप्रवाह सुध्दा असु शकतात परंतु रेमडेसिवीर हे उपयोगी आहे. आज आम्हांलाही मान्य आहे की त्याठिकाणी पुरवठा कमी होतो, मी परवाच आयुक्त साहेब तुम्हांला म्हणल की तुम्हांला आऊट ऑफ कॉस्ट जावून तुम्हांला काही गोष्टी कराव्या लागणार आहेत. मगाशी सिमाताईनी उल्लेख केला की तुम्हांला तुमच्या वरिष्ठाशी बोलताना कदाचित काही मर्यादा येत असतील परंतु आमचा उपयोग तुम्ही करुन घ्या. शेवटी आम्हीही लोकांचे प्रतिनिधी आहोत आम्हांला तुमच्यापेक्षा जास्त तुमच्या वरिष्ठांशी आम्हांला अधिकारवानी बोलता येते कारण आम्ही लोकांचे प्रतिनिधी आहोत. जर एखादी गोष्ट तुमच्याकडन नसेल सुटततर तुम्ही आमची मदत घ्या. मा.महापौर साहेब सगळे नगरसेवक मग तो कुठल्याही पक्षाचा असू दयात या कठीण प्रसंगी प्रशासनाबरोबर आहेत आणि आमची अशी अपेक्षा आहे की आमची मदत घ्यावी. सिमाताईनी उल्लेख केला की दादाकडे... शंभर टक्के मा.अजीतदादांकडे आपण जाऊ आम्ही अनेक विषया संदर्भात, रेमडेसिवीरच्या तुटवडया संदर्भात दादांशी बोललो आमचे नेते बोललेत लसीकरणाच्या बाबतीत

सुध्दा आम्ही दादांशी बोललो आहे, ऑक्सिजनच्या संदर्भातही दादांशी बोललो, राज्यसरकार, अजीतदादा त्या त्या पातळीवर प्रयत्न करतात आपल्या शहरावर नाहीतर आपल्या पुर्ण राज्याला या सगळया गोष्टी कशा मिळतील, रेमडेसिवीर कसं मिळेल, सगळयांचा ऑक्सिजनचा पुरवठा कसा होईल अशाप्रकारची भूमिका राज्यसरकारची पण आहे आणि ते करत असताना आयुक्त साहेब तुमच्या पातळीवर तुम्हांला काही अडचणी येत असतीलतर आम्हांला सांगा. आम्ही सुध्दा तुमच्या बरोबर त्याठिकाणी विनंती करु, आम्ही सुध्दा प्रयत्न करु परंतु तुम्ही सगळयांना बरोबर घ्या आणि शेवटी प्रशासन एकट काम करु शकत नाही. आम्ही आणि तुम्ही हे एका रथाची दोन चाक आहेत आणि तुम्ही जर आमचा उपयोग करुन घेतलातर निश्चितपणे या संकटातून खुप लवकर आणि चांगल्या पध्दतीने बाहेर पडू. आज मागच्या तीन चार दिवसात थोडीशी आकडेवारी कमी होती असं दिसतय परंतु उदया ही आकडेवारी वाढेल का कमी होईल हे माहीत नाही परंतु ही कमी झालीतर खुप चांगल आहे परंतु वाढलीतर आपल्याला त्या दृष्टिकोनातून नियोजन करणे गरजेच आहे आणि त्यादृष्टिन तुम्ही आकुर्डी, भोसरी, थेरगाव आणि जीजामाता या चार ठिकाणी तुम्ही नवीन बेडस सुरु करण्याचा प्रयत्न करताय आणि त्या दृष्टिकोनातून तुम्ही प्रोसेस पण केली आहे. त्याच्यामध्ये तुम्ही टप्याटप्याने करतात तर माझी आपल्याला विनंती आहे की तुम्ही चारही ठिकाणी पटकन करावे, त्यासाठी आमची काही मदत लागलीतर सांगा. मी भोसरीची माहीती घेतली भोसरीमध्ये ऑक्सिजन प्लान्ट सुरु करायचा आहे त्यासाठी तुम्हांला तेथे जागा पाहीजे. मी नगररचना विभागाशी बोललो भोसरी हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी बोललो. हॉस्पिटलच्या बाजूने जी जागा आहे ती खाजगी लोकांची जागा आहे ती महापालिकेची जागा नाही किंवा ती गाववाल्यांची जागा नाही. परंतु त्याला काही ऑप्शन्स आहेत मी नगररचनेच्या लोकांशी बोललो आपण त्याचा मालक शोधलातर त्याचा आगाऊ ताबा पण आपल्याला मिळू शकतो. कारण या परिस्थितीमध्ये निश्चितपणे मला खात्री आहे की कोणी जागा मागत असेलतर तो तुम्हांला आगाऊ ताबा देवू शकतो त्यासाठी आम्ही पण प्रयत्न करु पण आयुक्त साहेब त्यासाठी तुम्ही बोललात, तो जागा मालक शोधलातर येत्या दोन दिवसात ती जागा आपल्याला ताब्यात येवू शकते. कदाचित आपल्याला मोबदला त्याला नंतर दयावा लागेल परंतु जागातर ताब्यात देवू शकतो आणि त्याठिकाणी आपण ऑक्सिजनचा प्लॉन्ट बसवलातर मला वाटत लवकरात लवकर भोसरी हॉस्पिटलमध्ये जे ॲडीशनल बेड आपल्याला सुरु करायचे आहेत किंवा काही व्हेन्टीलेटर आपल्याला त्याठिकाणी दयायचे आहेत ते लवकर सुरु होवू शकतात. त्यामुळ तुम्ही त्यादृष्टीकोनातून आपण प्रयत्न करावेत

आम्ही तुम्हांला सांगण्याचा प्रयत्न करतो. वारंवार तुम्हांला सांगतो याचा अर्थ असा की आम्हांला वाटत लोकांची ती गरज आहे त्या दृष्टिने आम्ही आपल्याला विनंती करतो तुम्ही सुध्दा ते सकारात्मक दृष्टिकोनातून घ्याव. आम्ही तुम्हांला मदत करायला तयार आहोत तुम्ही ती मदत घ्यावी. आमच्या सगळयांच्या वतीने जे जे काही आरोप झालेत किंवा जे काही चांगल काम झाल आहे त्याचही आम्ही कौतूक केलं. तरी या सगळया गोष्टीचा प्रशासनाने याठिकाणी खुलासा करावा आणि मा.महापौर साहेब तुम्ही तसे आदेश दयावेत आणि जे कोणी चुकलय त्यांच्यावरती आयुक्त साहेब आपण कठोर शासन कराव अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

मा.सागर आंगोळकर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. ब-याचवेळा पासून आपल्याकडे चर्चा चालू आहे स्पर्श आणि कोवीड सेंटर बद्दल. स्पर्श बद्दल मला याठिकाणी एकच खुलासा करायचा आहे गेल्या महीनाभरापुर्वी आयुक्तांना मी एक पत्र दिल होतं की स्पर्श एजन्सीलाच आपण ऍटोक्लस्टर चालवण्यास दिलेल आहे तरी तुम्ही शॉर्ट नोटीस करुन तीथ दुस-या एजन्सीला काम करु दयाव. भविष्यात जर तीथ काही ऍलीगेशन झालेतर त्याला पार्टी म्हणून बीजेपी किंवा आम्ही जबाबदार नसुतर प्रशासन जबाबदार असेल. त्यावेळेस आयुक्तांच उत्तर अस होत की तीथ ऑलरेडी रनींग पेशंट आहेत ते काढता येणार नाही म्हणून पंधरा दिवसाचा टाईम दया म्हणून आयुक्तांशी मी चर्चा केली होती माझ वैयक्तिक पत्र आहे. याठिकाणी एवढच मला सांगायच आहे की आज स्पर्शवर जे काही ऍलीगेशन होतात त्यात नगरसेवक म्हणून किंवा सत्ताधारी पक्ष म्हणुन जर आमची काही इन्व्हॉल्मेंट असेलतर आम्हांलाही त्याच्यामधे दोषी धराव. पण याठिकाणी आम्ही दोषी नसून ते केवळ आणि केवळ प्रशासन त्यांनी शॉर्ट टेंडर काढल नाही मा.महापौर साहेब तुमच्या बरोबर माझी चर्चा झाली होती चाळीस दिवसापुर्वी. त्यामुळ आयुक्तांनी याच्यावर कठोर कारवाई करावी आणि त्यांना काढल नाही म्हणून मी आयुक्तांचा याठिकाणी निषेध करतो. दुसरा एक विषय कोवीड सेंटरचा आहे कोवीड सेंटरला माझे सासरे पंधरा दिवसापुर्वी गेले, हा माझ्यासाठी सेन्सिटीव्ह विषय आहे त्यांची एक इन्शुरन्स पॉलीसी आहे त्या इन्शुरन्स पॉलीसीसाठी लागणारे डॉक्यूमेंटस कोवीड सेंटरनी डिस्चार्ज समरीवेळी दयावे लागतात. आज पण त्यांना अस उत्तर देण्यात आल की तुम्ही अर्ज करा तरच तुम्हांला डिस्चार्ज समरी देवू, अजून इन्शुरन्सची फाईल नाही. साहेब, ठिक आहे ज्यांची परिस्थिती आहे त्यांना इन्शुरन्सची गरज नाही पण आज या कोवीडमध्ये अशी कुटूंबाची हानी झालेली आहे की त्यांचा आज कर्ता पुरुष गेलेला

आहे. तरी माझ या कोवीड सेंटर चालवणा-यांना अस अवाहन आहे आपल्या मार्फत आणि आयुक्तांनी असे आदेश दयावेत की जे काही इन्शुरन्सचे डॉक्युमेंटस फुलफील करण्यासाठी लागणारी कागदपत्रे आहे त त्यांनी जे डेड झालेले आहेत त्यांच्या नातेवाईकांना सुलभतेने उपलब्ध होतील याची ग्वाही आयुक्तांनी घ्यावी. माझा तीसरा एक महत्वाचा विषय आहे. आपण जनधन योजनेअंतर्गत भारतातल्या प्रत्येक नागरीकांनी अकौंट उघडलेल आहे, गोरगरीबांनी अकौंट उघडलेल आहे पत्रकार बंधु-भगीनीनो माझ अस आवाहन आहे ज्यांनी ते अकौंट उघडलेल आहे त्यांना एक लाखाचा इन्शुरन्स कव्हर आहे ज्यांची डेड झालेली आहे त्यांनी त्या इन्शुरन्सचा लाभ घ्यावा आणि पार्टीच्या माध्यमातून प्रत्येक नगरसेवकांनी शेवटच्या घटकापर्यंत त्या इन्शुरन्सचा लाभ होइल असं मी याठिकाणी आवाहन करतो आणि थांबतो.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. जवळपास तीन तास झाले आपण या विषयाच्या संदर्भात चर्चा करतो. खरतर चांगले वाईट अनुभव या शहराने वर्ष दिड वर्षाच्या काळात अनुभवलेले आहेत. ही वेळ निश्चितच राजकारण करण्याची नाही. ज्या पध्दतीने सभागृहामध्ये सगळया पक्षाचे नगरसेवक आपल मत मांडत होते आणि पोटतीडकीने त्यांच्या मनामधली हीच भावना होती की माझ्या शहरामधला एखादा पेशंट हा वाचला पाहीजे. मला नाही वाटत की याच्याशिवाय या सभागृहामधल्या नगरसेवकांच्या मनामध्ये दुसरी भावना आहे. दुर्दैवान या संदर्भामध्ये ॲटोक्लस्टर असेल, जम्बो कोवीड असेल मला आठवतय की याच्या अगोदर आपण मागच्या कोवीडच्यासाठीच्या काळामध्ये आपण सभागृहामध्ये खुप मोठी चर्चा केली. भाऊसाहेब इथ आहेत, योगेशजी इथ आहेत, अजीत भाऊ तुम्ही पण या सभागृहामध्ये होते आणि आपण अशाच पध्दतीन वायसीएमच्या डॉक्टरांच्या संदर्भामध्ये जी चांगल काम करतात आज आपल्या डोळयाच्या समोर एक आदर्श उभा आहे. आज वायसीएममध्ये जवळपास साडेसहाशे पेशंट आहेत आणि अत्यंत चांगल्या पध्दतीन वायसीएममध्ये ट्रिटमेंट दिली जाते बरेच लोक असे म्हणतात की वायसीएमची परिस्थिती इतर हॉस्पिटलपेक्षा खुप चांगली आहे. प्रायव्हेट हॉस्पिटलपेक्षाही खुप चांगल्या पध्दतीने वायसीएममध्ये सेवा मिळते ते खरतर हे आपण केलेल्या कामाच यश आहे. माझी या निमीत्तानी सभागृहाला विनंती आहे एखादया चांगल्या वाईट गोष्टीची आपण या सभागृहामध्ये चर्चा करतो आपल मत मांडतो आणि गेल्या तीन तासापासून आपण ज्या पध्दतीने स्पर्श असेल किंवा जम्बो कोवीड सेंटर असेल म्हणजे सिमाताई बोलता बोलता एक गोष्ट

बोलल्या मागच्या जीबीमध्ये स्पर्शच्या संदर्भामधला अहवाल वीस दिवसामध्ये येणं अपेक्षीत होता, सुदैवाने तो अहवाल जर वीस दिवसामध्ये आला असतातर मला असं वाटत की आज सभागृहामध्ये ॲटोक्लस्टर किंवा जम्बो कोवीड सेंटरच्या संदर्भामध्ये चर्चा झाली नसती. मला माहीत नाही की ताई तुम्ही तीथ गेले तीथली परिस्थिती बघीतली मग आपला डॉक्टर तीथल्या ॲडमिनीस्ट्रेशनच्या लोकांच्या हाताखाली काम केल्यासारखी जर परिस्थिती होत असेलतर, खरतर ॲटोक्लस्टरला असणारी कुठली एजन्सी असेल किंवा जम्बोला कुठली एजन्सी असेल याला लोक बोट दाखवणार नाहीत तर बोट आपल्या सगळयाकड दाखवणार. मा.आयुक्त साहेब लोक आपल्याला विचारतील की पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये काय नाही, पैसा आहे आपल्याकड, मॅनपॉवर आहे आपल्याकड, आपल्याकड इन्फ्रास्ट्रक्चर आहे या सगळया गोष्टी असताना खरतर आपण एखादया एजन्सीवर आपली हातबलता दाखावतो. मी खरतर कुंदनच आणि विकासच अभिनंदन करेल. सभागृहामध्ये याप्रकारची चर्चा होईल का नाही अशा पध्दतीची परिस्थिती झाली आणि खरतर दोन तरुण नगरसेवकांनी मनामधल्या भावना व्यक्त करण्याच कारण एवढच आहे की या शहरामधल्या लोकांना चांगल्या पध्दतीची सुविधा मिळाली पाहीजे. मा.महापौर साहेब, तीन तास चर्चा झाली पुन्हा वीस दिवसापुर्वीची परिस्थिती आपल्याला पुढचे वीस दिवस करायची की काय हा खरतर माझ्या दृष्टिने अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. मला आलेला अनुभव मी मा.आयुक्तांना चार-पाच दिवसापुर्वी बोललो. म्हणजे आताची ॲटोक्लस्टरची परिस्थिती काय, म्हणजे एखादया नगरसेवकांनी पत्र दिल तीथली परिस्थिती सुधारत नाही. मा.महापौर साहेब, एका वाक्यामध्ये माझी आपल्याला विनंती आहे आज ॲटोक्लस्टर, कोवीड सेंटरला आठ-दहा दिवसाचा एखादा पेशंट त्यांच्या अंडर ॲडमीट झाला, मला वाटत की आपल्या महापालिकेमध्ये अत्यंत सक्षम अधिकारी आहेत मी डॉ.गोफणेंच कौतूक करेल. ज्या दिवशी मी आयुक्तांना बोललो त्याच दिवशी गोफणे सारखा आपला डॉक्टर ॲटोक्लस्टरला रात्री दहा वाजता जावून मला सांगतो की, दादा या पेशंटची अशी अशी परिस्थिती आहे. म्हणजे एवढे संवेदनशील आपल्या महापालिकेतही चांगली लोक आहेत. त्यांच्याकडे ॲडमिनीस्ट्रेशनची ताकद आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला मी एवढीच विनंती करतो की ॲटोक्लस्टर आणि जम्बो कोवीड सेंटर, मला कुणाचीही नाव नाही घ्यायची. कोण एजन्सी चालवतो, कुणाच टेंडर आहे, कुठल्या नेत्याच आहे त्याच्याशी मला काहीही घेणंदेणं नाही. आपण मा.आयुक्तांना तो आदेश दिला पाहीजे की आज खरतर आपण तीस तारखेला सर्वसाधारण सभा घेतो. खरतर वायसीएमच कौतूक आपण करतो आता, याच सभागृहामध्ये आपण

वायसीएमच्या बद्दल उलटयासुलटया चर्चा केल्या. आज वायसीएममध्ये अनेक डॉक्टर आपला जीव मुठीत घेवून काम करतात आणि अशाच पध्दतीचा ठराव मला वाटत की मागच्या वर्षभरापुर्वी केला होता की ते वायसीएममध्ये काम करतात डॉक्टर मग तो कंत्राटीचा असेल, बीएएमएस असेल, तीथल्या नर्सेस असतील आपल्या जीव मुठीमध्ये घेवून काम करतात. आपण त्यांनाही याठिकाणी नोकरी देऊ अशा पध्दतीच आश्वासन दिल होतं. प्रशासनाला आपण तशा पध्दतीची विचारणा केली का. दुर्दैवाने हे डॉक्टर्स पंधरा-पंधरा, वीस-वीस दिवस महापालिकेच्या प्रवेशद्वाराच्या समोर एवढ आंदोलन करतात, मा.आयुक्त साहेब आपल्याला एवढी सुध्दा संवेदनशीलता नाहीय की डॉक्टर्स याठिकाणी आमरण उपोषणाला बसलेत आज त्याच डॉक्टरांकडून आपण या शहरवासीयांची सेवा करुन घेतोय. मला वाटत की या महापालिकेमधली परिस्थिती अत्यंत चांगली आहे. या महापालिकेला पगारासाठी शासनाकड भीक मागायची गरज नाही. खरतर कोवीड सेंटर केल आपण ते चालवण्याची ताकद, क्षमता आपल्यामध्ये आहे, ऍटोक्लस्टर ताब्यात घ्या म्हणून सन्मा.नगरसेवांनी सांगीतल. ते तुमच्या जागेत आहे, महापालिकेच्या ताब्यामध्ये आहे ते ती जागा आपली आहे. मा.महापौर साहेब, मी आपला अधिक वेळ नाही घेणार. माझी कळकळीची आपल्याला विनंती आहे, म्हणजे मी हा विषय खरतर माझ्या पार्टीच्या नेत्याशी बोललो की कदाचित या कोवीडची इथली परिस्थिती अत्यंत बीघडत चाललेली आहे याच्यावर आपण उपाय शोधतो का आलेला दिवस ढकलतो अशा पध्दतीची परिस्थिती आहे आणि दुर्दैवाने या सभागृहाच्या माध्यमातून मा.महापौर साहेब आपल्याला विनंती करतो एक तारखेपासून म्हणजे आज वायसीएम मधल्या दहा डॉक्टरांचे नाव घेतले सभागृहामध्ये त्या डॉक्टरांना ऍडमिनीस्ट्रेटर म्हणून तीथ नेमा. आणि मला नाही वाटत की एखादयाला नेमल्यानंतर तीथले उरलेले डॉक्टर्स, नर्सेस, ऑफीस बॉय तो काही घेवून जाणार नाही. आपण पैसा पाण्यामध्ये घालवतो आणि दुर्दैवान कोवीड सेंटरची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. म्हणजे मला आलेले अनेक अनुभव आहेत म्हणजे पेशंट गेलेला आहे आणि त्या पेशंटची माहीती दिली जाते, दुर्दैव आहे आणि अशा पध्दतीच कुणालातरी पोसण्याच काम मला असं वाटतय की या सभागृहाच्या माध्यमातून आपण करण्याची गरज नाही. आपल्या दोन तीन नगरसेवकांनी सांगीतल की कोवीड मध्ये गेल्यानंतर ट्रिटमेंटमध्ये जातो का डेडहाऊसला जातोय ही जर परिस्थिती जर आपले सन्मा.नगरसेवक जर म्हणत असतीलतर मला वाटते की त्यांच्या मनामधल्या भावना किती तीव्र आहेत आणि त्यावर आपण काय केल पाहीजे याद्दष्टिने खरतर मा.महापौर साहेब आपण

विचार केला पाहीजे. मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे तुम्ही अत्यंत चांगल काम करता तुमची टिम अत्यंत चांगल काम करते, नामदेवराव चांगल काम करतात. जे आपल्याला टाईम देतील याच्यामध्ये कुठल्याही पक्षाचा भेदाभेद न करता जी वेळ देवू शकतील, म्हणजे अधिका-यांनीच पळाव अशातली परिस्थिती नाही आपणही पळू शकतो. एखादा अधिकारी एखादया सहा.आयुक्तांना किंवा विभागीय आयुक्तांना जोरात नाही बोलू शकत पण एखादा पदाधिकारी हा त्या विभागीय आयुक्तांना सुध्दा जोरात बोलू शकतो ओटू माझ्या शहराला देणार का नाही ते सांगा, तीच इंजेक्शनची परिस्थिती आहे म्हणजे गेल्या दोन दिवसाची जर परिस्थिती बघीतलीतर आपल्या शहराला रेमडेसिवीर इंजेक्शनचा एकही ढोस देवू शकले नाही. मी तर टिका नाही करणार, का देवू शकले नाही का नाही.  अजीतभाऊ खरतर सिप्ला कंपनी इथ आहे या निमीत्तान मी तुम्हांला विनंती करतो की तुम्ही मा.पालकमंत्र्यांना विनंती करा, तुमच्या खासदारानां विनंती करा, म्हणजे सुप्रिया ताईच्या मतदारसंघामध्ये सिप्ला कंपनी आहे, कुरकुंभ एमआयडीसीमध्ये सिप्ला आहे. आपल्या जिल्हयामध्ये सिप्ला कंपनी आहे किमान आपल्या जिल्हयाला लागणारा किमान रेमडेसिवीरचा जर पुरवठा त्या सिप्लामधुन जर करता आलातर मला अशा वाटते की हे खरतर करण्याची गरज आहे. कधी कधी नेतेमंडळी त्यांच्या कामामध्ये व्यस्त असतात त्यांना कधी कधी आपल्याकडे एखादी गोष्ट आहे हे माहीतीही नसते. सिमाताई मीही उदयोगपती आहे मी तुम्हांला एक गमंत सांगतो आज उदयोगपतीच्यांकड किंवा वर्कशॉपवाल्यांकड आक्सिजन नाही ते काढून घेतले आहेत लक्षात ठेवा. या शहरामधला ताईंच्या म्हणण्याचा मतीतार्थ एवढाच होता या शहरामध्ये जेवढा ऑक्सिजन आपण युटीलाईज करतो जो एमआयडीसीमध्ये केला जातो त्याच्यापेक्षा खरतर आपल्या शहराला ऑक्सीजनची कमतरता भासायलाच नको. इन्डस्ट्रीयल मधला बंद केला आणि आपण हॉस्पिटलला दिलातर मला असं वाटत की हॉस्पिटलला आपल्याला ऑक्सिजन कमी पडणार नाही एवढी निश्चितच परिस्थिती या पिंपरी चिंचवड, चाकण किंवा तळेगाव एमआयडीसीमध्ये आहे तेवढा ऑक्सिजन आपल्या शहरामध्ये आहे. याचही कुठेतरी नीट नियोजन केल पाहीजे, याचही कुठेरी प्लॅनिंग केल पाहीजे. मा.आयुक्त साहेब तुम्ही नवीन आलात मी खरतर तुमच अभिनंदन करतो. आल्यानंतर मलाही एक अपेक्षा होती एक चांगला हार्डीकरांच्यानंतर, खरतर या सभागृहामध्ये हार्डीकर साहेबांच्या माग ताकदीन हे सभागृह उभ राहीलेल माझ्या डोळयानी बघीतल आहे त्यांच्यावर टिकाही केली असेल तुमचा अनुभव खरतर या शहरवासीयांना यायचा आहे. तुम्ही तुमच्या कामाची चुनूक दाखवा या शहरामधुन तुम्ही जेव्हा बाहेर जाल

तेव्हा अस वाटल पाहीजे की हे शहरवासीयांसाठी केलं. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो दहा बारा नगरसेवकांची आपण एक चांगली समिती करा आणि आज मा.आयुक्तांना आपण हे आदेश देण्याची गरज आहे म्हणजे ऍटोक्लस्टर असेल किंवा जम्बो कोवीड सेंटर असेल ते महापालिकेनी ताब्यात घ्याव आणि महापालिकेच्या डॉक्टरांच्या वतीने खरतर वायसीएमला शंभर डॉक्टरांची टिम आहे त्याच्यापैकी २५ डॉक्टर आपण याठिकाणी वापरु शकतो. कुठलाच डॉक्टर तो अमोल असेल किंवा कपाले असेल तो एकाही पेशंटला बघायला जात नाही लक्षात ठेवा. म्हणजे जो डॉक्टर इन्चार्ज आहे अशा पध्दतीची भावना करतो तो एकही पेशंट बघत नाहीतर अशा पध्दतीच्या डॉक्टराला किंवा अशा पध्दतीच्या एजन्सीला खरतर आपण काम देण्याची गरज नाही. खरतर ऍग्रीमेंट तोडल्यानंतर काय होईल, मा.आयुक्त जे व्हायच ते होऊ दया महापालिकेच पंधरा वीस कोटी पेक्षातर जास्त नुकसान नाही परंतु पैशापेक्षा जर ही मंडळी आपल्या लोकांच्या जीवीताशी जर खेळत असेलतर मला वाटते की ज्या नगरसेवकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि त्यावेळेस आपण जर त्यांच्यावर गुन्हे दाखल नाही करु शकलोतर मला वाटते की लोक आपल्यावर गुन्हे दाखल करतील. आज आपण हायकोर्टा मधली, सुप्रिम कोर्टामधली परिस्थिती बघतो, म्हणजे सरकार नाही एकमेकाच्या विरोधामध्ये जात, वकील एकमेकांच्या विरोधामध्ये नाही जात, पब्लिक जर शासनाच्या विरोधामध्ये जातेतर मला अस वाटत की या पुढच्या काळामध्ये अनेक जागृक नागरीक या शहरामध्ये आहेत ते आपल्या विरोधामध्ये जातील त्यावेळेस काळ आपल्याला नाही माफ करणार. मा.महापौर साहेब माझी विनंती आहे की पाच ते सहा जणांची कमिटी करा, पुढच्या काळामध्ये पुढची जर लाट येणार आहे अशा परिस्थितीच जर चित्र असेलतर मला वाटत की आताच्या लढाईमध्ये आपल्याला सगळयांना सोबत घेवून जो चुकला असेल त्याला सोडून दया परंतु हे जे कोवीड सेंटर आहेत तेथे एक तारखेपासून आपण काम कराव, एक तारखेपासून आपल्या ताब्यात घ्याव, मला वाटत की हे जर आपण करु नाही शकलोतर या सभागृहामध्ये आज तीन तास चर्चा झाली पुढच्या वीस तारखेच्या जनरलबॉडीमध्ये आपण त्याच्यावर चर्चा करु त्याच्यामधुन जर आऊटपुट नाही निघालतर मला वाटत की या शहरामधली जनता आपल्याला माफ करणार नाही. अजीतराव मी अजून एक विनंती करतो, राहूल कलाटे आहेत, सचिन आहे, नामदेवराव गटनेते आहेत, सगळे गटनेते आहेत जी लोक खरतर कोरोनाच्या काळामध्ये गेली दिड वर्षे दोन वर्षापासून या शहरवासीयांना वाचवण्याच काम करतात मग छोटया डिस्पेन्सरीच्या माध्यमातून असेल, कोवीड सेंटरच्या

वेगवेगळया माध्यमातून असेल, वायसीएमच्या माध्यमातून असेल खरतर यांना आपण प्रोटक्शन देणार आहेत की नाही. आपण काय करतो हे खरतर ओसरल की आपण त्यांच्यावर कु-हाड चालवायला कमी करत नाहीत. माझी विनंती आहे तुम्हांला म्हणजे थेरगावच हॉस्पिटल असेल, जिजामाताच आहे, आकुर्डीच हॉस्पिटल आहे आता भोसरीमधल्या हॉस्पिटलच कौतूक तुम्ही केल. याठिकाणी आपला जीव मुठीत घेवून खरतर ही सगळी मंडळी काम करतात त्यांना मोटीव्हेशन काय देणार आहे, त्यांना आपण ताकद काय देणार आहे, त्यांना आपण ताकद नाही देत, मोटीव्हेशन नाही देत मला वाटत कुठलाही डॉक्टर कुठलीही नर्सेस अनेक ॲम्ब्युलन्सवाले डॉक्टर्स, ॲम्ब्युलन्सवाले जे ड्रायव्हर्स आहेत ते आपला जीव मुठीमध्ये घेवून पेशंटला कुणी हात नाही लावत तो आपल्या ॲम्ब्युलन्सचा ड्रायव्हर लावतो लक्षात ठेवा. यांना जर आपण ताकद नाही दिलीतर अनेक जनरलबॉडी आपल्या होतील आपण म्हणू की हा ठराव आम्ही केलाच नाही. मा.महापौर साहेब, अशाच पध्दतीची उपसूचना मागच्या वर्षभराच्या काळामध्ये दिली होती आणि हीच उपसूचना आपण देवून सुध्दा त्याच्यावर कारवाई केली जात नाही. प्रशासन काय म्हणत ते सोडून दया, शासन मान्यता देईल ना देईल हे सोडून दया परंतु या शहरामधले अनेक माणस, अनेक नागरीक, अनेक आपले स्वयंसेवक आहेत ते जीव मुठत घेवून काम करतात त्यांच्या माग आपल्याला खंबीरपणे ताकदीन उभा राहण्याची गरज आहे. आपण शहरवासीयांच्या बरोबर आपण काम करतो, या शहरातल्या लोकांचा आपण खरतर जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करतो त्यामध्ये अधिक गती देण्याची गरज आहे. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे आपल्याला की आपण आयुक्तांना तशाप्रकारचे आदेश दयावेत, ॲटोक्लस्टर असेल, जम्बो असेल ते महापालिकेच्या मार्फत चालवावे, तुम्ही जर म्हणलात चौकशी करा, समिती करा तर मला वाटते की समिती होईल, कारवाई होईल हा कोवीडचा काळ निघून जाईल पुढच्या कोवीडला आपण अशाच पध्दतीची चर्चा करु आणि मला असं वाटत की आपली ताकद आहे म्हणजे पाच पाच नगरसेवकाना जर तीथ थांबवलना, आपले नगरसेवक थांबायच्या तयारीत आहेत मग ॲटोक्लस्टर असेल, जम्बो कोवीड असेल कारण यांच्यामध्ये क्षमता आहे म्हणजे प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागामध्ये पन्नास पन्नास हजार मतदार आहेत म्हणजे पन्नास हजार लोकांच ते प्रतिनिधीत्व करतात त्याठिकाणी पन्नास, शंभर पेशंट खरतर असतील त्यांच ॲडमिनीस्टेशन करायला खरतर हे वेळ देतील म्हणजे पंधरा पंधरा तास आपला नगरसेवक तीथ थांबायच्या तयारीत आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला माझी विनंती आहे की अशा पध्दतीच

चुकीच काम करणा-या लोकांना कृपा करुन पाठीशी घालू नका नाहीतर ही जनता आपल्याला माफ करणार नाही एवढीच विनंती आपल्याला करतो आणि थांबतो, धन्यवाद.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, तुमचे आणि माजी पक्षनेत्यांचे दोघांचेही आभार मानतो कारण एकनाथरावानी मध्यस्थी केल्यामुळे तुम्ही आम्हांला बोलण्यास संधी दिली त्यामुळे तुमचेही आभार, नाहीतर तुम्ही विषयाला सुरवात केली होती. एवढा गंभीर स्वरुपाचा विषय झालेला असताना सुध्दा मी प्रथमत: कुंदन गायकवाड, विकास डोळस असतील यांनी जे वक्तव्य केल की स्वत:ला नगरसेवक म्हणून घ्यायची लाज वाटते त्या वक्तव्याशी मीही सहमत आहे आणि म्हणून मीही ओरडत होतो की आम्हांला लाज वाटते आम्हांला शहरामध्ये बाहेर जायला किंवा वर्तमानपत्रातून असं छापून येईल महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये एक लाख रुपये घेतले आणि ते एक लाख रुपयावर थांबले नाही काल रात्री तीथच त्यांना अजून सहा लोक भेटली नंतर ती एवढी घाबरली की आमच्या पेशंटच काय होइल. आता सव्वातीन तास झाले आपण या विषयावर चर्चा करतो. मी मागच्या दोन महीन्यापुर्वी या सभागृहामध्ये स्पर्श हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये मागचे अतिरीक्त आयुक्त अजीत पवारांच्या संदर्भामध्ये त्यांच्या अवतीभोवती असणारी ती स्पर्शचे लोक जे स्वत:ला वकील समजतात, स्वत:ला फार तज्ञ समजतात, फाईली घेवून फिरतात आणि कमीशनरांच्या दारात जावुन तीकड मला अर्ध काम दया, मला अर्ध काम दया ते भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक आहेत आणि अशी लोक हा व्यावसाय करतात. म्हणजे मुडदयाच्या टाळूवरच लोणी खायच नाहीतर ते जीव घेतात, जीव, रक्त प्यायच काम करतात. मा.महापौर साहेब, मला तुम्हांला फक्त एकच विनंती करायची आहे की सर्वजण इथे पोटतीडकीने बोललेले आहेत. आयुक्त साहेबांनी फक्त सांगू दया की जो इन्सिडंट काल झालेला आहे, इथ ऑलरेडी ऐकायला मिळालेल आहे, काल रात्री तीथ त्या डॉक्टरच्या कानामाग वाजवली कोण जाधव आहे त्याच नाव घेतलेल आहे त्यानी कबुल केलेल आहे त्यांनी वीस घेतले आणि त्यांनी ऐंशी हजार घेतले आहेत. तो कन्सलटंट कुठून आला हे मला माहीती नाही पक्षनेत्यांला माहीती का नाही. सुपरस्पेशालीटी म्हणून दर महीन्याला आपण १३ लाख रुपये वेगळे देतो हे तुम्हांला कदाचित माहीत नसेल, स्थायी समितीची कृपा. स्थायी समितीने ठराव केला आणि सुपर कन्सलटन्सी म्हणून टेंडर व्यतीरिक्त, टेंडरमध्ये तशा प्रकारचा कोणता क्लॉज नव्हता तर अशाप्रकारचे कन्सलटंट नेमायला किंवा अशाप्रकारचा भ्रष्ट कारभार करायला १३

लाख रुपये महापालिका दर महीन्याला त्यांना वेगळे देती, वाटलतर चौकशी करुन घ्या, डॉक्टरांना विचारा. आणि हो सुपर कन्सलटन्सी म्हणून १३ लाख रुपये देते आणि तेथे डॉक्टरच नसतात, बोगस डॉक्टरांची नाव आहेत. क्रिकेट प्लेअरची नाव, शाहरुख खानची नाव, वाटेल ते नाव आहेत त्यामध्ये. मी आयुक्तांना स्वत: पत्र दिलेल आहे एक पत्र नाही आयुक्त साहेब आल्यापासून मी तुम्हांला जवळपास सात पत्र दिलेले आहेत आणि त्या सातपैकी चार पत्र मी तुम्हांला त्या ऍटोक्लस्टरच्या स्पर्श संदर्भात दिलेली आहेत जेव्हा ही सेंकण्ड लाट सुरु झाली त्यावेळेला मी पत्र दिल होत की असे असे प्रत्येकाचे गंभीर आरोप त्यांच्यावर आहेत तेव्हा याच्यापुढच कॉन्ट्रॅक्ट करण्याच्या आदि आपण विचार करावा. एका बाबतीत तुमच मी अभिनंदन करीन जे हार्डीकरांनी नव्हत केल, जे बाकीच्यांनी नव्हत केल ते तुम्ही करुन दाखवल किमान त्या अजीत पवारांना इथन घालवल ते एक तुम्ही चांगल काम केल. ज्या परिस्थितीमध्ये तुम्ही इथला चार्ज घेतला आणि त्यानंतर ही जी भयानक परिस्थिती कोवीडची झालेली आहे त्यात तुम्ही चांगल्या पध्दतीने काम करत आहात रात्री नऊ-नऊ, दहा-दहा वाजेपर्यंत, दोन-दोन वाजेपर्यंत, जिल्हाधिका-यांकडे मिटींग असेलतर तुम्ही बघताय प्रयत्न करताय, प्रयत्नांची पराकाष्ठा करताय त्याबद्दल तुमच कौतूक करतो मग तुम्ही असताल, ढाकणे साहेब असतील, झगडे मॅडम असतील, बाकीचे अधिकारी असतील, डॉक्टर्स असतील, वायसीएमचे सगळे डॉक्टर्स असतील तुम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करतात मान्य आहे आम्हांला. परंतु त्याचवेळेला आपल्या महापालिकेला जे गालबोट लागतय, एका बाजूला महापालिकेला लुटल जातय त्याबद्दल तुम्ही काही केल नाही. आता सागरनी तुम्हांला सांगीतल होत की असं त्यांनीही पत्र दिल. मा.आयुक्त साहेब मला आपल्याकडन माफक अपेक्षा आहे काही लोकांची तीथ रिंग करायची पध्दत होती, ठेके वाटून घ्यायचे ते तुम्ही थांबवल परंतु ज्या पध्दतीने स्पर्श मध्ये लुट होते त्याबद्दल तुम्ही काय केल आणि आता आम्ही तीन तास सर्वजण ओरडतोय. मा.महापौर साहेब, माझी तुम्हांला हात जोडून विनंती आहे, आता सर्वांनी सांगीतल आहे की त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हायला पाहीजे, त्यांच्यावर मनूष्यवधाचा खटला दाखल झाला पाहीजे त्याच्याबद्दल आयुक्त काय करणार आहेत हे त्यांनी सांगाव तोपर्यंत मी खाली बसणार नाही.

मा.महापौर – बहल साहेब आपण बोलाव त्यानंतर पक्षनेते बोलतील व नंतर आयुक्त खुलासा करतील.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मी मागच्यावेळेला या

सभागृहामध्ये एक तासभर बोललो. एकनाथराव तुम्हांला माहीत नसेल मी सांगू इच्छितो की हे तुमचे सभागृह नेते, भाजपचे दोन तीन नगरसेवक हेच लोक त्या कुंदनला कन्व्हेन्स करायला गेलते.....

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - तुमच बोलून झाल असेलतर मी आयुक्तांना खुलासा करायला सांगते. तुम्ही तुमच सर्व म्हणण मांडल आहे का. सगळयांनी शांत रहा वातावरण वेगळ आहे ही कोरोनाची परिस्थिती आहे. तुम्ही प्रश्न मांडायला आलात का एकमेकांवर आरोप करायला आलात. चार तास झाले चर्चा चालू आहे मी हो म्हणते म्हणून किती तास बोलायच. बहल साहेब मागच्यावेळेस तुम्ही स्पर्शचा विषय काढला होता त्यावेळेस मी स्वत: सभागृहाच्या वतीने आयुक्तांना आदेश दिले होते, आणि आदेश दिल्यानंतर त्यांनी पळकुटी वाट काढली जी काही शिक्षा व्हायला पाहीजे ती अजून शिक्षा केलेली नाही हे मलाही माहीती आहे. फक्त एकाला बदलीच आमीष दाखवल आणि ते शाबुत राहीले हे मी विसरलेली नाही. बहल साहेब तुम्ही बोलून घ्या.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, मला सत्ताधा-यांना प्रश्न करायचा आहे की या सभागृहामध्ये दोन महीन्यापुर्वी मी पत्रकारपरिषद घेतली मी पत्रकार परिषद घेतल्यानंतर पण सन्मा.सत्तारुढ पक्षनेत्यांनी त्या ऍटोक्लस्टरच आणि अजीत पवारांच (अति.आयुक्ति २) समर्थन केल, काय समर्थन केल नाही नाही नाही ती गरज होती, बरोबर केल, भोसरीच ते बील चुकीच दिल गेलं. आजही सांगतो ते अधिकारी आणि बाकीचे चार अधिकारी नाही सस्पेन्ड झालेतर सभागृहात मी पाऊल ठेवणार नाही. शंभर टक्के करप्ट आहेत शंभर टक्के यांच समर्थन कराना. मी एवढ पोटतीडकीने दोन महीन्यापुर्वी बोललो, काय घडल, कस घडल मी म्हणल ज्या ज्या डॉक्टर लोकांना तीथ पगार दिला गेलेला आहे ५० हजाराच्या पुढ तो पगार आहे त्यांचा टिडीएस कट केला आहे का, त्याची माहीती मागवा, मागीतली का? तीथ कोण कोण काम करतात त्यांची यादी मागवा, त्याच रेकॉर्ड चेक करा, केल का नाही केल. आडसकरांच्या पत्नी महापालिकेमध्ये कामाला आहेत त्यांना कॉन्ट्रॅक्ट देवू शकतो का ही सगळी वस्तुस्थिती मी मांडलेली असताना भारतीय जनता पार्टीचे महापौर, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष, भारतीय जनता पार्टीचे पक्षनेता, भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते, भारतीय जनता पार्टीची सत्ता हे सगळ खर असताना तुम्ही का लपवता, मी जे बोललो त्याच तुम्ही समर्थन का केलं त्याच समर्थन तुम्ही का करत होता. आज कुंदनने आणि विकासनी मिळून जेव्हा हा विषय काढला आज त्यांच्या गुरुवर्य यांच्यासाठी नगरसेवकांच्या विनंतीला

मान नाही, त्याच्या गुरुवर्याना बेड मिळत नाही डॉक्टर डॉक्टरमध्ये संगनमत करतात. मा.महापौर साहेब तुम्हांला हे सुध्दा पुरावे देणार आहे रेमडेसिवीर ऍटोक्लस्टरमधुन बाहेर विकले गेलेले आहेत. तुम्ही पैसे दया, एजंट लोक त्यांची २५ हजाराला रेमडेसिवीर देतात हे तीकड आयुक्तांच्या कानावर पडल्यानंतर आयुक्तांनी डॉ.विनायक पाटील यांना फोन केला आणि विनायक पाटील यांना सांगीतल की तीथली परिस्थिती बघ. आता विनायक पाटीलला धरल आमच्यातल्या दोन तीन नगरसेवकांनी तुमच्यातलेच नगरसेवक परत तीथ आले पत्रकार तीथ गेल्यानंतर बाहेरच्या फलकावर लिहील आहे ओटूचे दिडसे बेड फुल, आयसीयू फुल आणि आतमध्ये बेड व्हेकन्ट, एक नाही दोन नाहीतर तीथ बावीस बेड मोकळे होते. मग बावीस बेड मोकळे बाहेर लिहील दिडसे बेड फुल अशा पध्दतीच काम यावर आपल काय नियंत्रण आहे, आपल काय कंट्रोल आहे. जीव तोडून तोडून सांगीतल की भोसरीला एकही पेशंट ऍडमीट नसताना, स्थायी समितीचा ठराव झालेला नसताना स्थायी समितीने नंतर घाईघाईने करत पुर्ण मान्यता अजून मिळालेली नाही, त्याला मान्यता दिली. का दिली, का पैसे दिले, चौकशी केली का, पेशंटची ट्रिटमेंट झाली का अरे, ही जी लोक मेली आहेतना त्यांच्या डोक्यावरच रक्त प्यायच काम हे तुम्ही लोक करतात, कुठ हे पाप फेडणार तुम्ही. अरे, आता तुम्हांला दुखापत झाली तवा तुम्हांला चटका लागला. हे दोन महीन्यापुर्वीच ओरडतोय मी. माझ त्याच काही भांडण नाही कोण आडसकर हे मला माहीत पण नाही. जेव्हा ही माहीती वर्तमानपत्रातून आली ज्यावेळेला सर्व चौकशी केली मग डॉक्टर्सची नाव, नर्सची नाव तीथले कामगार आहेतना कामगार ते सुध्दा कोर्टामध्ये जायच्या तयारीत आहेत. त्यांना जे मिनीमम वेजेस प्रमाणे पेमेंट दिल पाहीजेल ते पेमेंट त्यांना दिल गेलेल नाही. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब माझी अजून एक विनंती आहे तुम्हांला मागच्या कोवीडच्या काळापासून आतापर्यंत तीथ सीसी कॅमेरामध्ये जे जे रेकॉर्डींग आहेना ते आणा तुम्हांला आपोआप समजेल की कोणता नगरसेवक ऍटोक्लस्टरला जातो. तुम्हांला समजेल आणि ते नाव पण सभागृहासमोर सांगा मग कळेल तुम्हाला कोन हे कॉन्ट्रॅक्ट घेतो, कोण लोकांच्या जीवाशी खेळतो हे कोण करतय ते तुम्हांला कळेल आणि परत अस करुनतर करुन सारवासारवी करायच काम. काल रात्री ऍडजेस्मेंट झाली नाही नाहीतर कालच्या ऍडजेस्मेंट मध्ये त्या एक लाखाच्या पोटी पंधरा ते वीस लाख रुपये देवाणघेवाणची चर्चा झाली पण मी मानतो याठिकाणी त्यांनी म्हणला नाही, माझी शिक्षीका गेलेली आहे मी ऐकणार नाही, अरे, ठिक आहे कॉन्ट्रॅक्टरची टक्केवारी मी समजू शकतो ताकाला जावून भांड लपवायच काही कारण नाही परंतु लोकांच्या जीवाशी. टक्केवारीसाठी शहरातल्या लोकांचा जीव घ्यायच काम करायच. इंजेक्शन विकायचे का करायच असं, पैशासाठी

पैसे कमवायचेतर असे का लोकांचा जीव घेवून. मा.महापौर साहेब तुम्हांला आम्हांला सर्वांना, तुम्हांला असं वाटेल की मी महापौर असताना माझ्या शहरामध्ये, माझ्या हॉस्पिटलमध्ये एक लाख रुपये आपल्याच शाळेतील शिक्षीकांकडून बेडसाठी घेतले. मा.महापौर साहेब माझी तुम्हांला विनंती आहे तुम्ही आयुक्तांना आदेश दया की त्या कोवीड सेंटरमध्ये आतापर्यंत जीतके रुग्ण होते त्यांची नाव असतील त्यांना फोन करा, त्यांना विचारा की तुम्ही कुठ ॲडमीट होते, किती दिवस ॲडमीट होते, तुम्हांला काय दिल काय दिल गेल नाही, तुमच्याकडून किती पैसे घेतले अशा पध्दतीची चौकशी लावा. तुम्हांला अश्चर्याचा धक्का बसेल. इतक्या लोकांकडून पैसे घेतले जातात. कोटयावधी रुपयाला महापालिकेला लुटल भोसरीला स्पर्शला काही नसताना आपण सव्वातीन कोटी रुपये दिले आणि आता सुध्दा बोगस बील येतात, बोगस डॉक्टरांची नाव आहेत आपल काय नियंत्रण आहे. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे डॉ.गोफणे चांगल काम करतात त्याबद्दल मला काही म्हणायच नाही. पण डॉ. रॉय सारखा हुशार माणुस तुम्ही त्या वॉर्डमध्ये बंद करुन टाकला त्यांची मदत घ्याना एक चांगला हुशार डॉक्टर आहे तो. बाकी डॉक्टरांची सुचना केली त्या सूचनेला पण मी अनुमोदन देतो. हे कॉन्ट्रॅक्टर रद्द करा, तुमचा अधिकार आहे. कोणतही कारण न देता आयुक्तांना सदरचे टेंडर रद्द करण्याचे अधिकार असतात. तुम्ही ॲटोक्लस्टर असेल, जम्बो असेल दोन्ही पण काढून घ्या. तीथ असेलेले डॉक्टर्स, तीथ असलेल नर्स, तीथ असलेला स्टाफ त्यांना जो पगार तीथ मीळतोना त्यात त्यांना दहा हजार रुपये, पाच हजार रुपयानी वाढवून दया. त्यांना पंचवीस हजार रुपये पगार वाढवून दया आणि आपल्या डॉक्टरांच्या नियंत्रणाखाली त्यांना ठेवा. तीथ आपल सुपरव्हिजन ठेवा काही बीघडणार नाही. हे कुठ पाप फेडतील हे मला माहीत नाही. आयुक्त साहेब तुम्हांला विनंती आहे की तुम्ही हा निर्णय घ्यावा. दुसरी गोष्ट मा.महापौर साहेब, मी मागच्यावेळेला पण सांगीतल होतं, आयुक्त साहेब आपण ऐका ज्यावेळेला तीथल टेंडर झाल त्यावेळेला तीथ दोन टेंडर होते एक ओटूचा टेंडर होता, दुसरा आयसीयूचा होता. ओटूच टेंडर दिडशे बेडच होत व आयसीयूच पन्नास बेडच होतं दोन टेंडर वेगवेगळे होते. अशा परिस्थितीमध्ये त्याठिकाणी ॲटोक्लस्टरच तुम्हांला सांगतो ६४५० हा दर आणि १९५० रु. हा स्पर्शवाल्याचा दर होता, १२५० रु. हा रुबी अलकेअर कोट केला होता आणि या स्पर्शनी १९५० रु. कोट केला होता. ७०० रु. दर जास्त प्रतीदिनी, प्रतीबेडला म्हणजे ७००X१५० X३० म्हणजे साधारणत: पावणे तीन ते तीन कोटी रुपयाला महापालिकेला खड्डयात घातल गेलं. त्यावेळेला सन्मा. नगरसेवक आणि हे अजीत पवार (अति.आयुक्त २) यांच्याकडे बसले त्यांना प्रेशराईज केल त्यांना माल मिळाला की कुठ पण सहया करायच्या. त्यांनी हार्डीकरांची पण सही घेतली नाही आणि

त्याच्यामध्ये त्यांनी हा जादाचा दर दिला त्या दिवशी सही केली आणि महापालिकेला डब्यामध्ये घातल. साई क्रॉफ्ट सर्व्हिस प्रा.लि.आकुर्डी, थेरगाव, जिजामाता आणि भोसरी याच्यासाठी त्यांचा रेट आलेला आहे ३९८० रु. म्हणजे मॅनेजमेंट करायचा. मा.आयुक्त साहेब जागा आपली, इन्फ्रास्ट्रक्चर आपल, सगळी मशिनरी आपली सर्व काही आपल फक्त मॅनेजमेंट त्यांनी कराव तरी ते आपण कोटयावधी रुपये त्यांना देतो. आणि दराची तफावत पण किती आहे म्हणजे एवढी दराची तफावत असणार तर काम कसं काय करता आणि किती रुपयाचा भ्रष्टाचार आणि लुट होते याच्याकड कोण बघणार आहे. आता तुम्हीच एका ठिकाणी ३९८० रु. मान्यता देता, दुस-या ठिकाणी ६४५० रु. ला मान्यता देता जम्बो कोवीडचे दर तीकडे आहेत ४५०० रु. आणि ऍटोक्लस्टरला ६४५० रु. आहे. म्हणजे १९५० रु.ला प्रतीबेडला फरक आहे. आडसकरांची पत्री महापालिकेमध्ये कामाला आहे मी ओरडूओरडून सांगीतल काय केल त्याच्यावर आपण बीपीएमसी ऍक्टच्या तुम्हांला मी सेक्शनसहीत कोट करुन पत्र दिलय आयुक्त साहेब तरी त्याच्यावर काही केल का, काहीच केल नाही. तुम्ही का गप्प बसता, हार्डीकर गप्प बसले ते ठीक आहे कारण त्यांनी सगळ काम देवून टाकल ते अजीत पवारांच्या हाक्कामध्ये. तुम्ही याची चौकशी करानां. एवढे पैसे घेवून, एवढी बोगसगीरी करुन, तीथले रेमडेसिवीर विकून तीथ स्टाफ कमी ठेवून आणि तुमच्या डॉक्टरांनी स्वत:नी पाहील आणि तुम्हांला कळवलं आता मी नगरसेवक आहे मी एका पार्टीचा आहे दुस-या पार्टीच्या नगरसेवकांनी कॉन्ट्रॅक्ट घेतल म्हणून मी विरोधात बोलतोय हे समजू शकतो. परंतु तुमच्या डॉक्टरांनी तुम्हांला रिपोर्ट केला की तीथ बेड खाली आहेत फक्त एक सिनीअर डॉक्टर आहेत बाकी दोन ज्युनिअर आहेत बाकी सगळे रिकामे आणि त्यांच्या जीवावर एवढ तुम्ही दोनशे बेडच हॉस्पिटल सोडून दिलेलं आहे दोन डॉक्टरांवर. तुमच्याकडन बील घेणार बारा-बारा, पंधरा-पंधरा डॉक्टरांची, वीस-वीस नर्सची आणि तीथ प्रत्येक्षामध्ये तीन लोक, कशी जगतील लोक. आतमध्ये जायच नाही बाहेर बॉडीबिल्डर ठेवलेत, कशाला पाहीजेत तुम्हांला तीथ बॉडीगार्ड. मा.महापौर साहेब, अशाप्रकारची लुट ही महापालिकेमध्ये ज्या पध्दतीने होते ही कुठतरी ताबडतोब थांबली पाहीजे आणि ताबडतोब त्यांच कॉन्ट्रॅक्ट टर्मीनेट व्हायला पाहीजे अशाप्रकारचे आदेश तुमच्याकडन आम्हांला अपेक्षीत आहेत. तुम्ही मागे आदेश देवून सुध्दा काही झाल नाही म्हणून मी हाट्ट केला की मी बसणार नाही त्याच कारण अस आहे की आज तुम्ही तुमचा वेळ देता, सगळयांना टेन्शन आहे, माझ्याच वॉर्डामध्ये वायसीएम असल्यामुळे आम्हांला किती प्रेशर आहे हे आम्हांला माहीती आहे. अशी परिस्थिती असताना आपण जीव तोडून बोलतो मग तुम्ही एखादी गोष्ट जर प्रशासनाला सांगीतली, तुम्ही आदेश दिले मी एक पत्र दिल त्यातल एक काम

चांगल केल म्हणून मी तुमच अभिनंदन केलं. तुम्ही रात्री बारा-बारा, एक-एक वाजेपर्यंत बसतात, सगळ नियोजन करतात त्याच पण अभिनंदन केलं, यंत्रणा आपल्या हाताखालील त्याच पण अभिनंदन केल. अजीत पवार (अति.अयुक्त २) यांना पाठवल त्याच पण अभिनंदन केल. परंतु जी लुट चाललेली आहे, जो भ्रष्ट कारभार चाललेला आहे, जीथ लोकांच्या जीवीताशी खेळल जात आहे ते तुम्हांला सुध्दा आयुक्त साहेब कळल की हे कोण करतय, कोण याच्या माग आहे, तुम्ही काही ॲक्शन घेत नाहीत. You should terminate them right now. Immediate action should be taken today itself. Who is stopping you doing that? You are the authority you can do that. Let him go to the court we will fight it out. The ample reasons which we can coat in the court also. I humbly tell you Commissionerji we expect a simple decision from your side. धन्यवाद.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. ही खरतर कोरोनाची मोठी दुसरी लाठ आहे, गेले महीना दिड महीने आपण पाहतो की ज्या पध्दतीने कोरोनाचे आकडे वाढत आहेत आणि मृत्युचा दर हा वाढत वाढत चाललेला आहे. खरतर ही आपणा सर्वांना खुप मोठी चिंतेची बाब आहे, आता सध्या याच्यामध्ये झोकून देवून काम केल पाहीजे. ज्यावेळेस माणुस पॉझिटीव्ह येतो त्यावेळेस त्याला पहील कॉरन्टाईन सेंटरमध्ये शिफ्ट केलच पाहीजे. त्याच कारण असं आहे की तो जो माणुस आहे तो दिवसभर फिरतो आणि त्याच्यामुळ आपण दिवसरात्र काम करुन सुध्दा त्याच गोष्टीमुळ तीथ फरक पडताना दिसत नाही. मग तोच माणुस हाळूहाळू सिरीअस होतो मग त्याला ओटूचा बेड लागतो नंतर आयसीयूचा बेड लागतो नंतर तो व्हेन्टीलेटरवर जातो. पहीली स्टेप सर्वांची अशी राहीली पाहीजे की तुमच्या आमच्या संपर्कातला कोणीही माणूस असो जर को तो पॉझिटीव्ह झाला तर त्याला पहील क्वॉरंटाईन सेंटरमध्ये गेलाच पाहीजे, त्याला होम आयसोलेशनमध्ये ठेवू नका ही माझी आपणास नंम्र विनंती आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शनिवार आणि रविवारच पुर्ण लॉकडावून आहे पण सोमवार ते शुक्रवार सकाळी ७ ते ११ चा टाईम दिलेला आहे. तर ७ ते ११ च्या टाईमामध्ये काही बाजारपेठा पुर्णपणे मोठया क्षमतेनी भरलेल्या दिसतात याच्यावर आपण नियोजन करताना दिसल पाहीजे. महत्वाची सूचना मी देतो शहरातील जेवढे हॉस्पिटल्स आहेत त्यांच पहील ऑडीट होणे गरजेचे आहे, स्ट्रक्चल ऑडीट होणं गरजेच आहे त्याच्यानंतर अग्निशमक ऑडीट होण गरजेच आहे. मा.महापौर साहेब, ज्या पध्दतीने काल वार आणि वादळ आलं खरतर मला कुचबूच लागत होती की आपल जम्बो कोवीड उडून जात की काय. काल एवढया मोठया

प्रमाणात वार आणि वादळ होतं आता पावसाळा येणार आहे तरी याकडे जातीने लक्ष देणं आवश्यक आहे. मा.महापौर साहेब, आपल्या कार्यकाळातील ही दुसरी लाट आहे. सन्मा.आयुक्त साहेब याठिकाणी नवीनच पालीकेमध्ये आलेले आहेत आणि आल्या आल्या लगेच त्यांन या गोष्टीला सामोर जाताना दिसतय. आपल्या पालीकेची जी काही यंत्रणा असेल मग त्याच्यामध्ये डॉक्टर्स, नर्स आले, शहरातील सर्व डॉक्टर्स नर्स आले, पोलीस आले हे चांगल्या पध्दतीने काम करतात त्यांच जेवढ कौतूक करु तेवढ कमीच आहे. परवाच्या दिवशी गटनेत्यांची मिटींग होती त्या मिटींगमध्ये आयुक्त साहेब आले आणि त्याचा शर्ट सुध्दा भीजला होता आम्ही नगरसेवकांनी त्यांना विचारल की साहेब काय झालतर आयुक्तांनी सांगीतल की आज शहरा मधील दोन ते तीन तासानंतर सगळा ऑक्सिजन पुरवठा संपणार आहे. ऑक्सिजन पुरवठा संपल्यानंतर ज्या पध्दतीन आयुक्त साहेब असतील, त्यांची टिम असेल दिवसरात्र एक करुन ज्या पध्दतीने शहरातील जनतेसाठी काम करतात त्यांच जेवढ कौतूक करेल तेवढ कमी आहे. परंतु मा.महापौर साहेब, आपल्या शहरातील आजही ऑक्सिजनचा पुरवठा व सुरळीत व्हावा अशी मी विनंती करतो. मा.महापौर साहेब, पुन्हा एकदा सर्व डॉक्टर्स असतील, सर्व नर्स असतील, पालीकेचे सर्व कर्मचारी असतील हे ज्या पध्दतीने कोरोनासाठी काम करतात या सर्वांच कौतूक करतो आणि थांबतो.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. गेल्या तीन चार तासापासून आपण सर्वजण शहरातील जी वास्तविक परिस्थिती आहे त्याच्यावर आपण चर्चा करतो. कुंदनने आणि विकासनी सुरवात केली व माई आपण परवानगी दिली त्याबद्दल आपल आभार व्यक्त करतो. परंतु आज जे एकंदर कोवीडची परिस्थिती पाहीलीतर जीबी आज लवकर संपणार अशाप्रकारच मला उल्हासरावानीं सांगीतल परंतु अशा परिस्थितीत देखील आपण या जनरल बॉडीला चर्चा करत असताना शहरातील विदारक परिस्थिती सगळीकडे आहे त्याचे पडसाद या सभागृहात उमटणारच होते परंतु ते एवढया दुर्दैवी प्रकारे उमटतील की आपल्या शहरातील एक प्राध्यापीका, आपल्या काही सहकार्यांची शिक्षीका, गुरु यांना जर आपल्याच महापालिकेनी बांधलेल्या कोवीड सेंटरमध्ये ऍडमीट होण्यासाठी जर लाख रुपये मोजावे लागत होते आणि त्यातही त्यांचा दुर्दैवी अंत झाला, म्हणजे हे खरच दुर्दैव आहे. तुम्ही आम्ही सर्वानीच माणुस म्हणुन विचार करण्याची गोष्ट आहे, हे घडल कसं. समजा जर एक घटना घडली म्हणून उघडकीस आल असेलतर ते दुर्दैव आहे आयुक्त साहेब याच्यावर बोलणारच आहेत. आयुक्त साहेब आम्हांला देखील तुमच्याकडून अपेक्षा आहेत की याच्यावर

तात्काळ म्हणजे तुम्हांला आजच्या आज निर्णय घ्यावा लागेल. तुम्ही म्हणताल आताची कोवीडची परिस्थिती, त्या परिस्थितीचा आपण विचार करताल परंतु तो करत असताना अशाजर भामटया लोकांना आपण पाठीशी घातलतर ते दुर्दैव आहे. ही कारवाई करत असताना माई, आमची तुम्हांला विनंती आहे की ज्यांनी कोणी पैसे घेतले असतील, जी दोन तीन लोक पुढ आली असतील आयुक्त साहेब आजच त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन सीपी साहेबांना सांगुन त्यांची चौकशी करा आणि त्यांना विनंती करा दरोडे आणि चोरी असे भीषण त्यांच्यावर कलम दाखल केले पाहीजे त्यांना जामीनही नाही झाला पाहीजे. असे भामटे लोक या शहरात असतीलनातर आपण कितीही चांगल काम केल आणि आपल्या हाताखालची लोक जर असे काम करत असतीलतर सगळेच बदनाम होणार आहेत. याठिकाणी शेंडगेताई, यादवताई, पाडळे ताई सर्वजण एकदम पोटतीडकीने बोललेत आणि या शहरात जे चालू आहे प्रत्येकजण तो क्षण अनुभवतोय. दिवसभराचे फोन, बेडचे फोन, रेमडेसिवीरचे फोन, ऑक्सिजनचे फोन हे फोन फोन फोन करत असतना जवळचे लोक हॉस्पिटलाईज, तुमच्या आमच्या घरात पण दुर्घटना झाल्या या कुणामुळ झाल्या ही कोरोनाची दुसरी लाट आलीना. अभिषेगनी सांगीतल की मागच्यावेळेस चांगली परिस्थिती हाताळली गेली. परंतु मी म्हणले की ही जी टिम आहे ती अतीशय चांगल्या प्रकारे काम करते पण आज कमी काय पडतय, रेमडेसिवीर कमी पडतय, कमी काय पडतय, ऑक्सिजन कमी पडतय, कमी काय पडतय, व्हेन्टीलेटर कमी पडतय हे आपण सगळयांनी एकमेकाच्या गळयात हात घालून ती परिस्थिती हाताळली पाहीजे. राज्य काय, महापालिका आणि केंद्र काय या सर्व गोष्टींचा आपण समावेश करुनच पुढे गेल पाहीजे नाहीतर आता चांगल होत आणि नंतर चांगल नाही हे सोडून दिल पाहीजे. योगेशजी दोन तीन महीन्यापासून सांगतात का तुम्ही स्पर्शचा अहवाल नाही ठेवला, ठिक आहे कोवीडमुळ, देशाला वाटल नाही ते आपल्याला काय वाटणार पुढच्या आठ दहा दिवसात एवढी गंभीर परिस्थती होइल पण ती झाली त्याच्यावर जर आपण वेळेच जर कारवाई कली असती आम्ही पण तुम्हांला म्हणलो होतो की आम्हांल पण सहभागी करुन घ्या. तुम्ही पोरेड्डीला सांगीतल होत यांच उत्तर घ्या यांना पण बोलवा पण पुढ काहीच नाही झालं. ठिक आहे सगळे अधिकारी कोवीडमध्ये गुंतले, ज्या पध्दतीने तुम्ही सगळे अधिकारी गुंतवलेत मग कोण आक्सिजनच्या पाठीमाग, कोण कोवीड सेंटरच्या पाठीमाग त्यात कोणीच तुम्हांला दोष देणार नाही एवढ सगळ असताना शहरातला नागरीक तर फिरतोना रस्त्यावर. ताईन सांगीतल त्याप्रमाणे मृत्युदर तर वाढताना. पेपरला बातमी आली असताना मीही माहीती घेतली ती माहीती

घेत असताना आम्हांला काय समजल कुठलाही नागरीक जर या शहरात मृत झाला असेलतर त्याला वायसीएममधुन पास देतो म्हणजे आपल्याकडतर शंभर टक्के सगळी संख्या आहे फक्त आता कोवीड आणि नॉन कोवीड. ज्या ज्या प्रायव्हेट हॉस्पिटलनी गव्हर्मेंटच्या पोर्टलवर मृत्यूची संख्या भरली नसेलतर त्यांच्यावर पण कडक कारवाई झाली पाहीजे. आता आपण काय करतो कारवाई कारवाई साहेब, याच्यापेक्षापण भीषण चर्चा आम्ही वायसीएमवर आम्ही सभागृहात केली आणि आज सगळेजण आपण वायसीएमच कौतूक करतो. कठीण परिस्थितीच माणुस कसा काम करतो ते खरतर समोर येतं आणि परिस्थिती आली आणि मी त्या परिस्थितीपासून लांब पळालो तर त्याचा काही उपयोग नाही. आज वायसीएमच्या सगळयांची स्तुती याठिकाणी केलेली आहे. डॉ.वाबळे सरांची केली, विनायकची केली कोवीडमधील सर्वांची स्तुती आपण याठिकाणी केली. आजही ते चांगले काम करतात कारण त्यांना मागचा अनुभव आहे. लोक तीच आहेत पण आपण एखादया माणसावर डबल डबल, टिबल टिबल विश्वास ठेवत गेलो एवढ सगळ चांगल होत असताना जो प्रश्न या सर्वांनी मांडला या डॉक्टरांना मुदतवाढ दिल्यानंतर जर या दोन तीन कोवीड सेंटरला आपल्याला देता आलेतर, तीथली मॅनेजमेंट व्यवस्थीत करता आली तर चांगले होईल. लोकांना मॅसेज जरी मिळालाना माझा पेशंट कसा आहे, तरी लोकांना बरं वाटत. आम्ही रांत्रदिवस त्या खांडेकरांना मॅसेज कर, कधी कधी त्या वाबळे सरांच कौतूक करतो रात्री आडीच आडीच, तीन तीन वाजता ते फोन उचलतात, पेशंटची माहीती देतात हे देत असताना असाच मी जम्बोच्या त्या प्रितीला फोन केला, आपल्याकडे एक विप्रोला पोलीस होते दोनला गेलेला पेशंट रात्री आठपर्यंत थांबला, खांडेकर साहेब सांगतात पेशंट शिफ्ट करा, विप्रोवरुन पेशंट शिफ्ट केल्यानंतर ती बाई ऐकायलाच तयार नाही तीला म्हणल साहेबांनीच सांगीतल मॅडम तुम्ही ऐका नाही आता किती वाजलेत, बारा वाजलेत, एक वाजलेत मी म्हणल आहो तो चार वाजताच इथ आलाय, ही काही यायची वेळ आहे का. म्हणजे कुठेतरी साहेब त्या माणसाची कपॅसिटी होती त्याचा भाऊ पीआय होता म्हणून तो पेशंट मीराभाईंदरला घेवून गेला नाहीतर त्या माणसाच काय झाल असतं. ठिक आहे कार्डीयक ऍम्ब्युलन्स होती. हा जर सर्वसामान्य माणुस असतातर त्यान पहाट चार वाजता काय केल असतं. हे सगळ करत असताना महापौर म्हणुन आपल्याला पण लक्ष दयाव लागेल नाहीतर आता काय होतय सभागृहात सगळेजण ओरडतात. आता तुम्ही परवाच्या दिवशी सांगवी आणि भोसरीच टेंडर पब्लिश केल साहेब तुम्हांला माझी आतापण विनंती आहे हेच पदाधिकारी काय करतात एखादयाला धरुन आणतात, हेच ते काम करतात

आणि अशी काही परिस्थिती आलीना तर सगळयात पहीले हेच पळून जाणारे आहेत. आजही तुम्ही लक्षात घ्या की जसं संदीपन सांगीतल पै पै मध्ये पैसे वाचलेना तर वाचले. कुणाला इन्ट्रेस्ट असतो कुणाला नसतो, कोण बोलतो कोण बोलत नाही. कधी कधी आपण म्हणतो त्यातून आठ दहा कोट वाचले. कधी कधी आता अजीत पवारांनी(अतिआयुक्त २) सर्वच लावली कामाला, नका भांडू सगळयांना वाटून देतो ही काही घराची वाटणी आहे की काय का शेतीची वाटणी आहे. ही महापलिकेत तुम्ही एलवन येता, एलटू येता, एलथ्री येता आणि तुम्ही सरळ वाटप करुन देताय. आम्ही जेवणाच्या डब्याला मान्य करु कारण की त्या त्या वेळेची ती परिस्थिती आहे एकावेळेला तुम्हांला हजारो डबे पोहचवायचे आहेत. त्यावेळेस तुम्ही याला थोड, त्याला थोड काम दिल का सुसूत्रता यावी म्हणून. योगेशजीन तुम्हांला जर सात सात पत्र दिलेले आहेत म्हणतात. सगळयात पहील्यांदा स्पर्शची मी प्रेस घेतली होती. मी सांगीतल होत की त्याठिकाणी पेशंट नसताना पैसे नका देऊ. आता हे परत परत बोलायच नाही मागच्या सगळया जीबीला ते बोलून झालय. आज काय बोलायच आहे सगळयांनी सांगीतल कुणी ओटू सांगीतल, कुणी आयसीयू सांगीतल, कुणी व्हेन्टीलेटर सांगीतल. साहेब, आज जर आम्हांला कुणाला फोन असतीलतर रेमडेसिवीरचे आणि व्हेन्टीलेटरचे. मृत्यूदर का वाढला मधल्या पिरीएडला. आतापण रेमडेसिवीर नाहीत आणि अस असताना आज आपण पाच पाच सहा सहा तास इथ एका जागेवर बसत, ठिक आहे तुमच्या मागची यंत्रणा काम करत असेल आता ऍटोक्लस्टरमधून व्हॅटसअप आला त्यांनी आता पेशंटला प्रिस्क्रीप्शन दयायला सुरवात केली तुमचे तुम्ही रेमडेसीवीर आणा म्हणून. आज आपल्या वायसीएमला कालपासून रेमडेसिवीर नाही. जम्बोचा आता एसएमएस आला रेमडेसिवीर दया गरीब माणूस आहे म्हणून. आता तो आम्ही डॉ.गोफणेना फॉरवर्ड केला बघा देता आला तर दया ते म्हणाले आपल्याकडचे पण रेमडेसिवीर संपलेले आहेत. अस असताना ताई म्हणाल्या दादांकड जाऊ, माजी पक्षनेते म्हणाले सुप्रियाताईचा सिप्लाचा कारखाना आहे. एकनाथराव आम्ही म्हणत नाही की केंद्राकडन मागवा. आता आपण शहर म्हणून बोलतोय आजही आपल्याला इथ ब्लेमक्लेम करायचा नाही परंतु हा ब्लेमक्लेम करत असताना कुठतरी सत्ता पण आहेना तुमची मग ही सत्ता राबवत असताना तुम्ही आता जस म्हणताना चला आपण एकत्र जाऊ अजीतदादाकड आम्ही म्हणतो आपल्याला पीएमला भेटवा आपल्याकड लस नाही. आज काय परिस्थिती आहे माई आपण सांगीतल की पुढच्या महीन्यात आपण दहा लाख करु आणि त्याच्या दुस-या दिवशी सेंटर बंद पडले मी पत्र दिल. म्हणजे आपल्याला आता तेच तेच बोलायच नाही

आजजर याच्यातन बाहेर पडायच असेल आणि तीस-या लाटेला सामोर जायच नसेलनातर कडक लसीकरण केल पाहीजे आणि कडक निर्बंध केले पाहीजेत. साहेब माझी तुम्हांला विनंती आहे अजून पंधरा दिवसानी अजून नियम करा दोन डोस घेतलेतर आत या बघा सगळे डोस घ्यायला परत जातील, सगळे लसी घ्यायला परत जातील. हे लसीकरण तुम्हांला केलच पाहीजे, तुम्ही म्हणताल एक वर्षात पुर्ण देशाच लसीकरण होइल, जर तीन चार महीन्यात तुम्ही लसीकरण करु शकलेना तर मला वाटत तुम्ही याच्यातून वाचणार आहेत. आज जर आपण जगाचा अभ्यास केलाना साहेब तर यूएस सारख्या देशानी सात कोटी लसीची ऑर्डर ऑगस्टलाच दिली, पैसेपण दिले. एवढया मोठया प्रमाणात जर जगाला कळत होत की लाट पुढ येईल आणि आपल्याला लसीकरण कराव लागल. आपण काय केल पाहीजे आता आज माझ्या घरात दुर्दैवानी आमचे चुलते गेले, प्रत्येकाच्या घरात कुणीना कुणीतरी गेलय. साहेब, तुम्ही आयटीवाल्यांची परिस्थिती जर पाहीलीनातर  एवढी भयानक परिस्थिती आहे. तरुण मुल आहेत ३२ वर्षे, ३४ वर्षे, ४५ वर्षे मी आता दोन तास झाल मी बेड मागतो, एक व्हेन्टीलेटर दया त्याची बायको वेडयासारखी करते. गौरव म्हणून आहे त्याच वय ३४ वर्षे आहे त्या बीर्लामध्ये त्याला सगळे इंजेक्शन देवून झाले पण त्याला फरक पडत नाही त्याची बायको तीथ बसून आहे त्यांच्याकड दुसर कुणी घरामध्ये नाही दोन-दोन, तीन-तीन, चार-चार वर्षाची मुल आहेत म्हणजे एवढी भयान परिस्थिती आहे शहरामध्ये. आपण आता एकमेकांवर आरोप करत बसलो. पण आज आपण आरोप करत का बसलो की ती जी शहरातली भयान परिस्थिती आहे ती प्रत्येकाच्या मनात राहीली. काही काही दिवसरात्र फोन येतात घरी गेलतर झोप येत नाही अरे, तो मुलगा गेलातर यांना कोण सांभाळणार. नागपूरचा एक तरुण आयटी ईंजिनिअर गेला एक मुलगी आणि एक मुलगा परवा रात्री त्यांना आम्ही पास काढून दिला, नागपूरला घरी जायला, तीचा नवरा गेला, ती म्हणली आम्ही परत फ्लॅटमध्ये नाही राहणार. आपल्यापेक्षा वाईट परिस्थिती दिल्लीत आहे आमच्याकड मुकेश सिंग म्हणून आहे आम्ही त्याचा रात्री दोनला पास काढला, वडील एकतर दिल्लीमध्ये, दिवसभर ॲम्ब्युलन्स मिळना, इकडन आम्ही यांना त्यांना फोन करतो ॲम्ब्युलन्स कुठ मिळती का ते बघा. योगायोगाने आपल्या शहरात वायसीएम आहे, जिजामाता आहे हे सगळे हॉस्पिटल्स आहेत त्यामुळे आपली परिस्थिती हाताबाहेर गेलेली नाही. आपल्याला काय कमी पडल, आपल्याला रेमडेसिवीर कमी पडला, आपल्याला काय कमी पडल, आपल्याला ऑक्सिजन कमी पडला, आपल्याला काय कमी पडल, आपल्याला व्हेन्टीलेटर कमी पडला याच्या

व्यतिरीक्त आपल्याला काय कमी पडल का. हे लसीकरण कस होइल हे पाहील पाहीजे, आता स्पर्शवर कारवाई झाली पाहीजे का तर झालीच पाहीजे. का झाली पाहीजे कारण दोन महीन्यापासून सगळे ओरडू ओरडू तेच सांगतात नंतर दुसरी लाट आली सगळया गोष्टी आल्या, आता आक्सिजनमध्ये योगेशजीन सांगितल की तुम्ही अफलातून काम केल ऑक्सिजनमध्ये, म्हणजे प्रत्येकानी प्रत्येकाच्या पध्दतीने काम केल आहे. प्रत्येकानी या शहरातील नागरीकांचा जीव वाचला पाहीजे, आपल्या शहरातली परिस्थिती चांगली पाहीजे त्यासाठी सगळयांनी काम केलं. अस असताना कुणी पैसो घेवून बेड देत असेलतर साहेब त्याच्यावर तुम्ही तात्काळ कारवाई करा, आता ही कारवाई करत असताना तुम्हाला टेन्शन असणार की मी उदया ते कुणाच्या हातात देऊ. साहेब तुम्ही आपली जीबी संपल्या संपल्या आपले डॉक्टरांना बोलवा ते म्हणताना डॉ.रॉय साहेबांना सध्या काही काम नाहीतर बसवा त्यांना तीथ आणि ते शंभर टक्के हॅण्डल करतील, एवढया दिवसाचा त्यांचा इतिहास आहे. लसीकरण सेंटरला तुम्ही परवानगी दयाना, तुमच्याकडे लस किती आहे ते तरी बघा. म्हणजे तुमचे लसीकरण सेंटर साठ, प्रायव्हेट तीस, ठिक आहे आपल्याला लस कुणाकडन येते आता आपण शंभर टक्के केंद्रावर अवलंबून आहेत. ज्यावेळेस राज्य घेइल त्यावेळेस आपल्याला लसीचा पुरवठा सुरळीत होईल. असं असताना आपण काय करतो, असं असताना आम्ही तुम्हांला हेच म्हणत बसलो आणि तुम्ही आम्हांला हेच म्हणत बसलोतर जनता कुणाकड बघणार आणि लोक काय अस्वस्थ होणार. जस आता यांनी सांगितल उदयाला बातम्या आल्याना जस आपण काही काही काही बोललोतर लोक घरात बसतील लोक बाहेर नाही पडायची. माझ्या घरातला आपल्या महापालिकेचा कर्मचारी बाबा कलाटे म्हणून तो सिरीएस त्याच्या मिसेसला साळवी सरानी बेड दिला, मी वायसीएमला आणल त्यांना जिजामातावरुन वायसीएमच्या आतच मला जायच नाही म्हणली. सरकारी हॉस्पिटलमध्ये ती गेलीच नाही शेवटी ऍटोक्लस्टरला उल्हास जगताप साहेबांनी बेड दिला इथ आणली आणि दोघ नवराबायको सुखरुप घरी आले. २४ व २२ स्कोर होता म्हणजे प्रत्येकाला वेगळा अनुभव आहे. आम्ही काय म्हणतो नका रुबी हॉलला नेऊ तुम्ही माझ ऐका आमच्या वायसीएमच्या आयसीयूला आणा आपल्याला माहीती आहेना आपण वायसीएमला रिझल्ट देतो आपल्याला माहीती आहेतना आपले डॉक्टर चांगले आहेत. पण आजही जनतेत विश्वासर्हता नाही आणि अशा पध्दतीची जर चर्चा बाहेर गेलीना महापालिकेच्या कुठल्याही दवाखान्यात जायला नको म्हणतील लोक म्हणतील आम्ही कुठपण ऍडमीट करतो. ही परिस्थिती शहरावर का आली एका स्पर्शमुळ का त्यांना आपण

डोक्यावर घेतल आहे. साहेब तीथ आताही चेक करा तुम्ही एलवन, एलटू तुम्ही आजही चेक करा. म्हणजे जर कोवीड सारख्या परिस्थितीत यांना संधी दिसत असेलतर हे कसले डॉक्टर. आज लोकाची काय परिस्थिती आहे. मागच्या लाटेत काय झालत ब-यापैकी सिनीअर सिटीझन होत पण आज १८ वय, २२ वय, २३ वय, २४ वय आज तो राजू त्याच्या बायकोला आज सकाळी वायसीएमला आणली डायरेक्ट २४ स्कोर, वय काय आहे तर २४ वय आहे. तो विषाणू म्यूटेन झालाय तो पहील्यांदा शंभर लोकांमध्ये तो वीस लोकांना न्युमोनिया दयायचा तो आता ऐंशी लोकांना निमोनिया देतोय. आज सगळया देशातला इन्डस्ट्रीअल आणि जगातन आपल्याला ऑक्सिजन मागवावा लागतो पब्लिकसाठी ही आपली अवस्था आणि आपण काय करतो त्या स्पर्शला डोक्यावर घेतोय, साहेब पहीली आमची तुम्हांला विनंती आहे की आजच्या आज त्याच्यावर निर्णय घ्या, तुम्ही चौकशी लावा परत कुणाची अशी ताकद नाही झाली पाहीजे की कोवीड सारख्या कठीण परिस्थितीत असले प्रकार करण्याची. माई तुम्ही चांगली घोषणा केली की पुढच्या महीन्यात आपण दहा लाख लस देवू एकदम चांगली घोषणा केली, लसीकरण केलतरच आपण वाचणार आहेत पण लसीकरणा बरोबर आपल्याला काही निर्बंध ठेवावे लागतील. साहेब, वर्षभर तुम्हांला हे सर्व पाळाव लागेल. काय झालतर संपला कोरोना कुणाच्या लग्नाला दोन दोन हजार लोक, कुणाच्या वाढदिवसाला चार-चार हजार लोक ही शहरात परिस्थिती होती म्हणून शहरात आपण आज दुस-या लाटेला आलोत. इलेक्शन चालू होत्या ठिक आहे आपल्या राज्यात सुदैवाने इलेक्शन  नव्हत्या. युपीला इलेक्शन, पाच राज्यात इलेक्शन, गोव्याला इलेक्शन ही सगळी परिस्थिती होती. आपल्या पिंपरी चिंचवड शहरापेक्षा लहान राज्य आहे तीथ आज रोज शंभर लोक जातात. आज आपण सर्व इन्डस्ट्र्या बंद करुन टाकल्यात त्यांचा ऑक्सिजन घेतला असं असताना माझी तुम्हांला आजही विनंती आहे की तीकड काय होईल महाराष्ट्रात, देशात पण तुम्हांला आज स्ट्रीक्ट लॉकडाऊनला सामोर जाव लागेल. वरती काय गाईडलाईन आहे काय नाही तुम्ही गाईडलाईनवर अवलंबून राहू नका. ते हॉटेल चालू करायचना, पान टपरी चालू करायचीना तर तुझे दोन ढोस झालेका नाही ते दाखव. साहेब, हे जगान केलयना, तुझे दोन्ही ढोस झाले असेलतर तु उघड, तुला कामावर जायचना तर तुझे दोन्ही ढोस झाले का नाही ते दाखव नाहीतर आरटीपीसीआर दाखव. साहेब, अशा पध्दतीन आपल्याला पण पुढ जायला लागेल. जुलै आणि ऑगष्टमध्ये तीसरी लाट आहे. मा.महापौर लस पहीली मागवून घ्या., तुमच्याकड पैसे आहेत तुम्हांला  खरेदी करता येती. जगाने व्हॅक्सीन नोंदवून झाल्यात आणि आज आपण नोंदवतोय जेव्हा त्यांची ऑर्डर

फुलफिल होईलना त्यानंतर आपल्याला व्हॅक्सीन येणार आहे. मग तुम्ही म्हणताल जुलैला दहा कोटी येतील, जुनला दहा लाख येतील अस झालतर आपण शंभर टक्के तीस-या लाटेत सापडू. आज किती देश शंभर टक्के फ्रि होत गेले, कशामुळ फ्रि होत गेले स्ट्रीक्ट, लॉकडावून आणि जास्तीत जास्त व्हॅक्सीनेशन. आज देशाचा विचार ते नक्की करतील पण आज आपल्याला आपल्या शहराचा विचार करायचा आपली लोकसंख्या किती आहे बावीस ते चोवीस लाख ज्यावेळेस पंधरा लाख लोकसंख्येवर आपण व्हॅक्सीनेशन पोहचूना त्यावेळेस आपण म्हणून आपल शहर आपल्या कंट्रोल मध्ये आहे. आज काय परिस्थिती आहे जम्बोला आणि ऍटोक्लस्टरला साठ टक्के लोक आऊटस्टेटची आहेत सगळी बाहेरची लोक आहेत. तीथ गेल्यानंतर आपल्याला विचाराव लागत ती बाहेरची जरी असली तरी कुणाचा सासरा आहे, कुणाचा मावसभाऊ आहे, कुणाचा मामा इथ राहतो. अशा पध्दतीतली नात्यागोत्यातली लोक त्याठिकाणी ऍडमीट झालीत. ठिक आहे आपल शहर म्हणुन सामाजीक दृष्टिकोन म्हणून आपण त्यांची जबाबदारी घेतोय आपण पुण्यासारखतर नाही करत. त्यादिवशी आमची चर्चा झाली एक दोन आपले पुण्यात पब्लिक नाही घेतले. पण मला वेगळा अनुभव आला मी फोन केला पिंपळेगुरवचे कांबळेसाठी तर त्यांना घेतल. भारतीय जनतापार्टीची शंभर टक्के चुक आहे. कितीवेळा पक्षनेत्यांनी व्हॅक्सीनेशन सेंटरला सगळयाना बोलून घेतल, कितीवेळा सांगीतल वायसीएमला जायच तुमच काम नाही माई हे  हे त्यांच काम आहे पक्षनेता म्हणून की सगळयांशी को-ऑर्डीनेट करण्याच. जो तो आपआपल्या पध्दतीने पळतोय नाही बोलवलतर तु तुझा जा आम्हांला तुझ्या बरोबर यायच नाही. तुम्ही ऑक्सिजनसाठी डिव्हीजनल कमीशनरांकडे गेले, तुम्ही तुमच्या सेंटरला भेट दिली का तुम्ही आम्हांला कळवल नाही. तुम्हांला आदिच समजल होत की आम्ही बिझी आहेत. महीना दोन महीन्यात कोरोना संपेल तुम्हांला सुधारणा नाही तुमचे प्रकार सांगीतलेतर. लोक मरतात आणि तुम्ही इकड तीकड ऑफिसला येवून बसतात. साहेब, बघा जरा याच टेंडर काढायच, साहेब बघा जरा त्याला देता आलतर. आम्ही पण इथच आहोतना आम्ही पण कुठ गेलेलो नाहीत. साहेब, तुम्ही पण अधिकारी लेव्हलला, पालकमंत्री लेव्हलला फॉलो करत असाल पण यांच पण काम आहे आपण सगळयांनी एकत्रीत जाण तीथ बसण आपल्याला जे पाहीजे ते आपण मागवून घेऊ. आपण गेलोतर खुप फोर्स केलातर दहा देण्याच्या ऐवजी वीस देतील आपल्याला अशी परिस्थिती आहे शहरातली आता उदयाच मला व्हॅक्सिनेशनच माहीत नाही आजची परिस्थिती पहा फक्त सेकण्ड ढोस मिळणार आहे. अजूनतर आपला मोठा राऊण्ड चालू व्हायचा आहे ठिक आहे आज डिक्लेअर केल पण

साहेब, लोक कंट्रोल होणार नाहीत. लोक प्रचंड मोठयाप्रमाणात व्हॅक्सीनेशनसाठी बाहेर पडतात असं असताना आहे ही परिस्थिती सांभाळत असताना तुम्हांला पुढचा विचार पण करावा लागेल. आहे हे थोपवन, आहे या लोकांना नीट करणं आणि पुढे तसं न येवू देनं. आज तुम्ही सांगवी आणि तीथल टेंडर केल ठिक आहे माहीती घेतल्यानंतर कळल की तुम्ही ओपन करायच राज्यशासनाची मंजूरी घेतल्यानंतर. पण हे सर्व करत असताना तुम्ही पुढची तयार ठेवत असताना आज जी लोक सिरीअस आहेत आज ब-याचशा लोकांचा असा समज झाला की ऑक्सिजन मिळतो, रेमडेसिवीर देतात तरी पेशंट बरा होत नाही आणि ती लोक सर्व शहरात फिरतात. तर अशा सिरीअस असणा-या कमी केसेस आहेत अशा केसेसवर तुम्हांला स्वत:ला वैयक्तिक मॉनीटर करुन काय मदत करता येईल त्या लोकांना, कदाचित तो पेशंट वाचल नाही वाचल पण त्या फॅमिलीला आयुष्यभराच समाधान मिळेल की आम्ही कुठ कमी पडलो नाहीत आम्ही सगळे प्रयत्न केलेतरी आमचा पेशंट गेला. परंतु काही केसेसमध्ये काय होईल तो रेमडेसिवीर नाही मिळाला म्हणून गेला अशा जर चुका होत गेल्यातर तो माणुस आयुष्यभर स्वत:ला दोष देत राहील आणि मी कुठतरी कमी पडलो. त्यामुळे आता मागच्या दोन दिवसात कमी फोन यायला लागलेले आहेत. आता फोन कशाला आहेत रेमडेसिवीरला आणि व्हेन्टीलेटरसाठी आहेत तरी आहे या परिस्थितीला कस आपल्याला कंट्रोल करता येईल हे पहाव. येणा-या काळात कस लसीकरण करता येईल ते पहाव आणि हे जे काही राजकारण चालल आहे, आता स्पर्शवर तुम्ही कारवाई केली का केलीच पाहीजे. एफआयआर दाखल केली पाहीजे का तर केलीच पाहीजे. ज्यांनी चुका केल्यात त्यांना शासन झाल पाहीजे का तर झालच पाहीजे. हे सगळ करत असताना सिमाताईनी जे सांगीतल मृत्युच ऑडीट ते देखील सिरीएस घेवून, मी माहीती घेतल्यानंतर मला असं समजल की प्रायव्हेट डॉक्टर्सनी पोर्टल भरलेल नाही. मग ते कुणी नाही भरल, का नाही भरल आपल्याकड जी संख्या आहे वायसीएममधुन जे आपले पास इश्यू करायचे आहेत ते बरोबर गेलेले आहेत. पण कोवीडचे मृत्यू मला वाटत आपल्याकड झालेले आपण पोर्टलवर टाकतो, प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये झालेले, प्रायव्हेट डॉक्टर पोर्टलवर टाकतात तरी हे शहरातील भीतीच वातावरण कस कमी होईल याच्याकडे आपण लक्ष दयाव. मला वाटत सागर अंगोळकरांनी पण सांगीतल, त्यांनी देखील साहेब आपल्याला पत्र दिल होतं, म्हणजे नगरसेवक पत्र देत असतील तरी आपण त्यात लक्ष नसेल दिलतर निश्चितच हे खेदाची बाब आहे. परंतु आपली चौकशी चालू असतानाच कोवीडची दुसरी लाट मोठया प्रमाणात आली. त्यामुळ मला वाटत की यादवाना पण त्यात लक्ष नाही देता आलं,

आपण देखील यादव सराशी बोलून घ्या अशी मी विनंती करतो आणि मी तुम्हांला मागेही सांगीतल होत की नाशिक, मुंबई प्रमाणे दुर्घटना होवू नये त्यामुळ आपण ऑक्सिजन, लाईट याच ऑडीट झाल पाहीजे जेणेकरुन आपल्या शहरात कुठली मोठी दुर्घटना होवू नये. जसे या कोवीडमध्ये आपले काही कर्मचारी गेले त्यांना आपण मदत केली मला वाटत आपण नगरसेवकांचा पण विमा केलेला होता परंतु जावेद शेख सारखे आपले काही सहकारी गेलेले आहेत तरी त्यांच्या देखील घरच्याना मदत मला वाटत तुषार हिंगेनी पण तो प्रश्न उपस्थित केला होता त्यामुळे त्यांना देखील कशा पध्दतीची मदत होईल हे देखील आपल्याला पहाव लागेल आणि त्या दृष्टिकोनातून माई आपण प्रशासनाला सुचना कराव्यात आणि येणा-या काळात साहेब आपण निश्चित उत्तर देतालच पण माझ नामदेवराव तुम्हांला पण सांगण आहे येणा-या काळात तुम्हांला सगळया प्रश्नाच उत्तर आम्हांलाही दयावे लागतील. आज शहरातील परिस्थिती वाईट आहे. आम्ही आज सहकार्याची भूमीका आणि शहरात कुठल्याही प्रकारची घबराहट पसरणार नाही याची काळजी आम्ही देखील घेतो. परंतु हे घेत असताना आपण काय करताय याच्यावर शहरातल्या नागरीकांबरोबर आमच देखील लक्ष आहे त्यामुळ आपण देखील ही परिस्थिती हाताळताना मला वाटत एक सत्ताधारी पक्षाचा पक्षनेता म्हणून व्यवस्थित को-ऑर्डीनेशन करताल आणि या शहरातल्या नागरीकांची देखील काळजी घेताल, धन्यवाद.

मा.राजू मिसाळ - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. याच्यावर चार तास झाले चर्चा चालू आहे, या कोवीडच्या महामारीच्या बाबतीत सभागृहातील प्रत्येक नगरसेवकांनी जो काही अनुभव आलेला आहे तो प्रत्येकानी आपल्या समोर मांडलेला आहे. आपण आयुक्तां साहेबां बरोबर सातत्याने मिटींग घेत असता, माजी महापौर योगेश भाई दोन महीन्यापासुन पोटतीडकीने ते बोलत होते त्या संदर्भामध्ये आयुक्त साहेबांना पण त्यांनी पत्र दिले. तुम्ही आल्यानंतर ही लाट आली त्यावर तुम्हांला लक्ष दयाव लागल त्यामध्ये तुम्ही बिझी आहात. आम्ही पण तुम्ही काय काम करतात ते पाहतो. माझे सहकारी कुंदन आणि विकासने हे जे काही समोर आणले, आज प्रशासन चांगल काम करतय परंतु या एका गोष्टीने शहरातील लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन जो आहे तो दृष्टीकोन आज कोणत्या लेव्हलला गेला तो पहा. जी काही गोष्ट घडली त्याची आपल्याला ऑडीओ क्लिप ऐकूण दाखवली. मग आयुक्त साहेब जर समजा हे अशा पध्दतीने होततर ते कशामुळ घडल, का घडल. सन्मा.खासदार अमोल कोल्हे साहेब सकाळी व्हिजीटला आले होते, आपण स्वत: होतात. दोन्ही कोवीड सेंटरला त्यांनी

व्हिजीट दिली जाता जाता भोसरीला पण व्हिजीट दिली त्यांच्या बरोबर योगेशभाई पण होते, अध्यक्ष पण होते. आता अजीत गव्हाणेनी सांगीतल याच्यामध्ये प्रत्येकजण काही कमी आहे का म्हणून प्रयत्न करतो. मगाशी खासदार साहेब मा.महापौर साहेब तुम्हांला पण भेटले. ते तर म्हणाले की आम्हांला या कोवीडमध्ये कुठलही राजकारण करायच नाही लोक वाचली पाहीजेत ही तुमची आमची सर्वांचीच भावना आहे. आयुक्त साहेब जो काही प्रकार स्पर्श मध्ये घडला आहे, ॲटोक्लस्टरला त्याची शहानिशा नक्की करा. जो चुकीचा आहेना त्याला तुम्ही नक्की शिक्षा दया. सर्व काही समोर असेलतर त्याची शहानिशा करा आणि त्याला शासन हे झालच पाहीजे. प्रत्येकाला पेशंट दाखल करण्यासाठी अवघड परिस्थिती आहे, आयुक्त साहेब सुध्दा रात्री एक, दोनला फोन उचलतात ते पण कार्यरत आहेत. एखादया चुकीच्या गोष्टीमुळे चांगल्या कामाला कस गालबोट लागतं त्याच हे उदाहारण घडल आहे. त्यामुळ जो चुकीचा आहे त्याला नक्की शासन करा. मगाशी माजी पक्षनेत्यांनी चांगली संकल्पना मांडली की आयुक्त साहेब तुम्ही एक कमिटी करा, आयुक्त साहेब अशी कमिटी करुन त्यांचा सल्ला घ्या तुम्ही नवीन आहात, गेल्यावेळेसचा कोवीड आणि ही दुसरी लाट आलेली आहे त्याच्यामध्ये आपल्याला काय वेगळया परिस्थितून जाव लागत, प्रत्येकांचे ते अनुभव आहेत, प्रत्येक जण ब-यापैकी आपले नगरसेवक सुध्दा कोवीड होवून गेलेत त्यामध्ये आपली तीन नगरसेवक गेलेत. काका असेल, जावेद भाई असेल आणि उंडेसर असतील. जावेदभाई आणि काका आम्ही २००७ पासून एकत्रीत आहोत, उंडे साहेबां बरोबर विकास आणि आम्ही स्थायी समितीला होतो एक माजी सैनिक त्यातून गेला. माजी नगरसेवक पण पुष्कळ गेलेत. या कोवीडमध्ये बरेच लोक स्वत:चा जीव धोक्यात घालून आपल्या बरोबर काम करतात, आता या सभेमध्ये कामगारांचा एक विषय आहे पवना गोळीबारात जखमी झालेत त्या जखमीना आज तुम्ही रुजू करुन घेण्यासाठी विषय समोर आणला आहे. तरी या सगळया गोष्टीमध्ये आज जे काही आरोप झाले. जी काही गोष्ट घडली तुम्हांला पत्रव्यवहार करुन त्याकडे लक्ष दिल जात नाही. मा. महापौर साहेब, या कोवीडच्या काळात अख्ख जग, आख्ख शहर तुम्हांला लक्षात ठेवणार आहे कारण तुमच्या हातून काही गोष्टी चांगल्या पण होतात आताच राहूल कलाटे बोलले, चांगल्या गोष्टीला, चांगल म्हणून आपण एकत्र येवून नक्कीच चांगल काम करु. चांगल्या कामाला आम्ही तुमच्या बरोबर आहेत. आमच पहील्या पासून वाक्य आहे की आम्ही चांगल्या कामाला माई, आम्ही तुमच्या बरोबर आहोत. त्याची शिक्षीका एवढे पैसे देवून एक्सपायर झाली, मग ते केल कोणी, त्याला जबाबदार कोण याची शहानिशा करुन माई

त्यांच्यावर कारवाई ही झालीच पाहीजे. नगरसेवक म्हणून आमच्या सारख्या मित्राला ते लक्षात आल असा प्रकार अजून बाकीच्या ठिकाणी होत नसेल का. आयुक्त साहेब आम्ही पाहतो, पालकमंत्र्याची किंवा विभागीय आयुक्तांची सातत्याने, माई शुक्रवारी, शनिवारी कॉन्सिल हॉलला मिटींग होते तुम्ही पण तीथ येत असता. आपण आपल शहर वाचवण्यासाठी जे काय कराव लागेल माई आम्ही तुमच्या बरोबर यायला तयार आहोत. आज जे काही सभागृहात तुम्हांला पाहीला मिळाल किंवा जो काही अक्रोश झाला, साहेब जो पोटतीडकीने बोलतोना तो अनुभवलेला व्यक्ती असतो म्हणून ते वाक्य तो तुम्हांला बोलतोय. त्यामुळे तुम्ही नाराज न होता, खचुन न जाता तुम्ही नक्की चांगल काम करता आम्हांला पण माहीती आहे कारण आम्ही तुमच्या सातत्याने कॉन्टॅक्टमध्ये असतो, तुम्ही खचुन न जाता ज्या पध्दतीने तुम्ही काम करताय, काही गोष्टी तुमच्याकडन राहून जात असतील त्या पुन्हा एकदा बाकीच्या सहकार्यांना तुमच्या अधिका-यांना विचारा. जस तुम्ही डिसीजन घेतल कुणालाच कुळू दिल नाही आणि ते महत्वाच डिसीजन तुम्ही घेतल. साडेतीन कोटी रु. आपण दिले म्हणजे अशा जो गोष्टी समोर आणतो, महापालिकेचा हा पैसा कररुपाने आलेला आहे तो वाया जावु नये तुम्हांला पुन्हा सांगतो तुम्ही, तुमची जी टीम यामध्ये जे काही काम करते आम्ही त्यांच कौतूकच करतो परंतु साहेब आता ज्या काही गोष्टी तुमच्या समोर मांडल्यात त्या कशा पध्दतीने समोर येवून त्यातून तुम्हांला मार्ग काढता येईल तो चांगला मार्ग काढावा कारण या शहराच नाव सत्ता कुणाची आहे, काय आहे आम्हांला त्याच्याशी काही घेणंदेणं नाही. आज आपण ज्या परिस्थितून चाललो त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्र आहोत त्यामुळ या शहराच नाव खराब नाही झाल पाहीजे. त्यासाठी माई तुम्हांला पण कळकळीची विनंती करतो, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह गेल्या साडेचार तासापासून या सभागृहामध्ये आपल्या सदस्यांनी आपआपल्या भूमिका मांडलेली आहे. आणि आपल्या सगळयांना माहिती आहे की, दुस-या लाटेमध्ये मोठया प्रमाणात रुग्णांची संख्या वाढलेली आहे. प्रत्येक सन्माननीयांनी सांगितलं की, मागच्या वेळेस ज्याप्रमाणे नियोजन केलं होतं त्याप्रमाणे यावर्षीही नियोजन केलं होतं. आपल्या सगळयांना माहिती आहे की,मागच्या वर्षी कोरोनाची पहिली लाट आली होती त्यावेळची परिस्थिती त्यावेळी रुग्णांची टेस्टींगची असणारी संख्या आणि कोरोनाबद्दलची असणारी भिती ही नागरीकांच्या मनामध्ये प्रचंड प्रमाणात होती. आणि त्यावेळेला जसे नियोजन केलं होतं त्याच पध्दतीने आता पण तसेच नियोजन केलंल आहे. परंतु परिस्थिती अशी आहे की,मागच्या कोरोनाच्या लाटेमध्ये

४५०० ते ५००० हा सर्वात जास्त आकडा होता त्या पध्दतीने आपण टेस्टींग करत होतो. आणि आता या दुस-या लाटेमध्ये खाजगी आणि महापालिकेच्या रुग्णालयाच्या माध्यमातुन १५०००  पर्यंत टेस्टींग करत आहोत. आपल्याला माहिती आहे की,रुग्णांची संख्या वाढत आहे. ज्यावेळेला रुग्णांचीसंख्या वाढते त्यावेळेला नियोजन करणं हे  आपल्या महापालिकेचं कर्तव्य आहे.  आणि त्या अनुषंगाने आपण मा.आयुक्त आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याने त्या रुग्णांना आपण सेवा देण्याचा प्रयत्न करतो आहे. मी मागच्या मुद्यांवर नक्कीच जाणार नाही. परंतु आपणां सर्वांना माहिती  आहे की, आता सुध्दा जनरल बॉडी अटेंड करत असताना मला खाजगी रुग्णालयाचे मला याठिकाणी २ ते ३ फोन आले. काल परवापासून आपण सर्वजण आयुक्तांच्या बरोबर या खाजगी रुग्णालयांना ऑक्सीजन मिळावं यासाठी आम्ही सातत्याने प्रयनशिल होतो. आणि त्याद्दष्टीने राज्याचे एफडीए चे सचिव असतील,त्यांनी नेमणुक केलेले त्यांचे अधिकारी असतील त्यांच्याबरोबर फक्त ऑक्सीजन मिळवण्यासाठी आयुक्त साहेबांनी एक कमिटी तयार केलेली आहे. आणि ती कमिटी झगडे  मॅडम आणि ओंबासे  साहेबांच्या अधिकाराखाली काम करत आहे. खरं म्हणजे आजची परिस्थिती आपल्या सगळयांना माहिती आहे खाजगी रुग्णालयामध्ये भयानाक परिस्थिती असताना दोन तासामध्ये हॉस्पिटलधुन रुग्णांना बाहेर न्या असे सांगितले असताना आमच्या सारख्या सन्मा.नगरसेवकांना /पदाधिका-यांना नागरीक आम्हाला फोन करतात. आणि अशी परिस्थिती असताना सुध्दा आम्ही जवळपास १/२ तासाच्या फरकानं त्याठिकाणी ऑक्सीजन देण्याचं काम आपली संपुर्ण टिम करते आहे. आपणा सर्वांना माहिती आहे की,ऑक्सीजनची परिस्थिती काय आहे,मागणी किती आहे. रुग्णांना मोठया प्रमाणात ऑक्सीजन लागत असताना राज्याचं डिपार्टमेंट सुध्दा त्याठिकाणी काम करत आहे.आणि त्यांच्याकड्डन तशा पध्दतीने पुरवठा केला जात आहे. मा.महापौर साहेब,आपल्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची बैठक आयोजित केली होती. शिवसेनेच्या गटनेत्याना फोन केला पण त्यादिवशी त्यांचा फोन लागला नाही. विरोधी पक्षनेत्यांना फोन केला,सचिन चिखले त्या बैठकीला उपस्थित होते. आमचा सगळयांना बरोबर घेवुन जाण्याचा प्रयत्न आहे. आम्ही विभागीय आयुक्तांच्या बरोबर चर्चा केली. आपल्या गटनेत्यांनी सांगितलं की,आपल्याकडे सिप्ला कंपनी आहे तसाच आम्ही त्याठिकाणी उल्लेख केला. आणि आपल्या चाकण एमआयडीसी मध्ये ४०० मे.टन ऑक्सीजन निर्मीती होत असेल आणि आपल्या  शहराला जर ऑक्सीजन मिळत नसेल तर आपण तातडीने काही तरी वेगळे पाऊल उचलावे अशी भूमिका आपण घेतलेली आहे. आणि विभागीय आयुक्तांनी सुध्दा सांगितले आहे की,२/३ दिवसामध्ये ऑक्सीजन हा सुरळीत होईल. परंतु त्यांचेही या निर्मीतीच्या

माध्यमातुन हात बांधले गेले असतील म्हणुन आपण ते समजु शकतो. आणि म्हणुन ऑक्सीजन आणि रेमडेसिव्हिरच्या संदर्भामध्ये राजकारण करु नये. उत्पादक क्षमता आणि मागणी याच्यामध्ये कुठे तरी तफावत असल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे हे सुध्दा आपल्याला माहिती आहे. परंतु मा.महापौर साहेब,आपण सुध्दा मा.पालकमंत्र्यांच्या बैठकीमध्ये आपण चर्चा केलेली आहे. आपल्या सर्वांचे प्रतिनिधी म्हणुन आपले विरोधी पक्षनेते सुध्दा त्या बैठकीला उपस्थित होते. त्यांनी सुध्दा या ऑक्सिजन आणि रेमडेसिव्हिरच्या संदर्भामध्ये आवाज उठवला होता. आपण सर्वजण सातत्याने पाठपुरावा करत आहोत. मगाशी सांगितल्याप्रमाणे परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. आणि प्रॉडक्शन करणा-या कंपन्यांकडुनच साठा येत नसल्यामुळे, ऑक्सीजनची निर्मीती करणा-या कंपन्याकडुन लिक्वीड येत नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. आणि म्हणुन सन्मा.महापौर साहेब, मी आपल्याला आवर्जुन सांगेन की, शहरामध्ये अशी भयानक परिस्थिती असताना शहरामध्ये जे खाजगी रुग्णालये चालवणारे मोठमोठे रुग्णालये आहेत ते सुध्दा हातबल झालेले असल्यामुळे ते डायरेक्ट सांगतात की,तुमचे रुग्ण तुम्ही घेवुन जा. अशी परिस्थिती असताना दुस-या बाजुला जम्बो कोविड सेंटर असेल,ऍटो क्लस्टर सेंटर असेल,वायसीएमएच असेल, जिजामाता,भोसरी हॉस्पिटल असेल त्याठिकाणी ऑक्सीजन टाकण्याचं काम सुध्दा जसं खाजगी रुग्णालयाच्या माध्यमातुन होत आहे त्याठिकाणी सिलेंडर मिळत नाहीत, रेमडेसीव्हिर मिळत नाही दुस-या बाजुला आपली सुध्दा अशीच परिस्थिती ऑक्सीजनच्या संदर्भामध्ये आहे. मला आठवतयं आपल्या कमिशनर साहेबांना रात्री तीन वाजुन पन्नास मिनिटांनी एका हॉस्पिटलने फोन केला होता. आणि त्यांनी १० सिलेंडरची व्यवस्था करुन दिली. आपले अधिकारी,आयुक्त साहेब सर्व मंडळी याठिकाणी चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. आपल्या वायसीएमएच्या डॉक्टरांच्या संदर्भात एकनाथरावांनी उल्लेख केला की, वायसीएमएच्या संदर्भामध्ये मागची काय परिस्थिती होती. त्या डॉक्टरांनाआपण काय म्हणत होतो. आणि आज त्याच डॉक्टरांबद्दल आपण काय बोलतोय त्यावेळेला त्यांची मान्यता घेताना या सभागृहामध्ये काय परिस्थिती होती.याबाबतीत मी नक्की चर्चा करणार नाही. परंतु त्याच डॉक्टरांमुळे आज वायसीएमएच ची जी परिस्थिती आहे ती त्याच डॉक्टरांमुळे चांगली आहे. हे सगळयांना ज्ञात आहे. परंतु याठिकाणी राजकारण करायचं आणि आपली भूमिका मांडायची हे मात्र याठिकाणी चालणार नाही. आपल्या सगळयांना माहिती आहे की,या पॅनिक परिस्थितीमध्ये जसं अभिषेकनी सांगितलं की, एका बाजुला जनता आहे आणि एका बाजुला खाजगी रुग्णालयं आहे आणि एका बाजुला महानगरपालिकेचे रुग्णालये आहेत आणि या परिस्थितीमध्ये लोकांना धीर देण्याचं

काम आपल्याला करायचं आहे. आयुक्त साहेब,मी आपल्याला याठिकाणी विनंती करणार आहे की, आपण याठिकाणी काम चांगल करत आहात हे मला याठिकाणी आवर्जुन उल्लेख करायचा आहे. परंतु आयुक्त साहेब,आपण जे आदेश काढताय त्याची अंमलबजावणी जलद गतीने होत नाही हे मी आपल्या निदर्शनास आणुन दिलं आहे. आणि हे मी आपल्याला तुमच्या बरोबर चर्चा करताना सांगितलेलं आहे. आणि म्हणुन या वायसीएमएच मधील डॉक्टर किंवा कर्मचा-यांच्या माध्यमातुन असेल हे सर्वजण या महापालिकेच्या रुग्णालयामध्ये चांगल्या प्रकारे कामकाज करताना दिसुन येत आहे. आयुक्त साहेब,डॉक्टर साहेब आणि त्यांची संपुर्ण टिम या ठिकाणी चांगल्या प्रकारे काम करीत आहे. परंतु मी याठिकाणी आवर्जुन उल्लेख करीन की, आपल्या हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये सिमाताईंनी सुध्दा उल्लेख केला आहे तो प्रश्न सुध्दा आपण गांर्भीयाने घेणं गरजेचं आहे. आपल्या महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये कोविडच्या संदर्भात जर दाखला दिला जात असेल तर अशा पध्दतीच्या आकडयामध्ये मिस्टेक येता कामा नये. कारण ज्यावेळेस आपण दाखला देतो त्यावेळेस ज्या डॉक्टरांनी हे सर्टीफिकेट प्रमाणित केलं आहे. प्रमाणित सर्टीफिकेट त्याठिकाणी लावत असताना अशा प्रकारची मला वाटतं तुमच्या माध्यमातुन जी काही वॉर रुम मध्ये जो काही आकडयांचा फरक कमी जास्त झाला असेल असं मला वाटतं. आणि आयुक्त साहेब,असे जर का चुकीचे कोण काम करत असेल तर त्याच सुध्दा ऑडीट करणं गरजेचं आहे. आणि आपण उद्यापासूनच आपण या ऑडीटच्या संदर्भामध्ये विचार करावा. आपल्या सन्मा.सदस्यांनी उल्लेख केला आहे तो चिंताजनक आहे आणि तो खरा आहे. आपले जे हॉस्पिटल आहेत किंवा खाजगी रुग्णालय असतील यासंदर्भात मा.आयुक्त साहेब,नक्कीच खुलासा करतील आणि माझ्या माहितीनुसार वायसीएम रुग्णालयामध्ये दर गुरुवारी प्रत्येक हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये याठिकाणी ज्या काही डेथ होत असतात त्याच ऑडीट याठिकाणी प्रत्येक हॉस्पिटल मध्ये केला जातो. आणि डेथचा जो रेशो आहे त्याठिकाणी सुध्दा मा.आयुक्त साहेबांनी लक्ष द्यावं. आपल्या सगळयांच्या समोर व्हेंटीलेटर आणि ऑक्सीजन, रेमडेसिव्हर हाच विषय सगळयांच्या डोळया समोर आहे. याबाबतीत आपण सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. इथे सुध्दा रेमडेसिव्हरचा पाठपुरावा एफडीए च्या माध्यमातुन आपल्या महापालिकेला जास्तीचे कसे मिळतील याचा सुध्दा आपण प्रयत्न करत आहोत. मा.महापौर साहेब,आपण सर्व सन्माननीयांना एक मेसेज पाठवला होता की,आपण जसं आयुक्त प्रशासनाची टिमची नेमणुक करतात त्यामध्ये एक टिम ऑक्सीजनच्या संदर्भात नेमणुक करतात,दुसरी टिम वायसीएमएचच्या मध्ये लक्ष घालायचं, बेड मॅनेजमेंट करायचे अशा पध्दतीची टिम मा.महापौर आपल्या अध्यक्षतेखाली जसं आयुक्त साहेब टिम

नियुक्त करतात त्याप्रमाणे सन्मा.सभागृहाची सुध्दा अपेक्षा आहे आणि प्रत्येक नगरसेवकांला वाटतयं की,मला याठिकाणी काम करायचं आहे. अशा सदस्यांची प्रशासनाच्या टिम बरोबर लोकप्रतिनिधी त्याठिकाणी काम करताना दिसतील. अशा प्रकारची टिम जलद गतीने उद्यापासून कार्यान्वीत व्हावी. अशी अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करतो.खरं म्हणजे मगाशी मी उल्लेख केला आहे की,चार हॉस्पिटलच्या माध्यमामधुन साधारणपणे आपण ७५० ऑक्सीजन बेडची निर्मीती याठिकाणी करतोय. आणि ५० व्हेंटीलेटरची निर्मीती करतोय.आणि परवाच्या दिवशी आयुक्त साहेब,आकुर्डीच्या हॉस्पिटलला गेले होते त्याच्या आगोदर मी त्याठिकाणी गेल्यानंतर त्याठिकाणी गॅस पाईपलाईनचं काम जलद गतीनं चालू आहे. १/२ दिवसामध्ये आपण त्याठिकाणी ऑक्सीजन बेड तयार करणार आहोत त्यानंतर थेरगांवच्या हॉस्पिटलला करणार आहोत. हॉस्पिटलनी व्हेंटीलेटरची मागणी केली असताना आपण सुध्दा आयुक्तांच्या बरोबर बैठक घेतली होती. त्यांनी सांगितलं की,आपल्याला प्रोअक्टीव्हली व्हेंटीलेटरची मागणी असते आणि व्हेंटीलेटरवरचा पेशंट आपल्या सर्व लोकप्रतिनिधींना किंवा मला सुध्दा माहिती आहे की,एकदा का व्हेंटीलेटवरती पेशंट गेला की त्याची एक तर डेथ झाल्यावर किंवा तो रिकव्हर झाल्यावरच व्हेंटीलेटर खाली होऊ शकतं. आणि म्हणुन ख-या अर्थांन मुद्या इथं येतो की, खाजगी रुग्णालयांमध्ये जर का व्हेंटीलेटर उपलब्ध नसेल तर त्यांनी सुध्दा त्याची तजवीज त्याठिकाणी केली पाहिजे. अशा प्रकारचा सुध्दा आदेश तुम्ही काढावा जेणेकरुन व्हेंटीलेटरसाठी फक्त ओटुचे बेड करायचे आणि नंतर व्हेंटीलेटरची वेळ आल्यानंतर त्यांना कुठंतरी ढकलून द्यायचं आणि मग सांगायचं वायसीएमला जा,जंम्बो सेंटरला जा आणि मग त्या पेशंटची अशी शेवटची स्थिती आल्यानंतर काऊंटडाऊन आमच्याकडे होतो. हे सुध्दा कुठं तरी बंद झालं पाहिजे. आणि याची आपण नोंद घ्यावी असं मला वाटतयं. वायसीएमएच मध्ये जी काही ट्रिटमेंट दिली जात आहे त्याठिकाणी डॉक्टरांचा अप्रोप चांगला असतो अशा पध्दतीचं काम इतर हॉस्पिटलमध्ये सुध्दा होणं गरजेचं आहे. खरं म्हणजे याठिकाणी अनेक विषयावर बोलायचं आहे परंतु त्याच विषयाची पुनरावृत्ती मी याठिकाणी करणार नाही. परंतु आयुक्त साहेबांच्या माध्यमामधुन याठिकाणी जो काही उल्लेख केला गेला की,आयुक्तांची संपुर्ण टिम याठिकाणी चांगल काम करत असेल तर आणि कोणी तरी एखादया एजन्सीला जरआपण काम दिलं असेल तर आणि त्या एजन्सीच्या माध्यमातुन महापालिकेचं किंवा आयुक्तांच नांव खराब होत असेल तर पीएमआरडीएने दिलेला जो ठेकेदार असेल त्याच सुध्दा काम चांगल झालं पाहिजे. आणि अशा प्रकारचं त्याच्याकडुन कृत्य होत असेल तर त्या संदर्भात सुध्दा त्याच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. आताच योगेशभाईंनी उल्लेख केला

आहे की,भाजपाचे नगरसेवक खरं म्हणजे आपल्याला माहिती आहे की, गेल्या ४.३० तास या सभागृहामध्ये चर्चा चालू आहे. चर्चा करणारे हे भारतीय जनता पार्टीचेच नगरसेवक होते. आणि भारतीय जनता पार्टीच्याच नगरसेवकांनी जो अन्याय होत आहे एका नगरसेवकाला ज्या शिक्षीकेने घडवलं,ज्या शिक्षीकेनं मोठं केलं त्यांच्यामुळे मी नगरसेवक झालो ही भूमिका मांडत असतांना मी बेड मागितला तर मला बेड मिळाला नाही. एखादया डॉक्टरने त्यांचे संबंध असताना त्याने या हॉस्पिटलमध्ये बेड तयार करुन देतो आणि त्याच्या मागे पैशाची देवाण-घेवाण केली जात असेल तर असा चुकीचं काम करणारा कुठलाही ठेकेदार असेल तर तो जम्बो हॉस्पिटलचा असेल,अँटो क्लस्टर मधील डॉक्टर असेल त्यांच्या अंडरमध्ये काम करणारा कोण डॉक्टर असेल तर त्याची पुर्णता याठिकाणी चौकशी झाली पाहिजे. त्याच्यावर खंडणीचा गुन्हा याठिकाणी दाखल केला पाहिजे. अशी मी या सभागृहाच्या वतीने मागणी करतो. परंतु सन्मा.महापौर मी याठिकाणी उल्लेख करीन की, सन्मा.सदस्यांनी सांगितलं की,त्याठिकाणी भारतीय जनता पार्टीचं सेटलमेंट चाललं होतं. योगेशभाई आमचे दोन्ही नगरसेवक त्याठिकाणी होते. मी अँटो क्लस्टरला गेलो त्याठिकाणी माझ्या वॉर्डातील पेशंट होता मी त्याची माहिती घेतल्याच्या नंतर कळाल की, आमचे दोन नगरसेवक आंदोलनाला बसलेले आहेत. त्यावेळेला त्यांच्या बरोबर चर्चा करत असताना असं,असं आहे आणि मी सुध्दा त्याठिकाणी तीन तास बसलो. त्या डॉ.होळकुंदे यांना बोलवुन घेतलं आमच्या नगरसेवकांनी त्याला दम दिला त्यांनी सांगितलं की,मला याच्या मुळावर जायचं आहे नेमकं काय झालं आहे. यासंदर्भामध्ये आमच्या दोन्ही नगरसेवकांनी त्यांची भूमिका मांडली आणि त्याठिकाणी सांगितलं की, जर तो डॉ.होळकुंदे असेल,त्याचा असिस्टंट असेल, डॉ.कसबे असेल यासंदर्भामध्ये स्वत: फोन करुन मी इन्स्पेक्टर बोलतोय असं आमच्या कुंदन गायकवाडनी सांगितलं आणि म्हणुन मी त्यांच खरं अभिनंदन करेन की,त्यांनी ख-या अर्थानं याठिकाणी जे चुकीचं काम चाललेलं आहे त्याळा आळा बसवायचा आहे. आणि या अँटो क्लस्टरच्या माध्यमातुन महापालिकेचे जे नांव खराब होत आहे.त्याला आळा घालण्याचं काम भारतीय जनता पार्टीच्याच नगरसेवकांनी केलं हे देखील मी योगेशभाईंना ज्ञात करुन देतो. आणि योगेशभाई आम्ही सेटलमेंट वगैरे करणारे नाही. आम्ही कामगार वर्गातले लोक आहोत,आमची दुकानदारी पण नाही आपलं सगळया पिंपरी चिंचवडकरांना माहिती आहे काय आहे. पण मी त्यावर बोलणार नाही. यासंदर्भात मी बोलणार नाही आणि ती बोलण्याची वेळ पण नाही. लोकांना आता धिर द्यायचं काम आहे. लोकांना व्हेंटीलेटर, ऑक्सीजन उपलब्ध करुन द्यायचं आहे. त्यांना रेमडेसिव्हीर, बेड उपलब्ध करुन द्यायचं आहे. आणि हे काम आम्ही आयुक्तांच्या माध्यमातुन सर्वजण करतोय

परंतु मी याठिकाणी एकच सांगेन की, हे सगळं होत असताना चुकीचं काम होत असेल तर त्यामध्ये अधिकारी असेल,डॉक्टर असेल, यांनी अशा प्रकारचं गैरकृत्य करत असेल आणि महापालिकेचं नांव खराब करत  असेल तर तातडीची शिक्षा याठिकाणी झाली पाहिजे. आणि सन्मा.महापौर साहेब, ज्यांनी चुकीचे काम केलं आहे,ज्यांनी पैसे घेतलेले आहेत, पैसे घेण्यास त्याला कोणी प्रवृत्त केलं आहे यासगळयांच्या वरती तातडीने गुन्हा दाखल केला पाहिजे. सी.पी.साहेबांनी परवाच सांगितलं आहे की,अशा काळामध्ये कुठलेही अंम्बुलन्सवाले असतील, डॉक्टर असतील किंवा सेवा पुरविणारे जे लोक आहेत त्यांनी चुकीचं काम केलं तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील असे आवाहन त्यांनी व्हॉटस् अप सोशल मिडीयाच्या माध्यमातुन दिलेले  आहे. आणि म्हणुन सन्मा.महापौर,मी आयुक्तांना सांगितलं आहे की, मागच्या काळामध्ये सुध्दा अंम्बुलन्सच्या संदर्भात ताईंनी सांगितलं की, आणि ते सुध्दा आम्ही आयुक्तांना ८/१० दिवसापुर्वीच सांगितलं आहे. अंम्बुलन्सच्या माध्यमातुन नागरीकांची त्याठिकाणी लुट होत आहे. आणि म्हणुन महापालिकेने याठिकाणी तातडीने बोर्ड लावावा जेणेकरुन रुग्णांच्या जवळच्या नातेवाईकांना कळलं पाहिजे की,याठिकाणी कुठलेही पैसे   स्विकारले जात नाहीत, कोणी याठिकाणी पैसे मागण्याचा प्रयत्न केला तर त्याच्यावर कारवाई  होईल. अशा प्रकारचे बोर्ड सुध्दा आम्ही याठिकाणी लावण्यास सांगितले. स्मशानभुमीच्या संदर्भात सुध्दा तशाच पध्दतीने बोर्ड याठिकाणी लावलेले आहेत. आरटीओ कार्यालयाने जे दर दिलेले आहेत त्याच्यापेक्षा जे जास्त दर घेतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील असे सी.पी.साहेबांनी आदेश दिलेले आहेत. अशा मध्ये सुध्दा एखादा डॉक्टर किंवा अन्य कोणी चुकीच्या माध्यमामधुन भावनिक होऊन लोकांच्या भावनेचा गैरफायदा घेवुन जर स्वत:च्या हितासाठी जर का पैसे कमवत असेल तर त्या डॉक्टरला मी तर त्याला डॉक्टर म्हणणार नाही तो एक प्रकारे घाणेरडे काम करतोय त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. आणि आपण तसे आदेश देण्यात यावे.आणि सन्मा.महापौर साहेब,मी आपल्याला एक विनंती करणारआहे की, या संदर्भामध्ये आयुक्तांनी मागच्या आठवडयामध्ये सांगितलं की,अँटो क्लस्टर सेंटर,जम्बो कोविड सेंटर असेल याठिकाणी येणा-या रुग्णांची तपासणी महापालिकेची टिम करणारआहे. आणि त्या डॉक्टरांची लिस्ट सुध्दा दिली गेलेली आहे. या डॉक्टरांच्या टिमने यासंदर्भामध्ये तातडीने लक्ष घातले पाहिजे. आणि अजुन एक सांगायच आहे की, आपले जे अँटो क्लस्टर कोविड सेंटर असेल, जम्बो कोविड सेंटर चालवणारे जे कोणी ठेकेदार असतील त्याठिकाणी जे काही कामकाज चालतयं ते आजपासून आणि आतापासूनच संपुर्ण यंत्रणा वायसीएमएचच्या माध्यमामधुन त्याठिकाणी कुठल्याही रुग्णाने  रेफरशिट घेवुन  गेल्याच्या नंतरच

आमच्या डॉक्टरांनी त्या रुग्णांना नियुक्त करायचं आणि त्या डॉक्टरांच्या अध्यक्षतेखालीच त्या रुग्णांना अँडमीट करायचं आम्ही कुठल्याही ठेकेदाराला ओळखत नाही. आम्ही आमच्या अधिका-यांना विचारु अधिकारी त्याला विचारेल,अधिकारी त्याचा गुलाम नाही. त्यामुळे आपल्या अधिका-यांच्या कंट्रोलमध्ये हे रुग्णालय चालणार आहे. आणि म्हणुन तशा पध्दतीचे आदेश आपण आयुक्तांना द्यावेत. जम्बो हॉस्पिटल, अँटो क्लस्टर हॉस्पिटल हे महानगरपालिकेच्या ताब्यात द्यायचं आहे. त्या ठेकेदारांच्या ताब्यात ठेवायचं नाही. आणि म्हणुन तशा पध्दतीचे आदेश आज पासूनच कार्यान्वीत करण्याचे आदेश आपण त्यांना देण्यात यावे. अशी मी विनंती करतो आणि कुणाचीही जहागीरदारी,दुकानदारी, कुणाच्या स्वत:च्या विकासासाठी जे चुकीचं काम करतील त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. आणि चुकीचं काम करणा-याला उघडकीस आणण्याचं काम आमचे दोन सन्मा.सदस्य भारतीय जनता पार्टीचे आहेत त्यांच मी पुन्हा एकदा अभिनंदन करतो. त्यांच आभार व्यक्त करेन की,सन्मा.जनतेच्यासाठी ख-या अर्थाने आवाज उठवला आणि तोभारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनीच उठवला आणि म्हणुन त्याचा आम्हाला अभिमान आहे. आणि म्हणुन आता लोकांची धावाधाव ऑक्सीजन,व्हेंटीलेटर,रेमडेसिव्हर साठी असताना असे चुकीचे काम करणा-याला अद्दल घडवावी असं मला याठिकाणी वाटतं. खरं म्हणजे आयुक्तांनी गेल्या दिड महिन्यापासून आपण आता काय करणार आहोत,कुठं काय करणार आहोत मला वाटतं आपण नेमकं काय केलं आहे याची सभागृहाला जर का कल्पना दिली तर सभागृहाला समजेल. आपण काय कार्यान्वीत करणार आहे,आपण काय अँक्टीव्हीटी राबवतोय अँटो क्लस्टर मध्ये आपण १७ दिवसामध्ये ५ बेड व्हेंटीलेटर चे केले. त्यासंदर्भात सुध्दा आपण मा.महापौर साहेब, आयुक्तांना तशा सूचना द्याव्यात. आणि या सभागृहाला जी काही खरी माहिती आहे ती या सभागृहाच्या समोर यावी. असं मला याठिकाणी वाटतं दोन्ही हॉस्पिटल हे महापालिकेच्या ताब्यात घेवुन त्याच कंट्रोल आपल्या महापालिकेच्या अधिका-यांकडे देण्यात यावे. धन्यवाद.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच पक्षनेत्यांनी जी सूचना मांडली आहे त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर –** सर्व सन्मा.सदस्यांनी जे काही प्रश्न या सभागृहात मांडलेले आहेत.त्या सर्वांच्या भावनांशी,मतांशी मी सहमत आहे. सर्वांच्या विचाराने मी आयुक्तांना आदेश देते की, अँटो क्लस्टर त्याचप्रमाणे जम्बो कोविड या हॉस्पिटलच्या माध्यमातुन माझ्या दोन खिलारी नगरसेवकांनी युवा नेतृत्व अतिशय जागरुक आहे या दोन

नगरसेवकांच मी अभिनंदन करते. विकास आणि कुंदन आज कोणी तरी आपल्या पक्षाचे आहेत कुणाला तरी पाठीशी घालू, अमकं करु असे जे काही होणार होतं. त्यांनी वेगळया पध्दतीने बिनधास्तपणे झालेली घटना या सभागृहासमोर आणली म्हणुन आपण या सभागृहात गेली ४ तास झाले चर्चा करीत आहोत. जम्बो आणि अँटो क्लस्टर हॉस्पिटलचा आपण ताबा घेवुन आपल्याकडे मॅन पॉवर नसेल तर, मॅन पॉवर घेवुन आणि आपण स्वत: हे दोन्ही हॉस्पिटल चालवण्यास तयार रहा. ज्यांनी हे हॉस्पिटल चालविण्याचा ठेका घेतला आहे त्यामध्ये कपाळे असेल, प्रिती व्हीक्टर असेल यांच्या घरची ही प्रॉपर्टी नाही. सिमाताईंनी आपल्या सगळयांना निदर्शनास आणुन दिलं आहे.मला सुध्दा हजारो फोन येतात. मी कोविड सेंटरमधुन फिरुन आलेली महिला आहे. एकमेव मी महिला आहे हे कोणीही सांगावं आणि अशा ठिकाणी आपण सर्व विकास बाजुला ठेवुन लोकांना आपल्याला जीवदान द्यायचं आहे आणि त्याठिकाणी असे गैरप्रकार जर घडत असतील तर त्याला आपण कुठल्याही परिस्थितीत माफ करणार नाही. आणि त्या हॉस्पिटलमध्ये पहिल्या, दुस-या वर्षीची डिग्री घेत असलेली मुलं जर डॉक्टर म्हणुन वापरले जात असतील आणि पैशाच्या आहारी जाणारे डॉक्टर असतील तर त्या लोकांना कुठल्याही परिस्थितीत त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याठिकाणी रुग्णांच्या नातेवाईकांकडन पैशाची मागणी केलेली आहे. या मागणीच्या संदर्भात तो माणुस कोण आहे तो सुध्दा याठिकाणी जाहीर झाले पाहिजे. शहराच्या नागरीकांना माहित झालं पाहिजे की, पिंपरी चिंचवड शहराचं सगळीकडनं कौतुक होत आहे. आणि त्याठिकाणचा कॉन्ट्रॅक्टर महापालिकेची बदनामी करत असेल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. तुम्ही जर त्याचा शोध घेतला नाही तर आयुक्त साहेब, तुम्हांला त्या माणसाचा शोध घेण्यासाठी किती वेळ पाहिजे ते सांगा त्या वेळामध्ये तो जर नाही भेटला तर तुम्ही सुध्दा आयुक्त कार्यालयामध्ये जायचं नाही. अशी मी या सभागृहाच्या वतीने आदेश देते. कारण ही बदनामी फक्त आयुक्तांचीच नाही तर या शहराची आणि नगरसेवकांची होत आहे.आज आपण जीव तोडून त्यांना सांगत आहोत. आज आपण रात्रं म्हणत नाही,दिवस म्हणत नाही आणि हे कोविड सेंटर आपण या शहरासाठी केलंलं आहे. बरेचसे व्हेंटीलेटर त्याठिकाणी बुक आहेत. परिस्थिती भयंकर आहे. आपल्या अधिका-यांना त्यांच्या ताटाखालचं मांजर किंवा त्यांच आपण नोकर म्हणुन ठेवत असतील तर महापौर आणि माझे सर्व नगरसेवक हे कधीही कदापी सहन करणार नाही. तुम्ही कामगार आहात आणि त्याप्रमाणेच तुम्ही सन्मानाने काम केलं पाहिजे. त्याठिकाणचा कॉन्ट्रॅक्टर पेशंटला हे आण,ते आण असं म्हणत असेल तर त्या प्रिती व्हीक्टरला देखील त्याठिकाणाहून ताबडतोब हाकलुन द्या. आणि माझ्या डॉक्टरांच ज्याप्रमाणे कौतुक केलं आहे त्यामध्ये

डॉ.सोनी,डॉ.लाठी असे अनेक चांगले डॉक्टर आहेत त्यांच्या ताब्यात एक ग्रुप करुन त्यांच्या ताब्यात द्या. आणि माझ्या या शहरवासियांनी कुठल्याही प्रकारची कॉटची मागणी केली तर ती मिळाली पाहिजे. आम्ही हिंडत असतो आणि कुठंतरी खाजगीत जात असतो आणि मग त्याठिकाणी रागाच्या भरात आपल्या हॉस्पिटलचं नुकसान होऊ नये म्हणुन आपल्याला डॉक्टर अँडमिशन देतो. आणि नंतर प्रॉब्लेम येतो तो व्हेंटीलेटरचा तर असे प्रकार होत असतात पण खरंतर महापालिकेचा टॅक्स भरणा-या माझ्या करदात्यांना जास्त लाभ मिळाला पाहिजे. मी असं म्हणत नाही की, कुणाला अँडमिशन देवु नका असं मी म्हणत नाही पण पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या आणि पेशंटची संख्या यांचा अभ्यास करुन काही भाग आपल्या भागातील पेशंटसाठी राखीव ठेवावा. अशी मी आपल्याला विनंती करते. आणि डॉ.होळकुंदे यांच्यामुळे महापालिकेची बदनामी होत आहे.आपल्याला आता ही फक्त एक गोष्ट दिसली आहे पण यापुर्वी सुध्दा अशा अनेक गोष्टी झालेल्या असतील पण लोक म्हणतात जाऊ दे,आपल्याला बेड मिळाला त्यामुळे हे लोक तक्रार करीत नाही. त्यामुळे अशा डॉक्टरांवर लोकांवर कारवाई झाली पाहिजे. आणि ती कारवाई करा असे मी सर्वांच्या वतीने आदेश देते. आणि हे हॉस्पिटल आपल्या ताब्यात घेवुन त्याठिकाणी आपले लोकांची नेमणुक करावी. असे आदेश देते. आणि आता आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर महोदया,सन्मा.सभागृह आणि उपस्थित सर्व पत्रकार बंधु भगिनींनो आणि माझे सर्व सहकारी आज जे काही डिस्क्शन सर्व सन्माननीयांनी जे काही इश्यु केलं आहेत त्यामध्ये अँटो क्लस्टरच्या संदर्भात जे आरोप केलेले आहेत आणि सगळयांनी इच्छा प्रकट केली आहे. आणि या महापालिकेत जॉईन होऊन अजुन तीन महिने व्हायचे आहेत. या काळामध्ये जे,जे काही माझ्या नजरेसमोर आलं की ज्या बाबतीमध्ये काही तरी इरेग्युलॅरीटी झाली आहे,रॉंग झालं आहे या सगळया बाबतीमध्ये मी अँक्शन घेतलेली आहे. आणि यापुढेही घेणार आहे. त्यामुळे ही बाब कालच माझ्या नजरेसमोर आली सन्मा.नगरसेवकांनी मला फोन करुन सांगितलं की,असं काही तरी होतयं मी त्यावेळेला व्ही.सी.मध्ये सन्मा.मुख्यमंत्री साहेबांच्या जाण्याच्या गडबडीत होतो. मी त्यांना म्हणलं की, तुम्ही मला डिटेल्स कळवा म्हणजे मी अँक्शन घेतो. याबाबतीत निश्चितपणे पोलीस केस दाखल केली जाईल. आणि याबाबतीत मी सी.पी.साहेबांना विनंती करीन की, याचे इन्व्हेस्टीगेशन केलं जावं आणि जे काही सत्य आहे ते सगळयांच्या समोर यावं यामध्ये कोणत्याही प्रकारचा दुसरा हेतु नाही. नागरीकांच्या समोर आजची जी परिस्थिती आहे त्या परिस्थितीमध्ये आज ज्या काही घटना

घडत आहेत त्याविरुध्द कठोर पावले उचललीच पाहिजेत. यापुर्वी ज्या,ज्या गोष्टी माझ्या कानावर आल्या त्यामध्ये स्मशानभुमीमध्ये पैसे घेण्याची बाब माझ्या समोर आली होती. त्या व्यक्तीला त्याच दिवशी तेथुन काढण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आपले फार्मासिस्ट यांचेबाबतीत वायसीएम मध्ये आणि जम्बो मध्ये काही आरोप झाले होते. याचे नंतर इन्व्हेस्टीगेशन होईल पण आरोप झाले म्हणुन तिथं काही तरी असेल म्हणुन मी त्यांची त्याचवेळी बदली केली होती. अशा प्रकारचे आपण इनडिपेंड डिसीजन घेतलेलं आहे. दुसरा जो विषय सभागृहासमोर आला तो म्हणजे स्पर्श हॉस्पिटल याविषयी माझी स्पष्ट भूमिका आहे की, कोणाला लपवण्याचा किंवा कोणाला हे करण्याचा अजिबात उद्देश नाही. आपले जे अँडीशनल कमिशनर पवार आहेत यांच्या नावा तिथे समावेश असल्यामुळे आणि ते सिनियर ऑफिसर असल्यामुळे मी विभागीय आयुक्तांना विनंती केली होती की,तुम्ही सिनियर ऑफिसर द्या,त्याच्यापेक्षा सिनियर ऑफिसर असेल तरच त्यांची इन्क्वॉयरी होऊ शकते. आपल्या पालिकेमध्ये तशी इन्क्वायरी होऊ शकत नाही.त्यावेळेला त्यांना विनंती केल्यानंतर त्यांनी एक सिनियर आयएएस ऑफिसर यांनी एक कमिटी करुन त्यांना दिलेले होते आणि अजुन दोन ऑफिसर दिले होते. आणि सन्मा.बहल साहेबानी म्हणले की,मी एवढे,एवढे पत्र दिले होते. ते सर्व पत्रं त्याच्याशी निगडीत जेवढे आरोप होते ते सर्व त्या इन्क्वायरीच्या अधीन आहेत. त्यामुळे त्यासंबंधी अजुन माझा परत काही खुलासा देण्याची मला नाही वाटत काही गरज आहे. आणि दरम्यानच्या काळात याऑफिसरला कोविड झाल्यामुळे थोडा डिले झालेला आहे. त्याबद्दल मी सभागृहाची दिलगीरी व्यक्त करतो. याच्यामध्ये माझा काही उद्देश नाही. आणि तुम्ही आजच सांगितलं की,तुम्ही स्वत: चौकशी करा तर मला वाटतं हे संयुक्तीक होणार नाही. ऑलरेडी विभागीय आयुक्तांनी याची एक कमिटी नेमलेली आहे. आणि विभागीय आयुक्तांनी ज्या अधिका-यांची चौकशीसाठी नेमणुक केली आहे त्यांना मी विनंती करीन आणि ते लवकरात लवकर ती इन्क्वायरी कम्पलीट करतील आणि त्यामध्ये जे काही तथ्य असेल ते यासभागृहापुढे मांडण्यात येईल. आणि अजुन काही सभागृहाची इच्छा असेल तर ती मी करण्यास तयार आहे. माझा त्याच्यामध्ये पर्सनली काहीच दुसरा हेतु नाही. यानंतर दोन,अडीच महिन्यामध्ये जशी परिस्थिती इन्व्हॉल होत आहे. कोरोनाची परिस्थिती आपण सगळे बघतो आहोत. काही सन्मा.सदस्यांनी आमच्या कामांविषयी संतोष व्यक्त केला,तारीफ केली,काही लोकांनी आमच्यावर आरोप केले आहेत त्यांच्या आमच्याकडनं जास्त अपेक्षा असतील आणि त्या अपेक्षा पुर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करु आता कोरोनाची जी काही परिस्थिती आहे आपण आपल्या महानगरपालिकेच्या सगळया गोष्टी बघत असताना आजुबाजुला सुध्दा बघणं गरजेचं आहे त्यामध्ये पीएमसीला

काय चाललं आहे, बीएमसी मध्ये काय चाललं आहे,भारतामध्ये इतर ठिकाणी काय चाललं आहे आणि या व्हायरसचं स्वरुप कसं आहे. आणि किती केसेस आहेत याविषयी मला वाटतं अजुन थोडी ब्रॉड भूमिका घेतली तर आपल्या संपुर्ण पालिकेमध्ये काय चाललं आहे याचे रिॲलिसिस्ट ॲसेसमेंट घेवु शकते. यामुळे मला पर्सनली काही होत नसलं तरी माझ्या बरोबर जे काम करतात त्यांना कुठे नां कुठे तरी ठेच पोहचते की,एवढं जर का करुन आमच्याबद्दल असं बोललं जात असेल तर मला वाटतं भावना कुठे नां कुठे तरी असते. आणि वेळोवेळी आम्हांला मा.महापौर असो किंवा स्थायी समितीचे सदस्य हे आम्हांला वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतात.त्यामुळे त्यांच्याकडनं ब-याच आयडीया मिळतात. आणि त्यामधुन आम्ही ब-याच गोष्टी प्रोव्हाईड केलेल्या आहेत. सिमाताईंनी आज बरेच मुद्दे उपस्थित केले आहेत मला वाटतं सुरुवातीपासून त्यांचा माझ्यावर काही तरी रोष दिसतो. किंवा त्यांच्या माझ्याकडनं जास्त अपेक्षा असतील मी ते सगळं पॉझीटीव्हली घेतो तुमची अपेक्षा अशी असेल की,मी तुम्हांला फोन करुन विचारावं की,ताई, याबाबतीत तुमचं मत काय आहे ? मी तसं करण्यास तयार आहे मला अजिबात तसे काही नाही. ऑदरवाईज सर्व सन्मा.सदस्य येत असतात फोन करतात,सांगतात आणि जेंव्हा आम्हांला काही डिसीजन घ्यायचा असतो त्यावेळेस आम्ही गटनेत्यांना बोलवतो आम्हांला मार्गदर्शन करा, आणि त्या पध्दतीने आपण पुढे जात असतो. आणि त्यांनी आम्हांला हे ठिक चाललं आहे, ते नाही असं सांगितलं तर आम्हांलाही आनंद होईल. त्यामुळे तसा काही आपला उद्देश नाही. या २/३ महिन्यामध्ये आपण खुप स्टेपस् आपण घेतलेल्या आहेत ते जम्बो कोविड सेंटर सुरु करण्यापासून जो की,आपला योग्य निर्णय होता. त्यानंतर ब-याचशा अशा गोष्टी आहेत त्यामध्ये आपण कॉल सेंटर सुरु केलं. त्यानंतर २४ बाय ७ अंम्बुलंन्स सुरु झालेल्या आहेत. त्यानंतर एक ॲप डेव्हलप केलं आहे. त्यानंतर सर्व प्रकारच्या कामासाठी वेगवेगळया अधिका-यांनाआपण जबाबदा-या दिल्या. आणि हे सर्वजण निष्ठेने आणि कार्यतत्परतेने काम करत आहेत. आणि त्यामुळे ब-याचशा ज्या सिचवेशन आहेत त्यामध्ये आपण त्यामधुन योग्य रितीने त्यामधुन मार्ग काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.आणि मला वाटते आपल्या सगळयांची भुमिका फार मोठी आहे. सन्मा.तरुण नगरसेवक आहेत त्यांच्या अपेक्षा बघुन खुप कौतुक वाटतयं आणि त्यातुन आम्हाला ब-याच गोष्टी करण्यास प्रोत्साहन मिळतयं स्थायी समितीमध्ये पण ब-याचशा चर्चा होत असतात. आज सन्मा.सदस्य अभिषेक बारणे साहेबांनी जो मुद्या उपस्थित केला आहे की,तुम्ही १०० टक्के इन्सिटीटयुशन क्वॉरंटाईन करा, मला वाटतं त्यांनी दोन दिवसापुर्वी आम्हांला ही कल्पना दिली हीच कल्पना त्यांनी दिड महिन्यापुर्वी दिली असती तर आपण त्याच्यावर अजुन विचार करुन काय करता

येईल का,याचा विचार केला असता. याबाबतीत आपल्याला पुढे कसं पाऊल उचलता येईल यासाठी प्रयत्न करत आहोत. गेल्या काही दिवसापासून आपण ७० ते ८० व्हेंटीलेटर वाढवलेले आहेत. आणि पुढच्या काळामध्ये अजुन ५० व्हेंटीलेटर वाढविण्याची प्रक्रिया चालू आहे. आपले जे दोन मोठे दवाखाने आहेत त्यामध्ये आकुर्डी,थेरगांव हॉस्पिटलमध्ये आपण युध्दपातळीवर याठिकाणी आणि दुसरे दोन दवाखाने मिळून ऑक्सीजन टँक आणि ऑक्सीजनची व्यवस्था झाली की आपल्याला ७०० ओ.टू.बेडची आपल्याला व्यवस्था करता येणार आहे. या सर्व यंत्रणेसाठी आपण तयारच होतो. आणि या ऑक्सीजनचा गेल्या १०/१२ दिवसाचा जो इश्यू आहे हा इश्यू झाला नसता तर मला वाटतं बेडसाठी जेवढे आता इश्यूज आहेतते इश्यूज आलेच नसते. सध्या आपण सगळीकडे परिस्थिती बघीतली तर आपण ब-यापैकी चांगल्या परिस्थितीमध्ये आहोत. व्हेंटीलेटरसाठी थोडसं झगडाव लागत आहे. पण कुठं तरी अर्धा /एक तासानंतर मार्ग निघतो. आणि या सर्व बाबीकडे आपण बघितलं पाहिजे की,आपल्याकडं आजुबाजुचा परिसर मावळ आहे, त्यानंतर नगर पासून ४० ते ४५ टक्के पेशंट येत असतात. त्यामुळे आपले जे नियोजन आहे त्यामध्ये दिसुन येते की, ते कमी पडतं आहे. यापुढेही आपण या ७०० बेड बरोबरच २ जम्बोसाठी आपण निविदा मागविलेल्या आहेतच. यामध्ये अजुन काही इश्युज निर्माण झाले तर आपण फ्युचरसाठी रेडी रहावे म्हणुन आपण त्या स्टेप घेतलेल्या आहेत ऑक्सीजन जनरेटर आपण मागवलेल्या आहेत. आणि प्रत्येक आठवडयामध्ये सन्मा.पालकमंत्री ज्या बैठका घेत असतात सदर बैठकीमध्ये मा. आमदार,मा.खासदार, मा. महापौर उपस्थित असतात आणि त्या बैठकीमध्ये संपुर्ण जिल्ह्याचा आढावा घेतला जातो. पीएमसीच्या बाबतीतही चर्चा होते त्यामुळे काही मार्गदर्शनही मिळतं आणि आपल्यापैकी आम्हांला जे,जे मार्गदर्शन करतात आणि त्यातुन पुढे मार्ग काढत असतो. दुसरा इश्यू आहे तो डेथचा आपल्याकडे खुप डेथ झालेल्या आहेत मला वाटतं सध्याचा जो स्ट्रेन आहे याबाबतीत आपण मिडीया आणि न्युजपेपर मध्ये बघितलं असेल की, हा जो स्ट्रेन आहे तो डब्बल म्युट्रेन झालेला आहे. याच्यामुळे २/३ दिवसामध्येच लोक कोलॅप्स होतात. आणि ज्यांची इम्युनिटी चांगली आहे त्यांना दुसरा कोणता आजार नाही असे पेशंट सस्टेंड करतात त्यांची प्रकृती बरी होते.आणि काही लोकांची खुप कमी दिवसामध्ये प्रकृती बिघडते. आणि ही परिस्थिती महाराष्ट्रामध्ये सगळीकडे आहे.आपल्या शेजारी पुण्यामध्ये पण आहे,बीएमसी मध्ये आहे. जम्बोच्या बाबतीत जे प्रश्न उपस्थित झाले आहेत त्याचे डेथच्या बाबतीत जे अपडेशन आहे आपला जो डेटा आहे त्याच्यामध्ये थोडी तफावत आहे. आणि ती सगळीकडे आहे. पुण्यामध्ये,बीएमसी मध्ये पण तफावत आहे कारण याच्यामध्ये लपवण्यासारखं

काहीच नाही. प्रत्येक हॉस्पिटलला जे अपडेशन करायचं असतं त्याचा फॉलोप अजुन चालू आहे त्याचे अपडेट येत राहतील. आणि पुढच्या आठ दिवसामध्ये अपडेट घेवुन जे काही क्लिअर पिक्चर आहे ते आपल्याला देवु. आणि सिमाताईंच्या पत्राचं उत्तर आम्ही निश्चित देवु. त्यामुळे आमचा दुसरा काही हेतु नाही. डेथचं ऑडिट होत असते.जम्बो, अँटो क्लस्टर,आणि वायसीएमएच मध्ये आणि सर्व कोविड हॉस्पिटलच ऑडिट कम्पलसरी करतो आहोत. बाकीच्या सर्व हॉस्पिटलचं आपण इलेक्ट्रीक ऑडीट करणार आहोत. ऑक्सिजनच ऑडिट झालेलं आहे. आज परत डिव्हीजनल कमिशनरची टिम ऑक्सिजन ऑडिट करण्यासाठी आलेली होती. त्यानंतर बायोमेडिकल डिपार्टमेंटचे सीईओपीचे जे प्रोफेसर आहेत त्यांच्याकडनं आपण ऑक्सीजनचा जो टँक आहे आणि त्याच्याशी निगडीत ज्या काही गोष्टी आहेत त्यांच आपण व्यवस्थित परिक्षण करुन घेतलेलं आहे. त्याच्यामध्ये काही उणिवा आहेत का, जसं नाशिकला जशी घटना घडली तसं आपल्याकडे स्टडी झालेला आहे. आणि त्याच्या रिपोर्टप्रमाणे आपण रेक्टीफिकेशन काही प्रमाणामध्ये केलेलं आहे. जम्बो मध्ये ज्या काही डेथ झालेल्या आहेत त्यामध्ये आम्ही जे काही अनॅलिसीस केलं आहे अजुन डिटेल अनॅलिसीस व्हायचं आहे त्यामध्ये २४ तासामध्ये २५ डेथ झालेल्या आहेत. म्हणजे जम्बो मध्ये रुरल एरिया मधुन आणि प्रायव्हेट हॉस्पिटलमधुन खुप सिरीयस पेशंट असतात असेच पेशंट याठिकाणी येतात आणि त्यांचा सपोज सॅच्युरेशन ३५ ते ७० आहे असे लोक डायरेक्ट अँडमिशनसाठी येतात. त्यामुळे या लोकांना व्हेंटीलेटरवर घेतलं तरी त्यांच्या संपुर्ण बॉडीमध्ये ऑलरेडी इम्फॅक्ट झालेला असतो. तर तज्ञ मंडळी त्याला अनॅलिसीस करत आहेत. आपल्या वायसीएमएच चे ऑलरेडी तीन डॉक्टर जम्बो मध्ये रोज जातात आणि सगळे पेशंट चेक करतात. सर्व पेशंटचा स्टेटडाऊनचा ते प्रोटोकॉल फॉलो करतात. आणि त्यांच्या मार्गदर्शनानंतरच पेशंटला ओ.टू. मध्ये शिफ्ट केलं जातं, व्हेंटीलेटरवर किंवा स्टेटडाऊन करुन सी.सी.मध्ये रेकॉर्ड केलं जातं किंवा डिसचार्ज केलं जातं हे आपलेच डॉक्टर करतात. तिथले कोणी डॉक्टर करत नाहीत. आपल्या डॉक्टरांची टिम आहे ते करतात. आणि त्यानंतर अँडमिशन स्टेजला पण आपण प्रिक्वॉशन घेतो की, ज्यांची प्रकृती व्यवस्थित आहे त्यांना पण अँडमिट व्हायचं असतं त्यामुळे आपला बेड तयार होतो त्यामुळे आपली टिम त्याठिकाणी अँडमिशनसाठी आहे. यापुर्वी आम्ही पाहिलेलं आहे की,ज्या लोकांना बेडची गरज नाही ते लोक त्याठिकाणी जाऊन बसलेले होते. त्यामुळे बरेच प्रमाण कमी झालं आहे. आताच्या स्टेजला जम्बो मध्ये जे पेशंट आहेत त्यांची संख्या ही ससुन पेक्षा सुध्दा मोठी आहे असं म्हणता येईल. याबाबतीत ज्या कम्पलेन आहेत,इश्युज आहेत त्याच्यावर आम्ही काम करतोच आहोत याच्यामध्ये आम्ही रिसेप्शन

वाढवलं आहे. त्यानंतर तिथे पेशंटच्या नातेवाईकांना खाण्यासाठी देण्यासाठी आपले मिनी व्यवसाय करण्यात आलेले आहेत. त्यानंतर आयसीयु आणि ओ.टु. मध्ये असे दोन फोन ठेवलेले आहेत पेशंटला त्यांच्या नातेवाईकांना बोलण्यासाठी आणि मला वाटतं तिथे जे रिस्ट्रेक्शन आहेत ते थोडया अधिक प्रमाणा मध्ये सर्व हॉस्पिटल मध्ये आहे. आपल्याला कोणत्याच हॉस्पिटलच्या आयसीयु मध्ये नॉर्मली जाता येत नाही. आणि आपण बिर्ला हॉस्पिटल मध्ये जा, लोकमान्य हॉस्पिटल मध्ये गेले तरी असेच प्रोटोकॉल आहेत. त्याच्यामध्ये काही सुधारणा करता आली तर आपण करु शकतो. विशेषता मला वाटतं अजुन काम करता येईल. बाकीचे हेल्थ विषयी जे प्रश्न होते त्याविषयी आपण कन्टीन्यु इम्पलीमेंट करण्याचं टिमचा प्रयत्न चालू आहे. अजुनही आपण कॉन्ट्रॅक्ट ट्रेसिंगसाठी ५०० लोक मोबलाईज करतो आहे. आणि जास्तीत जास्त लोकांना कसं क्वॉरंटाईन केलं जाईल या प्रक्रियेचा माध्यमामधुन पण आपलं काम अजुन पुढच्या काही दिवसामध्ये होणार आहे. गेल्या तीन आठवडयामध्ये जर का आपण बघितलं तर कुठंतरी पॉझीटीव्हीटी स्टेबल होऊन मोठा डाऊनलोड स्ट्रेन सुरु झालेला आहे. आपण इन टु बेड पेशंट धरल्यामुळे अजुनही हॉस्पिटलायझेशनचं प्रमाण थोडसं कमी झाल्यामुळे यामध्ये आपण जे कॉल सेंटर सुरु केलेलं आहे त्यामुळे दररोज १२००० ते १३००० कॉल्स जे पेशंट घरी आहेत आयशोलेशन मध्ये असतात त्यांना आपल्या कॉल सेंटर मधुन कॉल जात असतात. आणि आपण आपल्या १५ डॉक्टरांची फळी तयार केलेली आहे.आणि त्यांचे जे इश्युज आहेत त्यामुळे त्यांना दिलासा मिळतो आणि योग्य हॉस्पिटलायझेशन साठी योग्य वेळी मदत मिळते.यामध्ये मोर दॅन फिफ्टीन आहेत त्यांची विशेष काळजी घेतली जाते. आणि त्यांना ऑक्सीमीटर देण्याचा आम्ही विचार करतो आहे. आणि आपला जो डेथचा जो तांडव आहे तो पुढच्या आठवडयामध्ये अजुन खाली जाईल. आताचा लॉकडाऊन आणि पुढचे १५ दिवस जे लॉकडाऊन आहेत यामध्ये आता सर्वात महत्वाचा पार्ट आहे की, दोन/तीन गोष्टी आपण समजुन घेतल्या पाहिजेत की, लोकांची जी मानसिकता आहे मागच्या लाटेमध्ये आणि आताच्या लाटेमध्ये खुप तफावत आहे. या लाटेमध्ये लोक खुप बिनधास्त आहेत त्यामुळे आपले किती कडक निर्बंध असले तरी त्यांची मानसिकता ही जरा वेगळी आहे. आणि दुसरी अशी गोष्ट आहे की,जो व्हायरस आहे तो गेल्या वेळेला कॉन्टॅक्ट झाल्यानंतर २० ते ३० लोकांना होत होता. आता त्याच प्रमाण ८० ते ९० टक्के झालेलं आहे. या गोष्टी आपल्या हॉस्पिटलायझेशन किंवा डेथ यावर खुप इम्फॅक्ट करीत असतात. लॉकडाऊन आणि इतर जे नियम आहेत ते नियम सर्वांशी डिसकस करुन सन्मा.पालकमंत्र्याच्या बैठकीमध्ये देईन. सगळया गोष्टींचा ऊहापोह होतो त्यामध्ये लॉकडाऊन करायचं तर

किती दिवसाचं करायचं, निर्बंध काय ठेवायचे, कारण मागच्या वेळेला जे संपुर्ण लॉकडाऊन होतं त्यावेळेला जी नॉर्मल जीवनयात्रा होती ती इफेक्ट झाली होती,इकॉनॉमी इफेक्ट झाली होती. त्यामुळे कुठे तरी इकॉनॉमी अँक्टीव्हेटीज पण चालल्या पाहिजेत आणि कोरोनावर पण आपण मात केली पाहिजे असे एकंदर मत असल्यामुळे आपण जे काही निर्बंध लादले होते ते पुणे मनपा आणि पीसीएमसी या दोघांनी ठरवुन कारण दोन्ही शहर एकमेकांच्या जवळ असल्यामुळे पुण्यामध्ये वेगळे निर्बध आणि आपल्याकडे वेगळे निर्बंध असं करणं थोडं अवघड होतं म्हणुनच हे निर्णय घेण्यात आलेले आहेत. तर ही सगळी पार्श्वभुमी कोरोनाच्या लढाईसाठी आहे आणि आपण पुढच्या लाटेसाठी सुध्दा तयार आहोत. आणि आपण नियोजन करत आहोत आणि लसीकरणासाठी लस कधी येईल, किती येईल यासाठी आपण थोडं संभ्रम आहे. राज्य सरकारने आपल्याला सांगितले आहे की,२० तारखेनंतर आपल्याकडे लस उपलब्ध होईल. १८ वर्ष वयोगटाच्या वरती असणा-यांना लस देण्याचं आपल्याला कळवलं आहे. आणि आपण बाकीचं नियोजन करत आहोत. लस देण्यांचे सेंटर वाढवणार आहोत. आणि यामध्ये ब-याचशा सन्मा.सदस्यांनी त्याच्यामध्ये इन्व्हॉलमेंटसाठी इच्छा व्यक्त केलेली आहे. आपण सर्वांना सामील करुन हे लसीकरण किती जलद गतीने होऊ शकेल यासाठी आपण नियोजन करणार आहोत. परत एकदा मी या शहरवासियांना मी भरोसा देतो आणि आश्वस्त करतो की,सगळया प्रकारच्या स्टेपस् घेतल्या जातील आणि आपण सगळेजण एकत्र आहोत आणि इश्युज झाले आहेत त्या इश्युजचं आपण निराकरण करणार आहोत. आणि या कोरोनाच्या लढाईमध्ये आपण सर्वजण एकत्र पुढे जाणार आहोत. आणि त्याचा यशस्वी मुकाबला करणार आहोत. आणि सन्मा.महापौरांनी जे आदेश दिलेले आहेत आणि सभागृहाच्या ज्या भावना आहेत त्याला मुर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न करु. त्याच्यामध्ये काय लिगल अडचणी काय आहेत हे मी या क्षणाला सांगु शकत नाही. जम्बो आणि अँटो क्लस्टर मध्ये सध्या जी परिस्थिती आहे. त्याचा विचार करुन आणि आपला जो आदेश आहे त्यादृष्टीने आम्ही निश्चित पावलं उचलू. पण आता मी दोन दिवसात टेकओव्हर करु शकतो असे मी सांगु शकत नाही.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आमच्या महापौरांनी तुम्हांला जे काही आदेश दिलेले आहेत आम्ही तुम्हांला सरळ सांगितलं आहे की,त्यांना एक्सटेंशन दिलेलं नाही. पुन्हा काही टेंडर काढलेलं नव्हतं त्यामुळे तुम्ही त्यांना टर्मीनेट करु शकता आमची तुम्हांला सर्व सभागृहाच्या वतीने विनंती आहे की, मा.महापौरांचा आदेश पाळून तुम्हांला त्यांना टर्मीनेट करावंच लागेल. कारण तिथं आपलं साहित्य आहे. जागा आपली आहे. आम्हांला तुमच्याकडुन असा

शब्द पाहिजे की, ८/१५ दिवसामध्ये मी त्यांना टर्मीनेट करीन.आणि आता सध्या जी लोक तिथं आहेत ती कॉन्ट्रॅक्टरचीच आहेत आणि तो कॉन्ट्रॅक्टर त्या लोकांना पगार देत नाही आणि त्यांच्या सहया मात्र घेतो उलट त्या लोकांना थोडासा पगार वाढवून दिला तर ते चांगल्या खुशीने काम करतील आणि मा.महापौरांनी जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाचं पालन आपण करावं.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.आयुक्त साहेब,आपल्याला ज्या पध्दतीने मा.महापौरांनी आदेश दिला आहे.आपत्ती व्यवस्थापनाच्या माध्यमातुन आपण कुठलंही कॉन्ट्रॅक्ट कधी रद्य करु शकतो. तुम्ही जे बोललात लिगल पण हे सगळं हाऊस तुमच्या बरोबर आहे. आज जम्बो कोविड सेंटर आणि अँटो क्लस्टर मध्ये पेशंटची जी दयनीय परिस्थिती निर्माण होत आहे. त्यासंदर्भामध्ये या सभागृहामध्ये पाच तास चर्चा झालेली आहे आणि महापौरांनी आदेश दिल्याच्या नंतर तुम्ही ते नाकारु शकत नाही. आपल्याला सगळयात महत्वाचं आहे की,तिथला जो स्टाफ आहे त्यामध्ये हाऊसकिपींग करणारा असेल,तिथला डॉक्टर असेल, नर्स असेल हेच काम करणारे कर्मचारी आहेत. आता तुम्हीच सांगितले की,आपले डॉक्टर दादेवार हे तिथं जाऊन आपले पेशंट बघत आहेत. याचा अर्थ दादेवार साहेबांना तिथल्या पेशंटची अवस्था माहिती आहे. त्या ठेकेदारांची जी काही चिल्लर गँग आहे तेवढीच आपल्याला बाजुला करायची आहे. बाकीचा सगळा स्टाफ आणि तुम्हांला जिथं,जिथं अडचणी येतील त्यामध्ये तिथल्या स्टाफच्या बाबतीत तुम्हांला काही अडचण आली तर योगेशभाई आपण तिथं जाऊन बघु त्याची तुम्ही चिंता करु नका, तुम्हांला असं वाटत असेल की,८०० पेशंट यांच्याकडुन काढल्यानंतर यांच काय होणार आहे. त्यात सगळं सभागृह तुमच्या बरोबर आहे. आज अँटो क्लस्टर आणि जम्बो कोविडच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये लाईव्ह चर्चा झालेली आहे. आणि आता आपण तेच जर ठेवलं तर अँटो क्लस्टर आणि जम्बो कोविड सेंटरला तेच ठेकेदार आहेत ते काय म्हणतील या सभागृहामध्ये एवढया नगरसेवकांनी विरोध करुन सुध्दा याठिकाणी आम्हीच काम करतोय. लक्षात ठेवा आणि याचा परिणाम पुढच्या सभागृहामध्ये आणि पेशंटला होणार आहे. त्यामुळे तुम्ही ८ दिवसाची वेळ घ्या आणि या ८ दिवसामध्ये आपल्याला तिथली यंत्रणा बसवायला काय,काय लागेल याच्यावर काम करा. मी सत्ताधारी पक्षाचा माजी सत्ताधारी पक्षनेता म्हणुन सांगतो की, मा.महापौरांनी आदेश देवुन सुध्दा तुम्ही टेक्नीकल पळवाट काढु नका,म्हणजे अजित पवारांनी जे केलं ते तुम्ही करु नका, नाही तर पुढचं सभागृह आम्ही चालू देणार नाही. म्हणजे या शहरातील नागरीकांच्या जीवाशी जो,जो कोणी खेळलं साहेब,सॉरी आम्ही त्याच्या

विरोधात आहोत. त्यामुळे मा.महापौरांनी जो आदेश दिला आहे त्या आदेशाचं पालन तंतोतंत पुढच्या आठवडयापर्यंत केलं पाहिजे त्यामध्ये टेक्नीकल अडचणी आल्या,लिगल अडचण आली आणि या सभागृहामध्ये २० तारखेला काय अडचण आली हे तुम्हांला सांगतो. आयुक्त साहेब,आपण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम करतो आपल्याला शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही. त्यामुळे हे एक लक्षात ठेवा की,हे जे ठेकेदार आहेत त्यांना मुक्त करुन जसं तुम्ही म्हणलं की,डॉ.दादेवार अँटो क्लस्टर मध्ये जाऊन पेशंट बघतात तर दादेवार अँटो क्लस्टर बघतील आपले प्रशासनामध्ये अजुन कोण अधिकारी आहेत का,आपले अति.आयुक्त जगताप साहेब,द्या नां त्यांना अधिकार ते सगळे अँडमिनिस्ट्रेशन करतील याच्यामध्ये दोन दिवस जातील आणि अजुन चार डॉक्टर सुचवा आपल्या कर्मचा-यांची क्षमता प्रचंड आहे हे लक्षात ठेवा. उद्या अँटो क्लस्टरची ऑर्डर काढुन टाका. आता जर आपण ठेकेदार बदलला नाही तर पुढची परिस्थिती अवघड होणार आहे. त्यामुळे मा.महापौरांनी जो आदेश दिलेला आहे त्याचे तंतोतंत पालन आपण केले पाहिजे. आणि तसं झालं नाही तर मा.महापौरांचा अपमान आम्ही सहन करणार नाही. आणि तुम्ही महापौरांच्या आदेशाची अंमलबजावणी नाही केली तर पुढच्या सर्वसाधारण सभेमध्ये तुमच्या विरुध्द आम्हांला हक्कभंगाचा प्रस्ताव आणावा लागेल. तशी परिस्थिती तुम्ही आणु नका अशी माझी आपल्याला विनंती आहे. तुम्ही सगळे सिनियर अधिकारी बसवा, याठिकाणी सगळया पक्षाचे गटनेते आहेत त्यांना घ्या नाही तर या शहरातील जनता आपल्याला माफ करणार नाही. मा.महापौरांनी जे आदेश दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जे,जे काही करता येईल ते करा.

**मा.आयुक्त** - सन्मा.महापौर,सन्मा.सभागृह मला वाटतं मॅनेजमेंट बदलण्याविषयी जो काही निर्णय झालेला आहे यासंबंधी मा.महापौरांनी आदेश दिलेला आहे. त्याविषयी मला कशा पध्दतीने इम्पलीमेंट करता येईल याविषयी मी सध्या काही गाईडलाईन देवु शकत नाही कारण तिथं ८०० पेशंट आहेत आणि या ८०० पेशंटचं जे वेलफेअर आहे त्यादृष्टीनं आदेशामधील जो गाभा आहे तिथे आपण मॅनेजमेंट देवु शकतो. यासाठी आपले सर्व डॉक्टर डिसाईड करतील ऑदरवाईज तिथे ३/४ प्रकारचे वेगवेगळया एजन्सीज काम करतात त्यातील फक्त एक एजन्सी ही मॅनपॉवर एजन्सी आहे. बाकीच्या सर्व एजन्सीज या आपल्या अंडरच काम करतात एक एजन्सी फक्त मॅनपॉवर आणि डॉक्टर,बायोमेडीकल आहे त्याच्याविषयी आपले ऑब्जेक्शन आहे. बाकीची इन्फ्रास्ट्रक्चर क्रिएट करणारी एजन्सी आहे. या स्टेजला

तिथे ८०० पेशंट आहेत तशी परिस्थिती बदलते आहे त्याचा आपण विचार केला पाहिजे. आणि आपल्याकडे पुढचे जे चॅलेंजेस आहेत त्याचा विचार करुन ....

**मा.महापौर** – आयुक्त साहेब,तुम्ही फक्त एवढंच सांगा की, हे हॉस्पिटल आपल्या ताब्यात घेण्यासाठी किती दिवस लागतील ४/८ दिवस लागतील एवढयाच आदेशाची आपण वाट पहातोय. तुम्ही आदेश दिला तर एका रात्रीत सुध्दा हे होऊ शकते.

**मा.आयुक्त** – १० दिवस तुम्ही मला वेळ द्या. या दिवसामध्ये मी हे क्लोज करतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, हा विषय खुप महत्वाचा आणि गंभीर आहे. त्याठिकाणी जे पेशंट आहेत त्यातील जर का काही पेशंट दगावले तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. प्रशासनाला वेळ दिला पाहिजे प्रशासनाशी मी सहमत आहे.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह जागा आपली,खर्च आपला,मशिनरी आपली आहे, इन्फ्रास्ट्रक्चर आपलं आहे, सगळं आपलं आहे आता तुमचं म्हणणं आहे की, त्याठिकाणी ८०० पेशंट आहेत आणि त्या पेशंटच्या भावनेशी खेळू नये असं सचिनचं म्हणणं आहे.आमचं म्हणणं आहे की, तिथं असणारा डॉक्टर, नर्स, केअरटेकर, तिथं असणारा स्टाफ हा ठेकेदारांनी हाय केला आहे. तो ठेकेदार फक्त तुम्हांला रिप्लेस करायचा आहे. आणि महापालिकेनं चालवायचं आहे. आज आपल्याकडे कॉन्ट्रॅक्टवर नर्सेस आहेत,डॉक्टर आहेत, जिजामाता हॉस्पिटलमध्ये,तालेरा हॉस्पिटलमध्ये सुध्दा तसंच आहे. आता आयुक्त साहेबांनी म्हणलं आहे की, मला लिगल बघावं लागेल. लिगल मध्ये आर्थीक नुकसान काही आहे का? तर आर्थीक नुकसान काही नाही, दुसरी गोष्ट अशीआहे की,त्यांनी करप्शन केलेलं आहे. लोकांच्या जीवाशी ते खेळतात, रेमडेसिव्हर बाहेर विकतात हे सगळे प्रुफ असतांना तुम्हांला अजुन काय पुरावे पाहिजेत. दुसरी गोष्ट त्यांनी काहीच खर्च केलेला नाही. सगळा महापालिकेचा पैसा आहे. यामहापालिकेच्या पैशाची उधळपट्टी झालेली आहे. आणि म्हणुन मा.महापौरांनी आपल्याला आदेश दिलेले आहेत आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी काहीही लिगल अडचण येणार नाही. हे सभागृह तुमच्या सोबत आहे तुम्हांला फक्त तो कॉन्ट्रॅक्टर तिथनं काढायचा आहे. आणि आपल्या अधिका-यांना तिथे नेमायचं आहे. आणि तोच स्टाफ आपण कंन्टीन्यु करु आणि माझं म्हणणं आहे की,जे पैसे ठेकेदाराच्या घशात

जातात तेच पैसे तिथं काम करणा-या स्टाफला थोडं वाढवून द्या तो स्टाफ चांगल्या प्रकारे कामही करेल आपल्याला लोकांचे जीव वाचवायचे आहेत. आणि म्हणुन आयुक्त साहेब,आपण जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयासोबत आम्ही सर्वजण आहोत. आणि आपण महापौरांच्या निर्णयाचा योग्य निर्णय घ्याल हीच अपेक्षा व्यक्त करतो.धन्यवाद.

मा.अॅड.मोरेश्वर शेंडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २

दिनांक- ३०/४/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.भिमाबाई फुगे, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९२७०, दि.२३/०४/२०२१

पवना धरण पाईप लाईन टाकणे अंदोलनाच्या वेळी गोळीबारात खालील शेतकरी जखमी झालेले आहेत.

| अ.क्र. | जखमी शेतक-याचे नावे | गाव |
|---|---|---|
| १ | श्री. योगेश शंकर तुपे | गेव्हडे वसाहत |
| २ | श्री. शिवाजी भैरु वर्वे | तिकोना पेठ |
| ३ | श्री. अमित लक्ष्मण दळवी | कोथूर्णे |
| ४ | श्री. विशाल रोहिदास राऊत | करुंज |
| ५ | श्री. अजित जालिदंर चौधरी (वारस) गणेश मच्छिद्र चौधरी | सडवली |
| ६ | श्री. नवनाथ मधुकर गराडे | बऊरवाडी , बऊर |
| ७ | श्री. गणेश ज्ञानेश्वर तरस | थुगाव |
| ८ | श्री. तुकाराम बबन दळवी | बऊरवाडी , बऊर |
| ९ | श्री. मारुती बारकू खिरीड ( वारस) अनिकेत मारुती खिरीड | बऊर |
| १० | श्री. काळूराम सखाराम राऊत ( वारस ) गोरक्षनाथ वरघडे | राऊतवाडी |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. दत्तात्रये गबळू पवार ( वारस ) गणपत दत्तात्रये पवार | राऊतवाडी |
| १२ | श्रीम. सुरेखा शिवाजी कुडे | सडवली |

वरील जखमी शेतक-यांच्या वारसांना/ नातेवाईक महापालिका सेवेत घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.सागर आंगोळकर – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

